प्रस्तावना.

सन १९०५ सालीं 'भारतरामायणकालीन आर्यांची समाजस्थिति' ह्या विषयावर मीं इंग्रजींत एक निबन्ध लिहिला. तो निबंध कांहीं मित्रांना वाचावयाला दिला. त्या निबंधाचें मराठींत भाषांतर केल्यास मराठी वाचकांना त्याचा फार उपयोग होईल असें माझ्या मित्रांनीं मला सुचविलें. इंग्रजींत वरील विषयावर निबंध असल्यामुळें अधिक वाचनानें माझा निबंध बराच विस्तृत झाल्याशिवाय तो इंग्रजींत छापणें मला बरें वाटलें नाहीं. इतर व्यवसायांमुळें निबंध मोठा करून छापण्याचें काम लांबणीवर पडत चाललें. तेव्हां मराठींत या विषयावर एखादा आटोपशीर निबंध माझे पहाण्यांत न आल्यामुळें, मूळ इंग्रजी निबंधांत थोडी छाटाछाट व फेरफार करून व थोडा नवा मजकूर घालून, हें मराठी रूपांतर प्रसिद्ध केलें आहे.

मला आढळलेली कोणतीही गोष्ट ह्या निबंधांत मी छपवून ठेविली नाहीं किंवा जास्त खुलवून लिहिली नाहीं. निःसीम निःपक्षपातित्व केवळ ईश्वराचे ठिकाणीं मात्र आहे. माझ्या अल्पबुद्धीप्रमाणें तत्कालीन गुणदोषांचें मी निःपक्षपातानें आविष्करण केलें आहे. दोन्ही ग्रंथांतून उतरून घेतलेल्या श्लोकांचें समग्र भाषांतर किंवा निदान गोषवारा तरी प्रत्येक ठिकाणीं दिला आहे.

ह्या निबंधांत मजकडून ज्या चुका झाल्या असतील त्या दाखवून देणारांचा मी फार आभारी होईन. ह्या निबंधाचे वाचनानें रामायण व महाभारत हे दोन ग्रंथ वाचण्याची किंवा त्यांवर ह्या निबंधाहून विस्तृत व विद्वत्प्रचुर विवेचनात्मक लेख लिहिण्याची वाचकांपैकीं कोणाला इच्छा झाल्यास माझ्या अल्पश्रमाचें उत्तम चीज होईल.

महाभारताच्या आदि व सभा ह्या दोन पर्वांतील उतारे बाबू प्रतापचंद्र ह्यांनीं आपल्या इंग्रजी भाषांतरा-बरोबर दिलेल्या प्रतीवरून घेतले आहेत. महाभारताच्या बाकीच्या पर्वांतील व रामायणांतील उतारे गणपत कृष्णाजी ह्यांच्या छापखान्यांत छापलेल्या प्रतीवरून घेतले आहेत. आदि व सभा ह्या पर्वांत बहुतेक ठिकाणीं गणपत कृष्णाजी ह्यांच्या प्रतीशीं ताडून त्या प्रतींतील श्लोक व अध्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. जेथें प्रतापचंद्र यांची प्रत व गणपत कृष्णाजी यांची प्रत जमते तेथें नुसतें (ग. कृ.) किंवा (ग. कृ. सुद्धां) असें लिहिलें आहे. जेथें दोहोंत फरक पडतो तेथें गणपत कृष्णाजी ह्यांचे प्रतींतील अध्याय व श्लोक यांचे आंकडे कंसांत दिले आहेत.

आंग्र्याची वाडी,
गिरगांव, मुंबई.

पांडुरंग वामन काणे.

भारतरामायणकालीन समाजस्थिति.

अनुक्रमणिका.

भारतरामायणकालीन समाजस्थिति.

मानवजातीची अत्यंत रानटी स्थितींतून आज जी परिणति झालेली दिसत आहे, ती घडवून आणण्याचे कामीं प्राचीन ग्रंथांनीं फारच मोठी कामगिरी बजाविली आहे. ग्रंथकार व त्यांचे ग्रंथ ह्यांनीं एकंदर मनुष्यसमाजांत वेळोवेळीं जी खळबळ उडवून दिली व जे चिरस्थायी संस्कार केले त्यांचा जर संपूर्ण इतिहास लिहिण्यांत आला, तर तो फार मनोरंजक होईल. महाभारत व रामायण ह्या दोन ग्रंथांनीं आर्यावर्तावर जशा प्रकारचे व जितके चिरस्थायी परिणाम केले आहेत तशा प्रकारचे व तितके दुसऱ्या कोणत्याही पुस्तकांनीं केले असतील असें वाटत नाहीं.

महाभारतांतच ह्मटल्याप्रमाणें, प्राचीन संस्कृत कवि व अर्वाचीन मराठी इत्यादि कवि ह्यांच कवित्वाला या दोन दिव्य ग्रंथांकडूनच स्फूर्ति मिळाली आहे. महाभारत व रामायण ह्यांत ज्या गोष्टी श्रेयस्कर व उपादेय ह्मणून सांगितल्या आहेत, त्याच आजही आह्मी तशा मानीत आहों. अगदीं अशिक्षित अशा हिंदूलसुद्धां रामायण व भारत ह्यांतील कथा चांगल्या माहीत असतात; व त्या ऐकून त्याला अजूनही प्रेमाश्रूंचें भरतें येतें. ह्या दोन ग्रंथांत जी समाजघटना दिसते, तीच बहुतेक आज आमची आहे. भारतरामायणांत जीं मतें व पंथ प्रतिपादिले आहेत, ते आजही आमच्यांत आहेत; जे धार्मिक संस्कार तेव्हां करीत असत, ते आजही आह्मी करीत आहों. फार प्राचीन काळापासून आर्यावर्तांत जीं स्थित्यंतरें झालीं त्यांचा ज्याला सूक्ष्म अभ्यास करावयाचा असेल, आज हिंदुस्थानची जी समाजघटना आहे तिच्या अंगांचा सर्व बाजूनें ज्यांना विचार करावयाचा असेल, अनेक सामाजिक प्रश्न आज उत्पन्न होत आहेत त्यांचीं कारणें व ते सोडविण्याचे उपाय ज्याला शोधावयाचे असतील, अनेक धर्म व पंथ कां व कसे उत्पन्न होतात यांचा खल ज्याला करावयाचा असेल, अशा सर्व माणसांना ह्या दोन ग्रंथांचें चांगलें अध्ययन केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. ह्या ग्रंथांचे परिशीलनानें कित्येक सामाजिक कोड्यांचा उलगडा होईल, कित्येक अडाणी समजुती कशा उत्पन्न झाल्या याचा खुलासा होईल. हजारों वर्षांपूर्वींपासून आजपर्यंत होत आलेल्या आर्यांच्या संस्कृतीचा मार्ग दाखविण्याचे कामीं ह्या दोन ग्रंथांचा फार उपयोग होणार आहे. ह्मणून ह्या दोन ग्रंथांवरून आर्यांच्या समाजस्थितीविषयीं आपणास काय माहिती मिळते ती पाहूं.

ही माहिती निरनिराळ्या सदरांखालीं देण्यापूर्वीं दुसऱ्या एकदोन गोष्टींसंबंधानें खुलासा केला पाहिजे. महाभारत ह्या ग्रंथांत पुष्कळ भाग प्रक्षिप्त आहे असा विद्वानांचा समज आहे. हे प्रक्षिप्त भाग निरनिराळ्या काळीं घुसडून दिले गेले असले पाहिजेत. त्याचप्रमाणें रामायणांतही पुष्कळ अध्याय प्रक्षिप्त आहेत, व ते टीकाकारांनीं दाखवूनही दिलेले आहेत. शिवाय, कलकत्त्याकडे छापलेलें रामायण व मुंबईस छापलेलें रामायण, यांमध्येंही फार फरक

---

१. इतिहासोत्तमादस्माज्जायन्ते कविबुद्धयः । आदिपर्व, २-३८५. इदं कविवरैः सर्वैराख्यानमुपजीव्यते । आदि० २-३८९. (ग. कृ.)

आहे. ह्यावरून असें दिसून येईल कीं, महाभारत व रामायण हे ग्रन्थ मूळ जसे लिहिले गेले तसच आज आहेत असें मानतां येत नाहीं. त्यांत जर पुष्कळ भाग घुसडून दिला असेल तर विसंगतपणा व पुनरुक्ति पुष्कळ ठिकाणीं आढळणारच. शिवाय, दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, महाभारत हा ग्रंथ हळूहळू अत्यंत प्रमाणभूत व सर्वज्ञानसंग्राहक असा मानण्यांत येऊं लागल्यामुळें त्यांत घुसवाघुसवी करण्याची विद्वानांना चटक लागली. त्यामुळें विद्यमान महाभारतांत जें सांपडतें तें सर्वच प्राचीन आर्यांमध्यें जिकडे तिकडे प्रचलित होतें असें मानतां येणार नाहीं; कांहीं भाग केवळ एखाद्या व्यक्तीच्या मतांचा अनुवाद करणारा असेल, परंतु समाजांत त्याच्या उलटच स्थिति असेल; व कांहीं भाग केवळ काल्पनिकही असूं शकेल. ज्या ठिकाणीं प्राचीन कालच्या समाजाचें वर्णन केलेलें आहे, त्या ठिकाणीं त्या समाजाची त्या वेळची स्थिति खरोखर जशी असेल तसें तिचें वर्णन न दिलें जातां, ती जशी असावी असें ग्रंथकारानें ठरविलें असेल त्याप्रमाणें ती लिहिली असेल. हें सर्व जरी खरें आहे तथापि ह्या दोन प्रचंड व अमोलिक ग्रंथांवरून दोन तीन हजार वर्षांपूर्वीच्या आर्यांच्या संबंधानें आपणास बरीच स्पष्ट व वस्तुस्थितीस धरून असणारी अशी माहिती मिळेल.

ह्या दोन ग्रंथांवरून मिळणारी माहिती व्यवस्थित रीतीनें मांडतां यावी ह्मणून निरनिराळ्या सदरांखालीं ती येथें संकलित करण्याचें योजिलें आहे.

१ (अ) धर्म.

येथें प्रथम हें सांगून ठेविलें पाहिजे कीं, महाभारतामध्यें आर्यांचा धर्म व तत्त्वज्ञान ह्यांविषयीं जी अपार माहिती सांगितली आहे तिचें विस्तारानें वर्णन करणें शक्य नाहीं. केवळ दिग्दर्शन करूनच स्वस्थ राहिलें पाहिजे.

ईश्वर. दोन्ही ग्रंथांत जगाचा नियन्ता एकच परमेश्वर आहे असें जागोजाग सांगितलेलें आहे. एकंदर महाभारत वाचून आमचा असा ग्रह झाला आहे कीं, निरनिराळ्या पंथांचें एकीकरण करणें हेंच त्या ग्रंथाचें उद्दिष्ट आहे. महाभारत हा ग्रंथ एका विशिष्ट देवतेचें माहात्म्य वाढविण्यासाठींच लिहिलेला दिसत नाहीं. एवढें मात्र कबूल केलें पाहिजे कीं, विष्णु किंवा कृष्ण यांचें माहात्म्यवर्णन जेथें केलें आहे असे भाग शिव किंवा इतर देव यांच्या माहात्म्याच्या वर्णनापेक्षां फारच मोठे व विपुल आहेत. विष्णु हा जगाची उत्पत्ति करणारा, रक्षण करणारा, संहार करणारा आहे; तो तीन्हीं लोक व्यापून राहिलेला आहे; तो अविनाशी, अज व प्राणिमात्राचा अन्तरात्मा आहे; अशा प्रकारचें वर्णन अनेक स्थलीं आलें आहे.× ज्याप्रमाणें विष्णूची त्याप्रमाणें शिवाचीही अत्यंत उदात्त अशी स्तुति महाभारतांत आहे; आणि ह्या स्तुतीची अशी मजा आहे कीं, ती कृष्णाचे तोंडून वदविली आहे. त्यांत ह्मटलें आहे कीं, शिवाहून मोठा कोण आहे ? शिव हाच निर्गुण ब्रह्म, शिव हाच योग्यांना परमानंदरस चाखविणारा, शिव हाच मोक्ष आहे.* दुसऱ्या एका स्थलीं विष्णु शिवाची खालीलप्रमाणें स्तुति करितो. "जो तुला

×एको विष्णुर्महद्भूतं पृथग्भूतान्यनेकशः । त्रींल्लोकान्व्याप्य भूतात्मा भुंक्ते विश्वभुगव्ययः ॥ अनु० १४९. १४०; अहं नारायणो नाम प्रभवः शाश्वतोऽव्ययः। विधाता सर्वभूतानां संहर्ता च द्विजोत्तम ॥ वन० १८९.४.

*निष्कलं सकलं ब्रह्म निर्गुणं गुणगोचरम् । योगिनां परमानन्दमक्षरं मोक्षसंज्ञितम् ॥ अनु. १६. ८; सदसद्व्यक्तमव्यक्तं यमाहुर्ब्रह्मवादिनः । ...मनो मतिरहंकारस्तन्मात्राणींद्रियाणि च । ब्रूहि चैषां भवेच्छक्र कोऽन्योऽस्ति परमं शिवात् ॥ अनु० १४. २०२.

जाणतो तो मला जाणतो, जो तुला अनुसरतो तो मलाच अनुसरतो; आपणांमध्यें कांहीं भेद नाहीं. तुझ्या मनांत भलतेंच न येवो."[1]

शिवलिंगपूजेचेंही महत्त्व हल्लींप्रमाणेंच महाभारतकालीं होतें असें दिसतें. लिंगपूजा कां करावी ह्यासंबंधानें जे श्लोक आढळतात त्यांचें भाषांतर केल्यास तें शिष्टसंप्रदायास सोडून होईल ह्मणून केलें नाहीं.[2]

ब्रह्मा विष्णु व महेश ही त्रिमूर्ति एकाच परमेश्वराचीं तीन रूपें आहेत अशी कल्पना रूढ झाली होती.[3] इतर देवतांपैकीं देवी (भीष्मपर्व), सूर्य व कार्तिकेय (दोघांचीही वनपर्वांत) यांची स्तुति बरीच केलेली आहे. विष्णूचीं व शिवाचीं सहस्र नांवें अनुशासनपर्वांत (अनुक्रमें अध्याय १४९ व १७) आलीं आहेत.

शंकराचार्य, रामानुजाचार्य वगैरे आचार्यांनीं ईश्वरविषयक ज्ञानाचा ऊहापोह करून जे सिद्धांत ठरविले ते महाभारत व रामायण ह्या दोन ग्रंथांत कितपत सांपडतात याचें विस्तारभयास्तव पूर्ण विवेचन करणें येथें शक्य नाहीं. येथें थोडक्यांत दिग्दर्शन करण्यापलीकडे कांहीं करितां येत नाहीं. पंचरात्र सिद्धान्ताची शान्तिपर्वांत (अध्याय ३४० वगैरे) जी स्तुति आली आहे त्यावरून असें दिसेल कीं, रामानुजाचार्यांनीं जो विशिष्टाद्वैत सिद्धान्त स्थापित केला तशा प्रकारचाच महाभारतकाराला संमत होता. पंचरात्र सिद्धान्ताचें खंडण शंकराचार्यांनीं आपल्या भाष्यांत केलें आहे (वेदान्तसूत्रभाष्य अध्याय२.२.४२-४५)असें जरी आहे तरी आह्मी असें दाखवून देऊं कीं, शंकराचार्यांचे ह्मणून जे कांहीं विशिष्ट सिद्धान्त आहेत ते महाभारतांत सांपडतात. उदाहरणार्थः—

१. ब्रह्म हें निर्गुण आहे, तें सत् किंवा असत् ह्या दोन्ही शब्दांनीं वर्णितां येत नाहीं, तें केवल आत्म्यामध्येंच पहावयाचें आहे. अशाप्रकारचें वर्णन अनेक स्थलीं आहे.[1]

रामानुजाचे मताप्रमाणें ब्रह्म हें निर्गुण नसून अनेक कल्याणगुणांनीं मंडित आहे.

२. रामानुजाचार्यांचें मतानें ज्ञान व कर्म यांचा समुच्चय मोक्षसाधनास आवश्यक आहे; आणि मोक्षप्राप्ति ज्ञानापेक्षां भक्तीनेंच प्राप्त होते असें ते प्रतिपादन करितात. कर्मानें जीवाला बंध प्राप्त होतो व ज्ञानानें मोक्ष मिळतो, ह्मणून दूरदर्शी यति कर्म करीत नाहींत, अशा अर्थाचे श्लोक महाभारतांत आहेत. हें मत शंकराचार्यांच्या मताशीं जुळतें. शंकराचार्यांचा सिद्धांत असा आहे कीं, ज्ञानानेंच मोक्ष मिळतो (ज्ञानादेव मोक्षः न तु कर्मसमुच्चयात्). कर्म (निष्काम असेल तर) हें केवल चित्तशुद्धि करणारें आहे. गीतेमध्येंच काय तें भक्तिमार्गाला बरेंच प्राधान्य मिळालें आहे. परंतु एकंदर महाभारतांत ज्ञानमार्गच श्रेष्ठ आहे, असें सांगणारीं स्थलें फार आहेत.

३. भासमान जगाचें कारण माया आहे असें

१. यस्त्वां वेत्ति स मां वेत्ति यस्त्वामनु स मामनु। नावयोरन्तरं किंचिन्मा ते भूद्बुद्धिरन्यथा॥ शान्ति० ३४३. १३२. २. न पद्मांका न चक्रांका न वज्रांका यतः प्रजा। लिंगांका च भगांका च तस्मान्माहेश्वरी प्रजा॥ अनु० १४ २३३; लिंगपूजयिता नित्यं महतीं श्रियमश्नुते। अनु०. १६२. १६. ३. सृज्यते ब्रह्ममूर्तिस्तु रक्षते पौरुषी तनुः। रौद्रीभावेन शमयेत्तिस्रोऽवस्थाः प्रजापतेः॥ वन. २७२.४७.

१. धातारमजमव्यक्तं यमाहुः परमव्ययम्। कैवल्यं निर्गुणं विश्वमनादिमजमव्ययम्॥ आदि० ६३. १०२; अक्षरं परमं ब्रह्म असच्च सदसच्च यः। अनु. १४. १५; प्रतिबिम्बमिवादर्शे पश्यंत्यात्मन्यवस्थितम्। आदि. १. २५६. (ग. कृ. २६०); वन० १३३. १९; वन. १४७.८. २. कर्मणा बध्यते जन्तुर्विद्यया तु प्रमुच्यते। तस्मात्कर्म न कुर्वन्ति यतयः पारदर्शिनः॥शान्ति २४२.७.

प्रतिपादन जरी फारसें येत नाहीं, तरी अविद्या हें भासमान प्रपंचाचें कारण आहे असें अनेक स्थलीं ह्मटलें आहे.[१] रामानुजाचार्यांचे अत्यंत आवडते जे चित् व अचित् (ब्रह्माचें शरीर) हे शब्द ते मुळींच येत नाहींत.

४. रामानुजाचार्यांचे मतानें जीवात्मा हा अणुपरिमाण असून परब्रह्ममूर्तीचा अंश आहे. परंतु जीवात्मा व परमात्मा यांचें अभिन्नत्व केवलाद्वैतसिद्धान्ताप्रमाणें बऱ्याच ठिकाणीं सांगितलें आहे.[२]

वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं, परमात्म्यासंबंधीं एकाच मताचा अनुवाद महाभारतांत नाहीं. शंकराचार्यांस संमत असलेलींच मतें कायतीं महाभारतांत आहेत असा आमचा आग्रह नाहीं. ज्याप्रमाणें परब्रह्म व विष्णु यांचा अभेद मानला आहे, त्याचप्रमाणें शिव व परब्रह्म यांचें अभिन्नत्व प्रतिपादिलें आहे.

सृष्टीची उत्पत्ति.

सृष्टीची उत्पत्ति कशी झाली, याचा विचार दोन्ही ग्रंथांत अनेकदां आला आहे. त्यांत सर्वच ठिकाणीं मेळ आहे असें नाहीं. सृष्टीच्या उत्पत्तीविषयीं विशेषेंकरून खालील मतें आढळतात.

१. प्रथम जिकडे तिकडे जल होतें. त्या जलांत पृथ्वी उत्पन्न झाली. नंतर सर्व देवतांसहवर्तमान ब्रह्मा प्रादुर्भूत झाला. त्यानें वराहरूप धारण करून वसुन्धरेला वर आणिली.[१]

२. अक्षरांतून आकाश, आकाशापासून वायु, वायूपासून तेज, तेजांतून जल व जलापासून पृथ्वी झाली, असें दुसऱ्या ठिकाणीं ह्मटलें आहे.[२]

३. प्रथम सर्वत्र तम होतें व नंतर एक मोठें अंडें उद्भूत झालें. त्यांतून ब्रह्मदेव झाला व त्यानें सृष्टि निर्माण केली.[३]

४. कांहीं ठिकाणीं सृष्टीची उत्पत्ति सांख्यसिद्धांताप्रमाणें सांगितली आहे. परमात्म्यापासून अव्यक्त (प्रधान असें ज्याला सांख्य ह्मणतात) हें उत्पन्न झालें. शान्तिपर्व अ० ३०३ मध्यें असें ह्मटलें आहे कीं, नारायणापासून हिरण्यगर्भ, त्याचेपासून महत्, व त्याचेपासून अहंकार, अशी सृष्टि झाली.

जीवात्मा.

आत्मा हा अमर आहे. तो एका शरीरांतून दुसऱ्या शरीरांत जातो.[४] ह्या संसारांत दिसणारें वैषम्य हें पूर्वजन्मांत संचित केलेल्या कर्माचें फल आहे. जसें करावें तसें भरावें. ह्या कल्पना अत्यंत रूढ झालेल्या होत्या.[५]

---

१. अविद्यामाहुरव्यक्तं सर्गप्रलयधर्मि वै। सर्गप्रलयनिर्मुक्तां विद्यां वै पंचविंशकः ॥ शान्ति० ३०८, २; अहर्मुखे विबुद्धः सन्सृज्यतेऽविद्यया जगत् । शान्ति० २३३, ५.

२. आत्मा क्षेत्रज्ञ इत्युक्तः संयुक्तः प्राकृतैर्गुणैः। तैरेव तु विनिर्मुक्तः परमात्मेत्युदाहृतः॥ शान्ति० १८७, २३; शान्ति० २४०, २१; ३५२. २८.

१. सर्वं सलिलमेवासीत्पृथिवी तत्र निर्मिता । ततः समभवद् ब्रह्मा स्वयंभूर्दैवतैः सह ॥ स वराहस्ततो भूत्वा प्रोज्जहार वसुन्धराम् । अयोध्याकाण्ड ११०. ३-४

२. अक्षरात्खं ततो वायुस्ततो ज्योतिस्ततो जलम् । जलात् प्रसूता जगती जगत्यां जायते जगत् ॥ शान्ति २०१. १; हीच कल्पना तैत्तिरीयोपनिषदांत (२.७) आहे. ३. आदि० १. २९; ही कल्पना ऋग्वेद १०.१२९. ३ ह्या ऋचेंतही आहे. ४. न जीवनाशोऽस्ति हि देहभेदे मिथ्यैतदाहुर्म्रियतीति मूढाः । जीवस्तु देहान्तरितः प्रयाति दशार्धतैवास्य शरीरभेदः ॥ वन० २०९, २६. ५. यादृशं कुरुते कर्म तादृशं फलमश्नुते । उत्तरकाण्ड १५, २३; गुणदोषकृतं जन्तुः स्वकर्मफलहैतुकम् । अव्यग्रस्तदवाप्नोति सर्वं प्रेत्य शुभाशुभम् ॥ किष्किं० २१, २; एवं पतति संसारे तासु तास्विह योनिषु । अविद्याकर्मतृष्णाभिर्भ्राम्यमाणोऽथ चक्रवत् ॥ वन० २, ७१.

धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ सांगितले आहेत. यांमध्यें मोक्ष हा परम पुरुषार्थ आहे असें जिकडे तिकडे सांगितलें आहे. पहिले तीन हे केवळ उच्च पद प्राप्त करून घेण्याचे उपाय आहेत. कर्म, उपासना व ज्ञान हे तीन निःश्रेयस प्राप्त करून घेण्याचे मार्ग आहेत. ज्ञानानेंच मोक्ष साध्य आहे (ज्ञानेन मोक्षो विज्ञेयः । वन २००. ११८). यज्ञयागादि कर्मांचें योग्य रीतीनें संपादन केलें असतां स्वर्गप्राप्ति होते. परंतु स्वर्ग झाला तरी त्याला मोक्षाची सर येणार नाहीं. स्वर्गसुखही नश्वर आहे. स्वर्गसुख घेतल्यानंतर पुनः जन्ममरणाचे फेऱ्यांत प्राणी सांपडतो. अत एव सुखदुःखांची आत्यंतिक निवृत्ति होईल अशी तजवीज केली पाहिजे, असें महाभारतांत कंठरवानें सांगितलें आहे.

सर्व धार्मिक व आध्यात्मिक गोष्टींत वेदांचा अधिकार श्रेष्ठ मानला जात असे. जो वेद व शिष्टाचार यांस प्रमाण मानणार नाहीं तो इहलोक व परलोक ह्या दोहोंसही मुकतो असें एका स्थलीं सांगितलें आहे.[1] दुसऱ्या एका ठिकाणीं असें ह्मटलें आहेः—वृद्धांचें वचन असें आहे कीं, हा आपला (सनातन ?) धर्म श्रुतिप्रामाण्यावर रचलेला आहे.[2] ज्या गोष्टी मनुष्याच्या बुद्धीच्या आटोक्याबाहेरच्या आहेत व ह्मणून ज्या केवळ श्रद्धेनेंच ग्रहण करावयाच्या आहेत त्यांच्या संबंधानें शुष्क तर्कांचा कीस काढूं नये, असें सांगितलें आहे.[3] 'कारण तर्कानें खात्रीलायक असें कांहींच कळत नाहीं; श्रुतीसुद्धां परस्परविरुद्ध आहेत; असा एकही ऋषि नाहीं कीं, ज्याचीं मतें सर्वांस शिरसावंद्य आहेत; धर्माचें खरें रहस्य कशांत आहे हें एक मोठें गूढ आहे; ह्मणून कोणा तरी श्रेष्ठ पुरुषाची कास धरून त्याच्या मार्गानें जावें.'[1] श्रुतीच्या खालोखाल स्मृतींचें प्रामाण्य आहे. जर वैदिक वचनांविरुद्ध स्मृतिवचन असेल, तर श्रुतीपुढें तें त्याज्यच मानलें पाहिजे, असा सिद्धान्त झालेला होता. स्मृतींचा विशेष भर लोकांचे सामाजिक, धार्मिक व राजकीय आचारांचें नियमन करण्याकडेच होता.

यज्ञ. ऐहलौकिक व पारलौकिक सुखाचे प्राप्तीसाठीं वेद व ब्राह्मणें ह्यांमध्यें अनेक प्रकारचे याग सांगितलेले आहेत. समाजांतील निरनिराळ्या वर्णांच्या व आश्रमांच्या लोकांना अनेक नित्य व नैमित्तिक कर्में लावून दिलेलीं होतीं. ज्या काळीं ब्राह्मण ग्रंथ प्रवृत्त झाले, त्या काळीं यज्ञयागांकडेच ज्याप्रमाणें सर्व समाजाचें लक्ष होतें, त्याप्रमाणें तें भारतरामायणकालीं होतें असें दिसत नाहीं. पुरुषार्थसाधन यज्ञाशिवाय इतर मार्गांनीं करितां येतें असें ठरलें होतें. तथापि यज्ञ मुळींच केले जात नव्हते असें मात्र नाहीं. रामायणांत बालकांडाच्या चौदाव्या सर्गांत दशरथानें केलेल्या अश्वमेधाचें विस्तृत वर्णन आहे. त्याचप्रमाणें शौनक, धर्म इत्यादिकांनीं केलेल्या यज्ञांचें अनेक ठिकाणीं वर्णन आलें आहे. ह्या यज्ञांमध्यें हजारो मनुष्यांना कित्येक दिवस भोजन घालीत असत. ज्यावेळीं मोठमोठे सम्राट् यज्ञ करीत तेव्हां त्यांचे सामंतांकडे अतिथींची बडदास्त ठेवणें वगैरे कामें सोंपविण्यांत येत असत. जमलेल्या पाहुण्यांचा निरोप घेतांना

---

१. यस्य नार्षं प्रमाणं स्याच्छिष्टाचारश्च भामिनि । न वै तस्य परो लोको नायमस्तीति निश्चयः॥वन० ३१.२२. २. श्रुतिप्रमाणो धर्मोऽयमिति वृद्धानुशासनम् । सूक्ष्मा गतिर्हि धर्मस्य बहुशाखा ह्यनन्तिका ॥ ३. शुष्कं तर्कं परित्यज्य आश्रयस्व श्रुतिं स्मृतिम् । एकाक्षराभिसंबद्धं तत्त्वं हेतुभिरिच्छसि ॥ वन२००, ११२; हीच कल्पना वेदान्तसूत्रांत आहे. 'तर्काप्रतिष्ठानादपि अन्यथानुमेयमिति चेदेवमप्यविमोक्षप्रसंगः' २.१.११.

१. तर्कोऽप्रतिष्ठः श्रुतयो विभिन्ना नैको ऋषिर्यस्य मतं प्रमाणम् । धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां महाजनो येन गतः स पन्थाः ॥ वन० ३१३. ११७.

आधीं सन्मान कोणचा करावयाचा ह्यासंबन्धानें पुष्कळ कटकटी होत असत. यज्ञांत मारलेला पशु स्वर्गास जातो अशी समजूत होती.[1] एकंदरींत जनतेला यज्ञयागांचा कंटाळा येत चालला होता असें जागोजाग अहिंसेची जी स्तुति केलेली आहे त्यावरून वाटतें. अनुशासन पर्वाच्या ११९-व्या अध्यायांत अहिंसेची अतिशयच स्तुति केलेली आहे. 'अहिंसा परमो धर्मः' हे शब्द महाभारतांत अनेक ठिकाणीं येतात[2]. कांहीं लोकांचें असें ह्मणणें आहे कीं, लोकांच्या मनोवृत्तींत हा जो फरक झाला, तो गौतम बुद्धाच्या उपदेशाचें फळ होय. परंतु हें ह्मणणें सोपपत्तिक आहे असें दिसत नाहीं. वेदकाळीं यज्ञयागांचें जें एक जाळें झालें होतें, त्यांतून सुटण्याची इच्छा प्रबल व्हावी हें अगदीं साहजिक आहे. यज्ञयागादिक कर्मकांडाच्या खटाटोपाचा जेव्हां लोकांना वीट येऊं लागला, तेव्हांच बुद्धाचा प्रादुर्भाव झाला. अहिंसेकडे लोकमताचा ओघ फिरला हें बुद्धाच्या उपदेशाचें कार्य नसून कारण आहे.

वर्णव्यवस्था. सनातन धर्माचा पाया वर्णव्यवस्थेवर रचिलेला आहे. चातुर्वर्ण्य प्रत्यक्ष परमेश्वरानेंच निर्माण केलें असा समज भारतकालीं होता. पुरुषसूक्तामध्यें (ऋग्वेद १०-९०-१२) चार वर्णांचा उल्लेख आला आहे. चातुर्वर्ण्यासंबन्धानें याहून जास्त प्राचीन उल्लेख सांपडणें कठीण आहे. भारतरामायणकालीं चारांच्या अनेक जाति व पोटजाती झाल्या असाव्या. अगदीं आधुनिक काळीं सुद्धां जातिभेदाचें पूर्णपणें मण्डन करणारा मनुष्य चातुर्वर्ण्यावरच आपली भिस्त ठेवील. मूळ ईश्वरानेंच निर्माण केलेल्या चातुर्वर्ण्याचाच विकास ह्मणजे हल्लींच्या अनेक जाती व पोटजाती होत असें तो ह्मणेल. अयोध्याकाण्डांत चार वर्णांची उत्पत्ति पुरुषसूक्ताहून थोडी निराळी सांगितली आहे. ब्राह्मण हे परमेश्वराच्या मुखापासून झाले, क्षत्रिय वक्षःस्थलापासून, वैश्य मांड्यांपासून, व शूद्र पायांपासून.[1] समाजाच्या बाल्यावस्थेंत वर्णभेद नसून कालान्तरानें गुण, कर्म व आचारविचार यांच्या वैषम्यामुळें निरनिराळे वर्ण उत्पन्न झाले असें मत महाभारतकालीं प्रचलितें होतें.[2] वर्णोत्पत्तीची ही उपपत्ति बरोबर असण्याचा संभव आहे. समाजाच्या गरजा जसजशा वाढत जातात तसतसे निरनिराळे उदीमधंदे निघून श्रमविभागाचें तत्त्व प्रचारांत येतें. अशा रीतीनें समाजाचे निरनिराळे संघ बनतात. ह्या संघांना जातिभेदाचें रूप हिंदुस्थानांतच विशेषेंकरून कां यावें व पृथ्वीचे पाठीवरील इतर देशांत तें अगदीं थोड्या प्रमाणानें दृष्टीस पडावें किंबहुना ही स्थिति मुळींच दृग्गोचरही कां होऊं नये, याचें उत्तर समाधानकारक रीतीनें आह्मांला देतां येत नाहीं. आरंभीं वर्णभेद लवचीक असण्याचा फार संभव आहे. परंतु हळूहळू निरनिराळ्या उद्योगधंद्यांमुळें पडलेले विभाग वज्रलेप होऊन केवळ जन्मामुळें मनुष्य अमक्या जातीचा असें ठरूं लागलें; व जातिभेद

---

१. यज्ञेषु पशवो ब्रह्मन्वध्यन्ते सततं द्विजैः। संस्कृता किल मन्त्रैश्च तेऽपि स्वर्गमवाप्नुवन् ॥ वन० २०८.

२. अहिंसा परमो धर्मः सर्वप्राणभृतां वर। आदि० ११-१३. (ग. कृ. सुद्धां); अहिंसा परमो धर्मस्तथाऽहिंसा परो दमः । अहिंसा परमं दानमहिंसा परमं तपः ॥ अनु० ११६.३८. अहिंसा परमो धर्म इत्युक्तं बहुशस्त्वया । अनु० ११५.१.

---

१. मुखतो ब्राह्मणा जाता उरसः क्षत्रियास्तथा । ऊरुभ्यां जज्ञिरे वैश्याः पद्भ्यां शूद्रा इति श्रुतिः ॥ पुरुषसूक्तांत बाहूपासून क्षत्रिय झालें असें वर्णन आहे.

२. न विशेषोऽस्ति वर्णानां सर्वं ब्राह्ममिदं जगत् । ब्रह्मणा पूर्वसृष्टं हि कर्मभिर्वर्णतां गतम् ॥ शान्ति० १८८. १०.

हें हिंदुधर्माचें एक मुख्य लक्षण झालें आहे. एके ठिकाणीं प्रत्येक वर्णांतील मनुष्याच्या शरीराचा एक विशिष्ट रंग आहे असें सांगितलें आहे. ब्राह्मणांचा शुभ्र वर्ण, क्षत्रियांचा लाल, वैश्यांचा पिंवळा व शूद्रांचा काळा. ह्या श्लोकाचा थिऑसफीस्टांकडून कदाचित् असा अर्थ करण्यांत येईल कीं, वर सांगितलेला रंग हा स्थूल शरीराचा नव्हे तर सूक्ष्म शरीराचा मानला पाहिजे. वर्णोत्पत्तीचें मूळ कांहींही असो, भारतरामायणकाळीं वर्णव्यवस्थेवरच सर्व सामाजिक बन्धनें अवलंबून होतीं. प्रत्येक समाजांत व्यक्तींचें परस्पर तारतम्य ठरविण्याचीं कांहीं तरीं तत्त्वें असतातच. पाश्चात्य देशांतही संपत्ति व पदवी ह्यांचे योगानें मनुष्यामनुष्यांत जातिभेदाप्रमाणेंच उच्चनीचभाव मानला जातो; उच्च मानलेल्या व नीच मानलेल्या कुटुंबांचा संबन्ध होणें बहुतेक दूरापास्तच असतें. परंतु पाश्चात्यांची समाजघटना केवळ जन्मानें प्राप्त झालेल्या पदवीला महत्त्व देत नाहीं. त्यांच्या समाजांत अगदीं हलक्या दर्जाच्या माणसालाही अगदीं उच्च मानलेल्या अमीर उमरांवाच्या मांडीला मांडी लावून बसतां येणें शक्य आहे, व त्याला स्वतःही अमीर उमराव होतां येतें. भारतवर्षांतही प्रथम वर्णव्यवस्था वर ह्मटल्याप्रमाणें लवचीकच असली पाहिजे. विश्वामित्र ब्रह्मर्षि झाला ही गोष्ट ह्याच स्थितीचें द्योतक आहे. भारतकालीं वर्णव्यवस्थेचा लवचीकपणा पार नाहींसा होऊन एका जातीच्या मनुष्याला दुसऱ्या जातींत शिरणें एकाच जन्मांत तरी निदान अशक्य झालें होतें. ब्राह्मण व क्षत्रिय आपल्या पदवीस साजेल असें वर्तन जोंपर्यंत करीत होते तोंपर्यंत विशेष कुरकुर ऐकूं येत नव्हती. जेव्हां ब्राह्मण क्षत्रिय आपलें कर्तव्य सोडून देऊं लागले, आपल्या उच्च स्थानापासून भ्रष्ट होऊन इतरांचीं कर्में करूं लागले, तेव्हां जातिभेदाचें शल्य नीच मानलेल्या लोकांचे हृदयांत बोचूं लागलें. ह्या विसाव्या शतकांत अनेक सुशिक्षित लोक जातिभेदास तिलांजलि देण्यास निघाले आहेत. त्यांच्या कार्यक्रमाची युक्तायुक्तता किंवा शक्याशक्यता ठरविण्याचें प्रस्तुत लेखकास सामर्थ्य नाहीं व ह्या निबन्धांत तसें करण्याचें कारणही नाहीं. जातिभेदाचें निर्मूलन करण्यासाठीं जे प्रयत्न चालले आहेत, त्यांविषयीं लेखकाचें इतकें मात्र मत झालें आहे कीं, कमी मानल्या जाणाऱ्या जातींची उच्च मानल्या जाणाऱ्या जातींत आपली गणना व्हावी अशी फार धडपड चालली आहे. परंतु त्यांचेपेक्षां नीच मानल्या जाणाऱ्या जातींना आपल्यांत सामील करून घेण्याची किंवा त्यांना बरोबरीनें वागविण्याची शतांशही खटपट त्यांजकडून होत नाहीं!! असो. वर्णव्यवस्थेंत अग्रभागीं ब्राह्मण होते व शूद्र हे सर्वांत कमी दर्जाचे मानले जात असत. शूद्रांना वेदाध्ययनाचा अधिकार नव्हता[1]. यावरून असें समजावयाचें नाहीं कीं त्यांस केवळ अज्ञानांधकारांत चांचपडत ठेविलें होतें. महाभारतासारखे ग्रन्थ वाचण्यास किंवा पठण करण्यास शूद्रांस पूर्ण मुभा होती; व स्वकर्में यथायोग्य केल्यास त्यांनाही मोक्षाचे दरवाजे खुले होतील असा सार्वत्रिक समज होता.

आद्य तीन वर्णांत परस्परांबद्दल थोडीबहुत सहानुभूति होती;परंतु शूद्राला[2] द्विजांचे कोणतेही विशिष्ट हक्क नव्हते. त्यांचे उपनयनादि संस्कार होत नसत. त्यांस तपश्चर्या करतां येत नसे.

१ ब्राह्मणानां सितो वर्णः क्षत्रियाणां तु लोहितः। वैश्यानां पीतको वर्णः शूद्राणामसितस्तथा॥ शान्ति० १८८.५.

१. न च शूद्रसमाभ्यासे वेदानुचारयन्त्युत। आदि० ६४.२०(ग. कृ. मुद्रां)

२. अनुशासनपर्व १४३.

शंबूक नांवाच्या शूद्रानें स्ववर्णाला अनुचित असें तपश्चरण केल्यामुळें रामानें त्याचा वध केला. एकलव्य नांवाच्या निषादाला द्रोणानें धनुर्विद्या शिकविली नाहीं. कर्ण सूतपुत्र आहे असा समज असल्यामुळें कृपाचार्यानें कर्णाला अर्जुनाशीं लढूं दिलें नाहीं. भीमानेंही कर्णाला टोमणा मारला कीं तूं आपल्या कुलाला उचित असा चाबूक हातांत घे.[1] शूद्रांनीं ब्राह्मणांची दुरूनच सेवा करावी[2] असें एका ठिकाणीं ह्मटलें आहे, यावरून शूद्रस्पर्शाचा विटाळ मानीत असें दिसतें.

वरच्या तिन्ही वर्णांत ब्राह्मण श्रेष्ठ मानले जात होते व त्यांस सवलतीही फार होत्या. सर्व समाजाचे ब्राह्मण हे पुढारी होते. स्वतः दारिद्र्यांत राहून विद्यादेवीची ते निःसीम आराधना करीत. ह्यामुळें ब्राह्मणांनीं आपणाला पैशाखेरीज बाकी सर्व बाबतींत अति उच्च पदास नेलें होतें. राजे लोक त्यांच्या शब्दाप्रमाणें चालत. महाभारतांत जेथें तेथें ब्राह्मणांची विपुल स्तुति केलेली आह.[3] पुष्कळ ठिकाणीं ब्राह्मण देवांसमान आहेत असें सांगितलें आहे. 'ते क्रुद्ध झाले तर जग भस्म करितील; क्षत्रियांचें बळ ब्राह्मणांचे बलापुढें अगदींच फिकें; ब्राह्मणांच्या नमस्कारांमुळें आकाशांत सूर्य प्रकाशतो'. ब्राह्मणांनीं जरी समाजाचें स्वार्थनिरपेक्ष बुद्धीनें कल्याण केलें होतें, तरी त्यांची स्तुति इतके वेळां व इतकी अवास्तव केलेली आहे कीं शेवटीं वाचणारालाही वीट येतो.[1] अविद्वान् अशा ब्राह्मणासही मान दिला पाहिजे, असें एके ठिकाणीं सांगितलें आहे[2].

ब्राह्मणादि तीन वर्णांना परस्परांकडे अन्न घेण्यास हरकत नव्हती. परंतु शूद्राकडील अन्न तीन्ही वर्णांना वर्ज्य होतें. 'जो शूद्रांकडचें अन्न खातो तो पृथ्वीचा मळ खातो'.[3] ब्राह्मणादि तीन वर्णांना आपल्या वर्णाच्या किंवा आपणाहून कमी वर्णाच्या मुलीशीं विवाह करितां येत असे, परंतु आपणाहून श्रेष्ठ वर्णाच्या मुलीशीं लग्न करितां येत नसे. ह्मणजे ब्राह्मणाला क्षत्रिय किंवा वैश्य कन्येचें पाणिग्रहण करितां येत असे, क्षत्रियाला वैश्यकन्येचें पाणिग्रहण करितां येत असे; परंतु क्षत्रियास अथवा वैश्यास ब्राह्मणकन्येशीं विवाह करितां येत नसे. ऋचीक व त्याचा पुत्र जमदग्नि हे ब्राह्मण असून त्यांनीं क्षत्रियकन्यांशीं विवाह केले होते. शंतनूनें क्षत्रिय नसलेल्या कन्येचें पाणिग्रहण केलें. परंतु शुक्रकन्या देवयानी हिनें जेव्हां ययातिराजाची भार्या होण्याची इच्छा दर्शविली तेव्हां तो ह्मणाला कीं, देवयानी, तुझ्या बापाचा व क्षत्रियांचा विवाह होणें शक्य नाहीं.[4]

निरनिराळ्या वर्णांच्या स्त्रीपुरुषांच्या संबन्धापासून पोटजाति निर्माण झाल्यौ. अनुशासन पर्वाच्या ४८ व्या अध्यायांत चार वर्ण व पोटजाति यांचें विस्तारेंकरून वर्णन आहे.

१. न त्वमर्हसि पार्थेन सूतपुत्र रणे वधम् । कुलस्य सदृशस्तूर्णं प्रतोदो गृह्यतामयम् ॥ आदि० १३९. ६. (ग. कृ. १३७, ६.) २. दूराच्छूद्रेणोपचर्यो ब्राह्मणोऽग्निरिव ज्वलन् । अनु० ५९. ३३. ३. ब्राह्मणा हि महद्भूतमस्मिँल्लोके परत्र च । भस्म कुर्युर्जगादिदं क्रुद्धाः प्रत्यक्षदर्शिनः ॥ अनु० १६०.१२; न बलं क्षत्रियस्याहुर्ब्राह्मणा बलवत्तराः । ब्रह्मन्ब्रह्मबलं दिव्यं क्षात्राच्च बलवत्तरम् ॥ बालकाण्ड ५४.१४; ब्राह्मणानां नमस्कारैर्दिवि सूर्यो विराजते ॥ वनपर्व ३०२.१६.

१. अनु० अध्याय ३३, ३४ व १६० पहा. २. यथा श्मशाने दीप्तौजाः पावको न प्रदुष्यति। एवं विद्वानविद्वान्वा ब्राह्मणो दैवतं महत् ॥ वन० २००-८९. ३. शूद्राणामथ यो भुंक्ते स भुंक्ते पृथिवी-मलम् ॥अनु० १३५. ४. अविवाह्या हि राजानो देवयानि पितुस्तव। आदि. ८१.१८ (ग. कृ. मुद्रां). ५. चतुर्णामेव वर्णानामागमः पुरुषर्षभ । अतोऽन्ये त्वतिरिक्ता ये ते वै संकरजाः स्मृताः ॥ शान्ति०२९७. ७.

शान्तिपर्वांत अम्बष्ठ, सूत, मागध, श्वपाक वगैरे अनेक जातींचा उल्लेख आहे[१].

चार वर्णांचीं कर्तव्यें.

यज्ञानुष्ठान, वेदाध्ययन व दान हीं तीन्ही कर्तव्यें ब्राह्मणादि तीन वर्णांना समान होतीं. ऋत्विक्कर्म, वेदाध्ययन, दान घेणें हे तीन ब्राह्मणांचे विशिष्ट हक्क होते. क्षत्रियांचें विशिष्ट कर्म ह्मणजे प्रजापालन, वैश्यांचें कृषिकर्म व वाणिज्य. आणि शूद्राचें कर्तव्य ह्मणजे तीन वर्णांची सेवा[२]. अनुशासनपर्वाच्या १४१ व्या अध्यायांत चार वर्णांचीं कर्तव्यें विस्तारानें दिलीं आहेत. ब्राह्मण आपल्या हक्कांना फार जपत असत. प्रत्येक क्षत्रियाचा कुलक्रमागत एक पुरोहित असे. जर त्याला टाकून दुसऱ्याला त्यानें पौरोहित्य दिलें, तर त्याला शाप मिळण्याचा संभव असे. त्रिशंकूनें वसिष्ठाला टाकून विश्वामित्राला पुरोहित केल्यामुळें त्याला शाप मिळाला. विश्वामित्र हा राजर्षि असून शापामुळें चाण्डाल झालेल्या त्रिशंकूसाठीं जेव्हां यज्ञ करूं लागला तेव्हां ब्राह्मण ह्मणाले, स्वतां चाण्डाल असून ज्याचा उपाध्याय क्षत्रिय आहे त्याचे येथें देव हविर्भाग कसा ग्रहण करितील[३] ?

वर वर्णन केल्याप्रमाणें जरी ब्राह्मणांचे हक्क मोठे होते व जरी त्यांचें रक्षण डोळ्यांत तेल घालून ते करीत असत, तरी केवळ जन्मानें प्राप्त झालेला उच्चनीचभाव झुगारून देऊन उच्चता किंवा नीचता मनुष्याच्या शीलावर व कृतींवर अवलंबून आहे असें भारतांतही कित्येक स्थळीं प्रतिपादन केलें आहे. "ज्या मनुष्यांत सत्य, दान, क्षमा, शील, तपश्चर्या, दया हीं दिसतील तो ब्राह्मण होय. कुल, वेदाध्ययन किंवा विद्वत्ता यांनीं द्विजत्व प्राप्त होत नाहीं, तर तें उत्तम आचरणानेंच प्राप्त होतें. वर सांगितलेले गुण जर शूद्रांत असतील तर तो ब्राह्मण समजावा व ब्राह्मण ह्मणविणारांत जर ते नसतील तर तो ब्राह्मण नव्हे'.[१] विशेषतः सर्प व युधिष्ठिर यांचा संवाद व यक्ष आणि युधिष्ठिर यांचा संवाद ह्यांत ह्या मुद्यावर जोर दिलेला आहे. ब्राह्मणांना उगाच फार सवलती आहेत, प्रजापालन हा क्षत्रियांचा धर्म आहे, क्षत्रियांवर ब्राह्मण अवलंबून आहेत, क्षत्रियांवर ब्राह्मण चरतात ह्मणून क्षत्रियच श्रेष्ठ, ब्राह्मण श्रेष्ठ कसे होतील, असें सहस्रार्जुन कार्तवीर्य अनुशासनपर्वांत ह्मणतो[२].

दारू, मांस, चामडीं, लोखंड यांचा विक्रय करणारे, तेली, शस्त्रक्रिया करणारे, मृगया करणारे, चाण्डाल हे समाजांत अत्यंत नीच मानले जात असत[३]. कोणी कितीही नीच

---

१. क्षत्रियातिरथाम्बष्ठा उग्रा वैदेहकास्तथा । श्वपाकाः पुल्कसाः स्तेना निषादाः सूतमागधाः ॥ अयोगाः करणा व्रात्याश्चण्डालाः ॥ २९७. ८-९. २. यज्ञाध्ययनदानानि त्रयः साधारणाः स्मृताः । याजनाध्यापने विप्रे धर्मश्चैव प्रतिग्रहः ॥ वन० १५०. ३४-३५. पालनं क्षत्रियाणां वै वैश्यधर्मश्च पोषणम् । शुश्रूषा च द्विजातीनां शूद्राणां धर्म उच्यते ॥ वन० १५०. ३५-३६. ३. क्षत्रियो याजको यस्य चण्डालस्य विशेषतः । कथं सदसि भोक्तारो हविस्तस्य सुरर्षयः ॥ बालकाण्ड ५९.१३-१४

१. सत्यं दानं क्षमा शीलमानृशंस्यं तपो घृणा । दृश्यन्ते यत्र नागेन्द्र स ब्राह्मण इति स्मृतः ॥ वन० १८०.२१; शृणु यक्ष कुलं तात न स्वाध्यायो न च श्रुतम् । कारणं हि द्विजत्वे च वृत्तमेव न संशयः ॥ वन० ३१३.१०८; शूद्रे चैतद्भवेल्लक्ष्यं क्षत्रिये तन्न विद्यते । न वै शूद्रो भवेच्छूद्रो ब्राह्मणो न च ब्राह्मणः ॥ शान्ति० १८९.८. २. ब्राह्मणाः संश्रिताः क्षत्रं न क्षत्रं ब्राह्मणाश्रितम् । श्रिता ब्रह्मोपधा विप्रा खादन्ति क्षत्रियान् भुवि ॥ क्षत्रियेष्वाश्रितो धर्मः प्रजानां परिपालनम् । क्षत्राद्वृत्तिर्ब्राह्मणानां तैः कथं ब्राह्मणो वरः॥अनु०१५३ १७-१८. ३. अनुशा० १२५.९ इत्यादि; शान्तिं २९५०५ इ०.

जातीचा असला तरी त्यानें स्वतांचें कर्म केलें पाहिजे; जर त्यानें तें सोडून दिलें तर त्याला पाप लागेल;—असें प्रतिपादन धर्मव्याधानें केलें आहे.[1]

अवतार. साधूंचा छळ होऊन लोक दुर्वृत्त झाले ह्मणजे साधूंचें रक्षण करण्याकरितां व दुष्टांना शासन करण्याकरितां परमेश्वर अवतार घेतो ही समजूत भारतरामायणकाळीं होती;[2] व तीच आजही अनेक धार्मिक व भाविक लोकांची आहे. भीष्मपर्वाच्या ६५ व ६६ ह्या अध्यायांत ह्या कल्पनेवर विशेष जोर दिलेला आहे. राम हा विष्णूचा अवतार असें प्रतिपादन अनेक ठिकाणीं केलेलें आहे.[3] कृष्ण हा विष्णूचा अवतार असें प्रतिपादन करून त्याची अति उदात्त स्तुति सर्व महाभारतांत जागोजाग केलेली आहे. आदिपर्वाच्या १९७ व्या अध्यायांत (ग.कृ.प्रत) कृष्ण हा विष्णूच्या कृष्ण केशापासून झाला असें वर्णन आहे. अनुशासनपर्वाच्या १४७ व्या अध्यायांत कृष्ण व परब्रह्म यांचें तादात्म्य शिवानें प्रतिपादिलें आहे. शान्तिपर्वांत (अ. ३४०, ७७ पासून पुढें) विष्णूच्या वराहावतारापासून कृष्णावतारापर्यंतचें भविष्य कथन केलें[4] आहे. ह्या अवतारांत बुद्धाचें नांव नाहीं. हल्लीं विष्णूच्या दहा अवतारांत हंस हें नांव नाहीं. बुद्धाला चोर व नास्तिक हीं विशेषणें रामायणांत लाविलेलीं आहेत.[1] हा श्लोक प्रक्षिप्त असावा असें वाटतें; सर्व प्रतींत तो सांपडत नाहीं व त्याचा मागें पुढें संबन्ध बरोबर लागत नाहीं.

१ (ब) तत्त्वज्ञान.

धर्म आणि तत्त्वज्ञान ह्यांची हिंदुस्थानांत कधींही फारखत झाली नव्हती. विचारस्वातंत्र्याचे मार्गांत स्पेनमधील इन्किझिशनप्रमाणें कसलीही भीती नव्हती. दोनतीन सनातन सिद्धांतांस जो चिकटून राही त्याचीं इतर मतें कांहींही असलीं तरी त्याला आस्तिक मानण्यांत येत असे. सनातन धर्माप्रमाणें जरी एखाद्या मनुष्याचीं किंवा समूहाचीं मतें नसलीं तरी त्या मनुष्यास किंवा समूहास छळाची विशेष भीति नसे. वेदांचें प्रामाण्य, चातुर्वर्ण्याचें अनादित्व, व पुनर्जन्म, ह्या तीन गोष्टी प्रत्येक तत्त्वज्ञान्याला कबूल कराव्याच लागत. तसें न केल्यास त्याला नास्तिक व पतित असें समजत. जरी गौतम बुद्धानें वेद व चातुर्वर्ण्य हीं झुगारून दिलीं तरी पुनर्जन्माच्या मोहक कल्पनेंतून त्याला सुटतां यईना.

भारत व रामायण ह्यांची रचना होण्यापूर्वीं तत्त्वज्ञानविषयक विचारांत फारच मोठी क्रान्ति घडून आली होती. वेद व ब्राह्मणें ह्या ग्रन्थांत यज्ञयागांनाच फार प्राधान्य होतें हें वर सांगितलेंच आहे. परंतु मनुष्याच्या मनाला ज्यामुळें तळमळ लागून रहाते अशा प्रकारचीं संसारांतील गूढें यज्ञयागांतील कवाइतीसारख्या कर्मांनीं थोडींच विशद होणार आहेत! ह्यामुळें वेदब्राह्मणकाळींच विचारवान् लोक दृष्ट चम-

१. कुलोचितमिदं कर्म पितृपैतामहं परम् । वर्तमानस्य मे धर्मे स्वे मन्युं मा कृथा द्विज॥ वन० २०७. २०; स्वकर्म त्यजतो ब्रह्मन्नधर्म इह दृश्यते । वन० २०८.१८. २. यदा धर्मो ग्लाति वंशे सुराणां तदा कृष्णो जायते मानुषेषु। अनुशासन० १५९-१२; नष्टधर्मव्यवस्थानां काले काले प्रजाकरः । उत्पद्यते दस्युवधे शरणागतवत्सलः॥ उत्तरकाण्ड ८.२७. ३. स हि देवै रुदीर्णस्य रावणस्य वधार्थीभिः । अर्थितो मानुषे लोके जज्ञे विष्णुः सनातनः ॥ अयोध्याकाण्ड १.७. ४. हंसः कूर्मश्च मत्स्यश्च प्रादुर्भावाद्द्विजोत्तम॥वराहो नारसिंहश्च वामनो राम एव च ॥ रामो दाशरथिश्चैव सात्वतः कल्किरेव च॥ शान्ति ३४०.१०३-१०४.

१. यथा हि चोरः स तथा हि बुद्धस्तथागतं नास्तिकमत्र विद्धि । अयोध्याकाण्ड १०९.३४.

त्कार व मानवी अंतःकरण ह्यांसंबन्धानें गहन विचार करूं लागले. अशा रीतीनें शेंकडो वर्षे विचार चालल्यावर दिव्यप्रतिभासंपन्न ऋषींस जें ज्ञान प्राप्त झालें, तें उपनिषदादि ग्रंथांत त्यांनीं सांठविलें. पुष्कळ उपनिषदांत यज्ञयागांबद्दल विशेष आदर दाखविलेला नाहीं. 'यज्ञयाग हे फुटक्या होड्या आहेत; यज्ञयागांवरच ज्यांची भिस्त आहे त्यांस जन्ममरणाच्या फेऱ्यांत सांपडावें लागतें'.[1] निःश्रेयस प्राप्त होण्याला ज्ञानच कारण आहे. महाभारतांत देखील ह्याच औपनिषद सिद्धांतावर जोर दिलेला आहे. तथापि, आपण कोण, कोठून आलों, कोठें जाणार, दुःख व सुख कशानें प्राप्त होतें,— वगैरे जे गूढ प्रश्न आहेत त्यांचीं उत्तरें देण्याचा प्रयत्न करणारीं अनेक दर्शनें महाभारतांत आढळतात. यावरून त्या काळीं तत्त्वज्ञानविषयक चर्चेनें समाजांत मोठी खळबळ उडाली होती, असें अनुमान करण्यास हरकत नाहीं.

वेदान्त तत्त्वज्ञान हें त्या काळीं सर्वांत प्रधान होतें. त्याचें दिग्दर्शन वर केलेंच आहे. त्यापेक्षां जास्त या लहानशा निबन्धांत करणें शक्य नाहीं. वेदान्ताचे खालोखाल सांख्यदर्शनाचा उल्लेख अनेक ठिकाणीं आलेला आहे.

येथें एवढें मात्र लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, सांख्यसिद्धान्ताचें प्रतिपादन जेव्हां जेव्हां महाभारतांत आढळतें, तेव्हां तेव्हां सांख्यकारिका वगैरे त्या शास्त्रावरील प्रमाणभूत ग्रन्थांत जसा निर्भेळ सांख्यसिद्धांत दिसतो तसा महाभारतांत सांपडत नाहीं. सांख्य व वेदान्त यांचें मिश्रणच पुष्कळ ठिकाणीं सांपडतें. महाभारतांतील सांख्य, ईश्वराचें अस्तित्व मानतो; परंतु खऱ्या निर्भेळ सांख्य सिद्धांतांत ईश्वराचें अस्तित्व सिद्ध करितां येत नाहीं असें स्थापित केलेलें असतें. जरी सांख्यदर्शन वेदान्त सिद्धान्ताइतकें कदाचित् प्राचीन नसलें, तरी तें प्राचीन दर्शनांपैकीं एक आहे. श्वेताश्वतर वगैरे उपनिषदांत सांख्यदर्शनाचा अनुवाद आढळतो. सांख्यतत्त्वज्ञानाचे आद्य प्रवर्तक जे कपिलमुनि त्यानीं तें आसुरिनामक शिष्यास शिकविलें व आसुरीनें पंचशिखास शिकविलें, असें शान्तिपर्वांत (अध्याय २१८.९–१९)[1] आहे. सांख्य सिद्धांत असा आहे— प्रकृति किंवा प्रधान व पुरुष अशीं दोन मूलतत्त्वें आहेत. प्रकृति स्वतः अचेतन आहे; पुरुष हा सचेतन असून प्रेक्षकवत् आहे. ह्या दोन तत्त्वांचे संपर्कानें सर्व प्रपंच एका विशिष्ट क्रमानें निर्माण होतो. सत्त्व, रजस् व तमस् ह्या तीन गुणांची साम्यावस्था ह्मणजेच प्रकृति किंवा प्रधान होय. ह्या साम्यावस्थेचा भंग झाला ह्मणजे सृष्टि उत्पन्न होते. प्रकृतीपासून महत्, त्यापासून अहंकार, त्यापासून अत्यंत सूक्ष्म पंच तन्मात्र, आणि त्यांच्यापासून पंचमहाभूतें असा क्रम आहे. आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक अशा तीन प्रकारचे दुःखापासून मुक्त होऊन पुरुषाला कैवल्य प्राप्त होण्याला सत्त्व इत्यादि तीन गुण व पुरुष यांचें यथार्थ ज्ञान हेंच केवळ एक कारण आहे. हें जें सांख्यदर्शनाचें सार आह्मीं दिलें आहे, त्यासाठीं शान्तिपर्व (अध्याय २१०, ३०७, ३११) आधारास घेतलें आहे. क्वचित् स्थळीं सांख्यांनीं मानलेल्या पंचवीस तत्त्वांशिवाय सव्विसावें तत्त्व त्यांचे सिद्धांताचें ह्मणून दिलें आहे. २६ वें तत्त्व ह्मणजे परमेश्वर होय. शान्तिपर्वांत (३०१–७७) सांख्यतत्त्वज्ञानानें परमात्म्याशीं

१. प्लवा ह्येते अदृढा यज्ञरूपा अष्टादशोक्तमवरं येषु कर्म । एतच्छ्रेयो येऽभिनन्दन्ति मूढा जरामृत्युं ते पुनरेवापि यन्ति ॥ मुण्डकोप० १.१.७.

१. हेंच सांख्यकारिकेंत सांगितलें आहे. एतत्पवित्रमग्र्यं मुनिरासुरयेऽनुकम्पया प्रददौ । आसुरिरपि पंचशिखाय तेन च बहुधा कृतं तन्त्रम् ॥ ७०,

तादात्म्य प्राप्त होतें असें सांगितलें आहे. परंतु कपिलमुनींनीं प्रतिपादलेल्या दर्शनांत विश्वाचा नियामक असा ईश्वर मुळींच मानलेला नाहीं.

सांख्यदर्शनाप्रमाणेंच योगदर्शनही फार पुरातन आहे. उपनिषदांतही क्वचित् योगाचा उल्लेख आहे. महाभारतांत योगाच्या यमनियमादि अष्टांगांचा निर्देश आहे.[१] योगमार्गाचें श्रेष्ठत्व फारच सांगितलें आहे, परंतु तो अति दुर्गम आहे असेंही तेथेंच सांगून टाकलें आहे.[२] योग्यांना प्राप्त होणाऱ्या अणिमादि सिद्धींचें वर्णन शान्तिपर्वांत (अध्याय ३०१) केलेलें आहे.

भगवान् नारायणाचे मुखांतून पंचरात्र सिद्धान्त ऐकून नारदानें पृथ्वीवर प्रचलित केला.[३] भगवान् वासुदेवाचे वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न व अनिरुद्ध हे जे चार व्यूह ते अनुक्रमें परमात्मा, जीवात्मा, मन व अहंकार होत, असें शान्तिपर्वांत सांगितलें आहे (अध्याय ३४०. ४०– ४१).

तर्कशास्त्रही फार परिणत स्थितीला पोंचलें होतें. पञ्चावयवयुक्त वाक्याचा उल्लेख सभापर्वांत (अ. १९.९) केलेला आहे. तार्किकांच्या विचारसरणीच्या यन्त्रांत सांपडून बहुजनसमाजाला मान्य असलेल्या पुष्कळ गोष्टींचा चुराडा झाला होता. कांहीं तार्किक प्रत्यक्ष ईश्वराचें अस्तित्वही कबूल करीत नसत. ह्या कारणांनीं तार्किकांविरुद्ध लोकमताचा प्रवाह वाहूं लागला. शिवाय तार्किकांमध्यें अनेक गोष्टींसंबन्धानें ऐकमत्य नव्हतें. ह्यामुळें महाभारतकाळीं तर्काची निन्दा करण्यांत येऊं लागली. तर्कानें ठाम असें कांहींच ठरत नाहीं. जें एका तार्किकानें आज निश्चित ह्मणून ठरवावें, तें उद्यां दुसऱ्यानें खोडून काढावें असें होई. यामुळें तर्कावर विशेष भिस्त ठेवूं नये असें पुष्कळ तत्त्वज्ञान्यांनीं ठरविलें. परंतु तर्काला अगदींच थारा नाहींसा झाला असें मात्र नाहीं. ज्या वस्तु अचिंत्य आहेत त्या तर्काचे कसोटीस लावूं नये.[१] श्रुतींत सांगितलेल्या सिद्धान्तांविरुद्ध जर तर्क जाईल तर तो त्याज्य समजावा. श्रुतीला जर तर्क उपोद्बलक असेल तर तो आदरानें ग्रहण करावा अशी मर्यादा ठरली. यावरून असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं कीं, सप्रमाण व श्रद्धायुक्त तर्काविरुद्ध व्यासांचें कांहीं ह्मणणें नाहीं.

वर ह्मटल्याप्रमाणें अहिंसेच्या स्तुतीवरून बुद्ध महाभारतकाराला माहित होता असें मानतां येत नाहीं. समग्र महाभारतांत बुद्धाचें नांव नाहीं, व रामायणांतही जो एक श्लोक आढळतो तो प्रक्षिप्त असण्याचा संभव आहे. बुद्धापूर्वीं त्याचेसारखेच विचार पुष्कळांचे मनांत आले असले पाहिजेत. तो एखाद्या धूमकेतूप्रमाणें एकाएकीं आगापिच्छा नसतां उदयास आला असें मानतां येत नाहीं. ज्या विचारांनीं पुष्कळांचे मनांत खळबळ उडवून दिली होती, त्या विचारांना बुद्धाचे तोंडांतून द्वार मिळालें एवढेंच काय तें. उपनिषदांतही वेद व यज्ञ यांचे संबन्धानें थोडासा अनादर दाखविलेला आहे. ऋग्वेद वगैरे ग्रन्थांना अपरा विद्या असें उपनिषदांत ह्मटलें आहे. तथापि सर्व महाभारत वाचून असा ग्रह होतो कीं सनातन धर्म व त्याचे आधारस्तम्भ जे ब्राह्मण ह्यांवर कोठून तरी जोराचा हल्ला झाला असला पाहिजे. एरवीं पुनः पुनः धर्म ह्मणजे काय, ब्राह्मणांचें श्रेष्ठत्व केवढें

१. वेदेषु चाष्टगुणितं योगं प्राहुर्मनीषिणः । शान्ति० ३१७.७.२. दुर्गस्त्वेष महापन्था ब्राह्मणानां विपश्चिताम्। यः कश्चिद् व्रजति ह्यस्मिन् क्षेमेण भरतर्षभ ॥ शान्ति० ३०१.५०. ३. सांख्ययोगकृतं तेन पंचरात्रानुशब्दितम्। नारायणमुखोद्गीतं नारदोऽश्रावयत्पुनः ॥ शान्ति० ३४०.११२.

१. अचिन्त्याः खलु ये भावा न तांस्तर्केण योजयेत्। भीष्म० ५.१२

आहे, हे विषय विस्तारानें चर्वितचर्वण करून वर्णन करण्यांत आले नसते.

आदिपर्वांत (३.१२७; ग. कृ.) नग्न क्षपणकाचा उल्लेख आला आहे. अयोध्याकाण्डांत एका ठिकाणीं कोणत्याहा देशांतील नास्तिक बोलणार नाहीं अशीं वाक्यें आहेत. कोण कोणाचा बन्धु आहे. मनुष्य एकटा जन्मतो व एकटाच मरतो. त्याचे बरोबर कोणी येत नाहीं. श्राद्धें वगैरे करणें हा केवळ अन्नाचा अपव्यय आहे. इहलोकांत एकानें खाऊन जर परलोकीं दुसऱ्याला मिळतें तर प्रवासाला गेलेल्या माणसाला घरच्या मंडळीनें श्राद्ध केलें असतां पोटभर अन्न मिळावें. खरोखर परलोक ह्मणून कांहीं नाहीं. जें प्रत्यक्ष डोळ्यांनीं दिसेल तवढेंच ग्राह्य समजावें[1]. संकटांमुळें चांगल्या मनुष्यांनाही पुण्य व पाप ह्यांसंबंधानें मोह पडे. पुण्यवानासही संकटें गांजतात व पापीही आमरण सुखांत असतो, ह्मणून धर्म किंवा अधर्म कांहींच नाहीं, असें लक्ष्मणानें निराशेनें ह्मटलें आहे[2].

२. कौटुंबिक स्थिति.

दुसऱ्या अनेक बाबींप्रमाणें ह्या बाबतींतही

स्त्रीवर्गाबद्दल मत.

परस्परविरोधी असा पुष्कळ पुरावा आह. प्रथमतः स्त्रियांची ज्यांत निन्दा केली आहे किंवा त्यांचा अनादार केला आहे अशीं कांहीं निवडक वाक्यें दतों. 'स्त्रियांचा हा स्वभावच दिसून येतो कीं त्या चंचल, धर्महीन, तीक्ष्ण व कलहाग्नि पेटविणाऱ्या असतात.' 'स्त्रिय ह्या अनृतवादी आहेत असें सूत्रकारानें ठरविलें आहे'. 'त्या स्वभावतः निर्मर्याद असून वडील माणसें चाकर नोकर यांचे भीतीनें व त्यांस बिघडविणारे नसल्यामुळें मर्यादेंत रहातात. लाखों स्त्रियांत एखादीच पतिव्रता असते.'[3] अनुशासनपर्वाच्या ३८ व्या अध्यायांत स्त्रियांची परमावधीची निंदा केली आहे, व ती निन्दा एका स्त्रीकडूनच वदविली असल्यामुळें तिचें तैक्ष्ण्य फारच झोंबणारें आहे. 'स्त्रियांपेक्षां ज्यास्त पापी कांहीं नाहीं; सुऱ्याची धार, विष, सर्प, व अग्नि हीं सर्व स्त्रियांत एकवटलीं आहेत[4].' 'बालपणीं पिता रक्षण करतो, यौवनांत भर्ता, व वार्धक्यांत पुत्र रक्षण करितात; अशा रीतीनें स्त्रियांना स्वातन्त्र्य नाहीं, असें प्रजापतीचें मत आहे.[5]' कांहीं ठिकाणीं स्त्रियांवर इतके घाणेरडे व असभ्यपणाचे आरोप केले आहेत कीं ते येथें लिहिणें शिष्टाचारास सोडून होईल.

आतां स्त्रियांची ज्यांत स्तुति केली आहे अशीं कांहीं वाक्यें देऊं. 'जेव्हां जेव्हां स्त्रियांचें पाऊल वांकडें पडतें, तेव्हां तेव्हां खरोखर पुरुषाचाच अपराध असतो[6].' 'ज्या ठिकाणीं स्त्रि-

---

१. अयोध्याकाण्ड १०८.३ इत्यादि. २. शुभे वर्त्मनि तिष्ठन्तं त्वामार्य विजितेन्द्रियम् । अनर्थेभ्यो न शक्नोति त्रातुं धर्मो निरर्थकः ॥ भूतानां स्थावराणां च जंगमानां च दर्शनम् । यथास्ति न तथा धर्मस्तेन नास्तीति मे मितः ॥ युद्धकाण्ड ८३.१४-१५.

१. स्वभावस्त्वेष नारीणां त्रिषु लोकेषु दृश्यते । विमुक्तधर्माश्चपलास्तीक्ष्णा भेदकराः स्त्रियः ॥ अरण्यकाण्ड ४५.२९-३०. २. अनृताः स्त्रिय इत्येव सूत्रकारो व्यवस्यति । अनु० १९.६. ३. अनर्थित्वान्मनुष्याणां भयात्परिजनस्य च । मर्या;दायाममर्यादाः स्त्रियस्तिष्ठन्ति भर्तृषु ॥ अनु. ३८.१६ तथा शतसहस्रेषु यदि काचित्पतिव्रता । अनु.१९. ४. न स्त्रीभ्यः किंचिदन्यद्वै पापीयस्तरमास्ति वै ॥ अनु. ३८.१२; क्षुरधारा विषं सर्पो वन्हिरित्येकतः स्त्रियः ॥ अनु० ३८.२९. ५.पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने । पुत्राश्च स्थाविरे भावे नास्ति स्त्रीणां स्वतंत्रता ॥ अनु. २०.२१; प्रजापतिमतं ह्येतन्न स्त्री स्वातन्त्र्यमर्हति । अनु.२०.१४ ६ एवं स्त्री नापराध्नोति नर एवापराध्यति । शान्ति २६७.३८.

यांना मान मिळतो तेथें देवता आनन्द पावतात, ह्मणून स्त्रियांचा मान राखावा व त्यांना संतुष्ट ठेवावें[१]'. 'ज्या ठिकाणीं स्त्रियांना मान मिळत नाहीं तेथें सर्व क्रिया निष्फळ होतात. ज्या कुळांत स्त्रिया दुःखित असतात तें विनाश पावतें. अभ्युदयाची इच्छा करणाऱ्यानें स्त्रियांना मान द्यावा, कारण स्त्रीचें पालन व नियमन केलें असतां ती प्रत्यक्ष लक्ष्मीच होते[२].' मातांविषयीं महाभारतांत कांहीं फारच उदात्त वाक्यें आहेत. 'एक माता दहा पित्यांपेक्षां—किंबहुना सर्व पृथ्वीपेक्षां मोठेपणांत ज्यास्त आहे. मातेइतका श्रेष्ठ कोणी नाहीं, मातेसारखी छाया नाहीं, मातेसारखी गति नाहीं, मातेसारखें शरणागतवत्सल कोणी नाहीं, मातेसारखी प्रिय वस्तु नाहीं[३]'. पति व पत्नी ह्यांच्या परस्परसंबन्धाबद्दलही श्रीव्यासांचे उद्गार फारच प्रशंसनीय आहेत. 'भार्या ही पतीची अर्धांगी आहे, ती त्याचा अत्यंत श्रेष्ठ मित्र आहे, ती धर्म अर्थ व काम ह्या तीन पुरुषार्थांचें मूळ आहे, व संसारसागरांतून तरून जाण्याला तीच साधन आहे.[४]'

१. पूज्या लालयितव्याश्च स्त्रियो नित्यं जनाधिप । स्त्रियो यत्र च पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ॥ अनु० ४६.५. २. अपूजिताश्च यत्रैता सर्वास्तत्राफलाः क्रियाः। तदा चैतत्कुलं नास्ति यदा शोचन्ति जामयः ॥ अनु० ४६. ६. श्रिय एताः स्त्रियो नाम सत्कार्या भूतिमिच्छता। पालिता निगृहीता च श्रीः स्त्री भवति भारत॥अनु०४६. १५. ३. दश चैव पितॄन् माता सर्वां वा पृथिवीमपि । गौरवेणाभिभवति नास्ति मातृसमो गुरुः ॥ अनु० १०५.१५; नास्ति मातृसमा च्छाया नास्ति मातृसमा गतिः । नास्ति मातृसमं त्राणं नास्ति मातृसमा प्रिया ॥ शान्ति०२६७.३१ ४. अर्धं भार्या मनुष्यस्य भार्या श्रेष्ठतमः सखा । भार्या मूलं त्रिवर्गस्य भार्या मूलं तरिष्यतः ॥ आदि० ७४.४० (४१ ग. कु. प्रत)

निन्दात्मक व स्तुतिरूप वचनांचा विचार केला असतां असें ह्मणण्यास हरकत नाहीं कीं, महाभारतरामायणकाळीं स्त्रियांची खरी योग्यता समाजास बरीच कळून चुकली होती. स्त्री ह्मणजे पुरुषांचे सुखासाठीं निर्माण केलेली एक वस्तु अशी कांहीं स्त्रियांबद्दल भारतवर्षीयांची कल्पना नव्हती. समाजाचें कल्याण करण्याचें स्त्रियांत केवढें सामर्थ्य आहे याची विद्वानांना चांगलीच कल्पना आली होती. स्त्रियांची जी निन्दा आढळते त्यावरून ग्रन्थकाराची स्त्रिया पवित्र आचरणाच्या व्हाव्या अशी उत्कट इच्छा होती असें दिसतें, किंवा ते श्लोक पाठीमागून घुसडून दिलेले असतील. पूर्वींचा एक न्याय असा आहे कीं निन्दा ही निन्द्य वस्तूची निन्दा करण्यासाठीं प्रवृत्त झालेली नसते, तर जें केलें पाहिजे त्याची स्तुति करण्यासाठीं केलेली असते.[१] शिवाय हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, पौरस्त्य व पाश्चात्य अशा दोन्ही ग्रंथकारांना स्त्रियांच्या दोषांचें आविष्करण करून ते फुगवून सांगण्याची संवयच झालेली आहे.

विवाह.

समग्र महाभारतांत मनाला ओढून घेणारी अशी एक विलक्षण गोष्ट ह्मणजे द्रौपदीचा पांच पांडवांबरोबरचा विवाह ही होय. ज्या अर्थीं भगवान् व्यासांनीं आपल्या कथेंतील नायकांबद्दलच अशी स्थिति लिहिली, त्यावरून असें दिसतें कीं परंपरागत कथेचा ओघ फार जोराचा होता व त्याविरुद्ध कल्पना करितां येईना. समाजांत बहुपतित्वाची चाल थोडीबहुत तरी फारच प्राचीन काळीं प्रचलित असावी याचें निदर्शक ह्मणून ही गोष्ट मानतात. द्रौपदीच्या विवाहाची जी हकीकत दिलेली आहे त्यावरून व्यासांना ही चाल अमा-

१. न हि निन्दा निंद्यं निन्दितुं प्रवर्तते, अपि तु विधेयं स्तोतुम् । तन्त्रवार्तिक पान १६ बनारस प्रत.

नुष व विलक्षण वाटत असून त्यांचे वेळीं बिलकुल प्रचारांत नव्हती असें दिसतें. पुष्कळ वादविवाद केल्यानंतर व पुरातन दाखले दिल्यानंतरच द्रुपदानें पांच पांडवांना द्रौपदी दिली. धर्मानेंही बहुपतित्वाचीं पुरातन काळचीं गौतमी व वार्क्षी अशीं दोनच उदाहरणें दिलीं आहेत.

भारतरामायणकाळीं एकपत्नीत्वाचीच चाल जिकडे तिकडे होती. क्वचित् एकापेक्षां अधिक बायका एकाच वेळीं करीत. दशरथाचे अंतःपुरांत तीन मुख्य राण्यांशिवाय साडेतीनशें बायका होत्या. ययाति व पाण्डु यांना प्रत्येकीं दोन बायका होत्या. अशा रीतीनें क्षत्रियांमध्यें मात्र अनेक स्त्रिया करीत असत. क्षत्रियांमध्यें सुद्धां श्रीरामचंद्राप्रमाणें एकपत्नीव्रत पाळणारेही होते.

मन्वादिस्मृतींप्रमाणें महाभारतांतही विवाहाचे ब्राह्म, दैव, आर्ष, प्राजापत्य, आसुर, गान्धर्व, राक्षस व पैशाच असे आठ प्रकार सांगितलेले आहेत.[१] ह्या आठांपैकीं पहिले चार मात्र ब्राह्मणांना विहित होते. ह्या चारांतून ब्राह्म हा सर्वांत श्रेष्ठ व सर्व वर्णांना विहित होता. शील, कुल, विद्वत्ता, व आचरण हीं सर्व पाहून गुणवान् अशा वराला कन्या द्यावी, ह्मणजे ब्राह्म विवाह झाला.[२] वर जरी ब्राह्म दैव, आर्ष, प्राजापत्य हे चारी प्रकार ब्राह्मणांस उक्त आहेत ह्मणून ह्मटलें आहे, तरी एका ठिकाणीं आर्ष विवाहाला दूषण दिलें आहे. आर्ष विवाहांत वराजवळून दोन गाई घेऊन कन्या देत असत. ह्मणून किंमत थोडी काय किंवा फार काय तो एक प्रकारचा विक्रयच समजला पाहिजे, असें एका ठिकाणीं ह्मटलेलें आहे. आसुरविवाहांत मुलीच्या आईबापांस पुष्कळ द्रव्य देऊन मुलगी घेत असत. गान्धर्व विवाहांत कन्येला जो वर अभिप्रेत असेल तो ती वरी.[१] राक्षसविवाहांत कन्येला तिचे बांधवांचे इच्छेविरुद्ध बलात्कारानें हरण करून नेत. पैशाचविवाहांत कन्या निद्रित वगैरे असतां नेत. क्षत्रियांना गान्धर्व आणि राक्षस हे दोन प्रकार उक्त होते. पैशाच व आसुर सर्वांनाच निषिद्ध होते. परंतु एका ठिकाणीं वैश्य व शूद्र यांनीं आसुरविवाह केल्यास हरकत नाहीं असें सांगितलें आहे.[२] गान्धारीचें धृतराष्ट्राशीं ब्राह्मपद्धतीनें लग्न झालें. विचित्रवीर्याकरितां भीष्मानें अंबिका व अम्बालिका ह्यांचें बलानें हरण केल्यामुळें तो राक्षसविवाह झाला. शकुन्तलेनें दुष्यन्ताशीं गान्धर्वविवाह लाविला. दमयन्तीनें नलाला स्वयंवरांत वरिलें. कधीं कधीं अस्त्रविद्येंत जो नैपुण्य दाखवील व कांहीं पण जिंकील त्याला कन्या देत; उदाहरणार्थ, द्रौपदी व सीता.

रामायणांत सांगितलेलें आहे कीं, विवाहकालीं सीता सहा वर्षांची होती व श्रीराम तेरा वर्षांचे होते. महाभारतांत एका ठिकाणीं वराचें व कन्येचें वय अनुक्रमें ३० व १० किंवा २१ व सात वर्षांचें असावें असें ह्मटलेलें आहे[४]. परंतु दुसरीं अशीं अनेक वाक्यें आहेत कीं,

१. ब्राह्मो दैवस्तथैवार्षः प्राजापत्यस्तथासुरः । गान्धर्वो राक्षसश्चैव पैशाचोऽष्टमः स्मृतः ॥ आदि० ७३-९-(८-९ ग. कृ. प्रत) २. शीलवृत्ते समाज्ञाय विद्यां योनिं च कर्म च । सद्भिरेवं प्रदातव्या कन्या गुणयुते वरे.॥ ब्राह्मणानां सतामेष ब्राह्मो धर्म युधिष्ठिर। अनु० ४४.३-४.

१. शिष्टानां क्षत्रियाणां च धर्म एष सनातनः । आत्माभिप्रेतमुत्सृज्य कन्याभिप्रेत एव यः ॥ अभिप्रेता च या यस्य तस्मै देया युधिष्ठिर । गान्धर्वमिति तं प्राहुर्धर्मं धर्मविदो जनाः ॥ अनु० ४४.५-६. २. राज्ञां तु राक्षसोप्युक्तो विट्शूद्रेष्वासुरः स्मृतः॥ आदि० ७३.११. (ग. कृ. प्रत). ३. उषित्वा द्वादश समा इक्ष्वाकूणां निवेशने । मम भर्ता महातेजा वयसा पंचविंशकः । अष्टादश हि वर्षाणि मम जन्मनि गण्यते । अरण्यकाण्ड ४७. १०-११. ४. त्रिंशद्वर्षो दशवर्षां भार्यां विन्देत नग्निकाम् । एकविंशतिवर्षो वा सप्तवर्षामवाप्नुयात् ॥ अनु० ४४.१४.

ज्यांवरून स्त्रियांच्या विवाहकालाची मर्यादा बरीच होती असें दिसतें. गान्धारीनें धृतराष्ट्राशीं विवाह झाल्याबरोबर डोळ्यावर पट्टा बांधून आपणांस अंधत्व आणिलें[१] यावरून ती विवाहकाळीं सहा सात वर्षांची लहान बालिका असेल असें वाटत नाहीं. भारतीय युद्धाला सुरवात झाली त्यापूर्वी उत्तरेचें अभिमन्यूशीं लग्न झालें; व त्या युद्धांत अभिमन्यु मारला गेला, त्यावेळीं ती गरोदर होती; यावरून तिचा प्रौढपणींच विवाह झाला असला पाहिजे. ज्या अर्थी स्वयंवराची चाल प्रचारांत होती, त्याअर्थी राजांचे गुणदोषांचा विचार करण्याइतक्या तरी मुली प्रौढवयाच्या असल्या पाहिजेत. गान्धर्वविवाह तर कन्या प्रौढ असल्याशिवाय शक्य नाहीं. सावित्रीला तिच्या बापानें स्वतःच वर शोधून काढण्यास सांगितलें. 'कन्या ऋतुमती झाली असूनही पिता जर वर पहाणार नाहीं तर कन्येनें तीन वर्षें वाट पाहून चवथ्या वर्षी स्वतः पति वरावा.'[२] साठ वर्षांचा म्हातारा नवरा कुमारीला आवडत नाहीं असें एका ठिकाणीं म्हटलेलें आहे.[३]

गान्धर्वविवाहांत बापाच्या परवानगीची जरूरी नसे. बाकी सर्व विहित विवाहप्रकारांत त्याच्या परवानगीची जरूरी असे. जरी बापानें मुलीला स्वतांच पति शोधून काढण्यास सांगितलें असलें तरी तिनें पसंत केलेल्या वरासंबन्धानें सुद्धां बापाची अनुज्ञा लागे. सावित्रीचा पिता म्हणाला[४] कीं, ज्याला तूं पसंत केलें असशील तो मला सांग, मी त्याचेबद्दल विचार करून मग तुला त्याला देईन. बाप नसला तर आई किंवा इतर नातेवाईक यांची परवानगी लागे.[१]

वरामध्यें कुल, शील, व विद्या हीं तीन असलीं पाहिजेत. त्याचप्रमाणें कन्येला भाऊ व पिता असला पाहिजे. जिला भाऊ नाहीं अशी कन्या न करण्याबद्दल फार कटाक्ष आहे. कारण, ती आपल्या बापाच्या पुत्राप्रमाणें असून तिचा पुत्र तिच्या बापाच्या पिंडदानादि क्रिया करितो.[२] त्याचप्रमाणें कुष्ठ, अपस्मार, क्षय इत्यादि आनुवंशिक रोग जिला आहेत व जी व्यंग आहे अशा कन्येचें पाणिग्रहण करूं नये.[३] शिवाय, कन्येचें व वराचें गोत्र व प्रवर एक नसले पाहिजेत ती त्याच्या आईची सपिंड नसली पाहिजे.[४] मागें सांगितल्याप्रमाणें ब्राह्मणाला ब्राह्मण, क्षत्रिय किंवा वैश्य कन्येशीं विवाह करितां येई. क्षत्रियाला क्षत्रिय किंवा वैश्य कन्येशीं, व वैश्याला स्वजातीय स्त्रीशींच विवाह करितां येत असे. कांहींच्या मतानें ब्राह्मणाला केवळ रतिसुखासाठीं शूद्रकन्या वरितां येई; परंतु त्याला प्रायश्चित्त घ्यावें लागे. ब्राह्मणाला आद्य तीनवर्णांतील कन्येपासून पुत्र झाल्यास तो ब्राह्मणच मानला जाई; परंतु शूद्रस्त्रीपासून पुत्र झाल्यास तो ब्राह्मण होत नसे. क्षत्रियाचा ब्राह्मणकन्येशीं विवाह निषिद्ध होता. अशा विवाहांना प्रतिलोम विवाह

---

१. ततःसा पट्टमादाय कृत्वा बहुगुणं तदा। बबन्ध नेत्रे स्वे राजन् पतिव्रतपरायणा ॥ आदि० ११०.१४ (ग. कृ.) २. त्रीणि वर्षाण्युदीक्षेत कन्या ऋतुमती सती । चतुर्थे त्वथ संप्राप्ते स्वयं भर्तारमर्जयेत् ॥अनु० ४४.१६. ३. ध्रुवं न रोचेद्भरतर्षभस्य पतिः कुमार्या इव षष्टिवर्षः । वन० ५.१५. ४. प्रार्थितः पुरुषो यश्च स निवेद्यस्त्वया मम । विमृश्याहं प्रदास्यामि वरय त्वं यथेप्सितम् ॥वन०२९३-३३.

१. पिता माता गुरवश्चैव येऽन्ये देहस्यास्य प्रभवन्ति प्रदाने । वन० ३०६.२३. २. यस्यास्तु न भवेद् भ्राता पिता वा भरतर्षभ । नोपयच्छेत तां जातु पुत्रिकाधर्मिणी हि सा ॥ अनु ४४.१५.

३. पिंगलां कुष्ठिनीं नारीं न त्वमुद्वोढुमर्हसि । अपस्मारिकुले जातां निहीनां चापि वर्जयेत् ॥ श्वित्रिणां च कुले जातां क्षयिणां मनुजेश्वर ॥ अनु० १०४.१३४.

४. असपिण्डा च या मातुरसगोत्रा च या पितुः ॥ इत्येतामनुगच्छेत तं धर्मं मनुरब्रवीत् ॥ अनु४४-१८.

ह्मणत. निरनिराळ्या वर्णांच्या अनेक स्त्रिया जर ब्राह्मणानें केल्या तर जी ब्राह्मणी असेल तिलाच पतीचें स्नान, अलंकरण, दन्तधावन, अंजन, हव्यकव्य इत्यादि सर्व धर्मकार्यांत प्राधान्य असे.[1]

मुलीच्या बापाला कांहीं तरी नजराणा देण्याची सर्वसाधारण चाल होती. त्याचप्रमाणें मुलीचा बापही विवाहाचे वेळीं तिला कांहीं तरी आपल्या प्रेमाचें द्योतक ह्मणून देत असे. कृष्णानें सुभद्रेच्या विवाहाचे वेळीं अर्जुनाला गाई, घोडे, हत्ती, दासदासी दिल्या. उलटपक्षीं ऋचीकानें जेव्हां गाधिनृपाजवळ कन्येची मागणी केली त्यावेळी गाधीनें श्यामकर्ण असे एक हजार अश्व दिल्यास कन्या देईन असें सांगितलें.[2] माद्रीच्या भावानें तिला अलंकारांनीं भूषित करून तिचा विवाह लाविला व भीष्मानें त्याला सोनें, रत्नें इत्यादिकांचा अहेर केला. जनकानें रामाला हजारों दासदासी, हत्ती, शाली वगैरे दिल्या. हीं सर्व उदाहरणें राजकुलांतील आहेत हें खरें. ब्राह्मणलोक हे गरीब असल्यामुळें देणग्या देत असल्यास त्या अल्प किंमतीच्याच असल्या पाहिजेत. वराकडून मुलीला किंवा तिच्या बापाला ज्या देणग्या मिळत, त्या मुलीचा मोबदला ह्मणून दिल्या जात नसत. भार्या विकत घेतां येत नाहीं व देतां येत नाहीं व कन्येच्या बापाला मिळालेला पैसा किंवा देणगी ही तिची किंमत असें जे ह्मणतील ते धर्मज्ञ नव्हत असें महाभारतांत निक्षून सांगितलेलें आहे.[1] मुलाचा जबर हुंडा घेणाऱ्या बापांनीं व पोटच्या गोळ्याला पैशासाठीं हव्या त्याच्या गळ्यांत बांधणाऱ्या कांचनभटांनीं खालीं लिहिलेले श्लोक मनन करण्यासारखे आहेत. असें करणाऱ्या बापाला अति घोर नरकामध्यें मलमूत्र भक्षण करीत पडावें लागतें.

मुलीकरितां नुसती मागणी घालण्यानें किंवा मुलीचे बापाला देणग्या देण्यानें विवाहसंबंध पुरा होत नाहीं. अनुशासन पर्वाच्या ४४ व्या अध्यायांत असा एक प्रश्न केला आहे कीं, एका मनुष्यानें मुलीच्या बापाला देणग्या दिल्या व नंतर तो मेला तर ती मुलगी दुसऱ्या मनुष्याला द्यावी किंवा नाहीं. याचें उत्तर असें दिलेलें आहे कीं पहिला मनुष्य जिवंत असतांही दुसऱ्याला ती कन्या देण्यास हरकत नाहीं, मग तो मृत असल्यावर बोलावयासच नको.[3] सप्तपदी झाल्याबरोबर विवाहविधि पूर्ण होत असे.[4] विवाहविधींत लागणाऱ्या वस्तूंपैकीं लाह्या, अक्षता, दर्भ वगैरे यांचा उल्लेख रामायणांत आला आहे.[5]

पत्नीचीं कर्तव्यें:—पतिव्रता स्त्रियांच्या कर्तव्यांविषयीं महाभारतांत जागोजाग सांगितलेलें

१ स्नानं प्रसाधनं भर्तुर्दन्तधावनमञ्जनम् । हव्यं कव्यं च यच्चान्यद्धर्मयुक्तं गृहे भवेत् ॥ न तस्यां जातु तिष्ठन्त्यामन्या तत्कर्तुमिहार्हति ॥ अनु. ४७. ३३.

२ उचितं नः कुले किंचित्पूर्वैर्यत्संप्रवर्तितम् । एकतः श्यामकर्णानां पाण्डुराणां तरस्विनाम् ॥ सहस्रं वाजिनां शुल्कमिति विद्धि द्विजोत्तम ॥ वन. ११५.२३.

१ ये मन्यन्ते क्रयं शुल्कं न ते धर्मविदो जनाः । न ह्येव भार्या क्रेतव्या न विक्रय्या कथंचन ॥ अनु. ४४. ४५–४६.

२ यो मनुष्यः स्वकं पुत्रं विक्रीय धनमिच्छति । कन्यां वा जीवितार्थाय यः शुल्केन प्रयच्छति ॥ सप्तावरे महाघोरे निरये कालसाह्वये । स्वेदं मूत्रं पुरीषं च तस्मिन्मूढः समश्नुते ॥ अनु. ४५. १८–१९.

३ यत्रेष्टं तत्र देया स्यान्नात्र कार्या विचारणा । कुर्वते जीवतोप्येवं मृते नैवास्ति संशयः ॥ अनु.४४.५१.

४ पाणिग्रहणमन्त्राणां निष्ठा स्यात्सप्तमे पदे । पाणिग्राहस्य भार्या स्याद्यस्य चाद्भिः प्रदीयते ॥ अनु. ४४. ५५.

५ लाजपूर्णैश्च पात्रीभिरक्षतैरपि संस्कृतैः। दर्भैः समैः समास्तीर्य विधिवन्मन्त्रपूर्वकम् ॥ बालकाण्ड ७३.२३.

आहे. पतीची सेवा करून व त्याला संतुष्ट राखून स्त्रीला अत्यंत अभिमत अशी कोणतीही गोष्ट मिळवितां येईल. तिचें तन मन धन पतिसेवेंत असलें पाहिजे. पतिसेवापरायण स्त्रीला ईश्वरपूजेचीही अपेक्षा नाहीं. महाभारत व रामायण ह्या ग्रंथांत रेखाटलेलें हें ध्येय आजही भरतखंडांतील स्त्रियांचें उद्दिष्ट आहे. स्त्रियांच्या कर्तव्यांसंबंधानें दोन्ही ग्रंथकारांनीं उत्तमोत्तम स्त्रियांचे तोंडीं कांहींना कांहीं तरी वाक्यें घातलींच आहेत. द्रौपदी, सीता, अरुन्धती, लोपामुद्रा, दमयन्ती, सावित्री इत्यादि स्त्रीरत्नांच्या महनीय कथांनीं सद्यःकालीं सुद्धां आर्यस्त्रियांना त्यांचेवर व त्यांचे पतींवर आलेल्या संकटांना तोंड देण्याला धैर्य येतें. उपरिनिर्दिष्ट साध्वी स्त्रिया आर्यस्त्रियांना हजारों वर्षें मार्गदर्शक झाल्या आहेत व पुढेंही होतील. अनेक कुटुंबांतील शान्ति व सुख यांचें मूळ वरील साध्वी स्त्रियांच्या स्फूर्तिजनक चरित्रांत आहे.

पतीला संतुष्ट राखणें असेल तर स्त्रीनें कसें वागावें हें सत्यभामेला द्रौपदीनें वनपर्वांत (अध्याय २३३) सांगितलें आहे. स्त्रीनें पतीला देवाप्रमाणें मानावें. ईश्वरपूजा न करितांही तसें केल्यानें तिला स्वर्ग मिळतो.[१] सावित्री यमाला ह्मणते, पतीच्या सन्निध मला श्रम होत नाहींत, ज्याठिकाणीं तूं पतीला नेशील तींच माझी गति. पतिविरहित होऊन मला सुख, स्वर्ग, लक्ष्मी किंवा जीविताचीही पर्वा नाहीं.[२] राजकुलांत उत्पन्न झालेल्या व ऐषआरामांत वाढलेल्या अशा स्त्रियाही बिलकुल कुरकुर न करितां पतींबरोबर हालअपेष्टा सोसण्यास सिद्ध झाल्याचीं अनेक उदाहरणें ह्या दोन ग्रन्थांत आहेत. सीता व द्रौपदी ह्या दोघी राजकन्या असूनही आपआपल्या पतींबरोबर संकटमय अशा वनवासांत आनंदानें गेल्या. सर्व साध्वी स्त्रियांत सावित्रीला अग्रपूजेचा मान आर्यस्त्रियांकडून मिळालेला आहे. पति प्रवासाला गेला असतां स्त्रीनें अंजन अलंकार, माळा, उटणीं सोडून दिलीं पाहिजेत.[१] पतीखालोखाल प्रत्येक स्त्रीनें सासूसासऱ्यांना मान दिला पाहिजे.

वरतीं आह्मीं कांहीं अवतरणांवरून दाखविलेंच आहे कीं स्त्रियांना स्वातन्त्र्य देऊं नये असें भारतकाळीं लोकमत होतें. परंतु गृहांतील अंतर्व्यवस्थेंत स्त्रिया पूर्ण मुखत्यार होत्या. स्त्रियांना मान द्यावा अशा अर्थाचीं वाक्यें आह्मी पूर्वीं दिलींच आहेत. आपल्या पतीसंबन्धाच्या हरएक गोष्टींत स्त्रिया मन घालीत; यावरून त्यांची स्थिति अगदीं शोचनीय नव्हती. द्रौपदी सत्यभामेला ह्मणते कीं मी आय आणि व्यय यांवर नजर ठेवितें. स्त्रियांचे शिक्षणाची अगदीं हेळसांड करीत असत असें वाटत नाहीं. मुलींच्या शाळांचा कोठेंही उल्लेख नाहीं ही गोष्ट प्राञ्जलपणें कबूल केली पाहिजे! परंतु घरच्या घरीं त्या काळच्या समजुतीप्रमाणें मुलींना शिक्षण मिळे. त्या शिक्षणाचा रोख पुस्तकी ज्ञानाकडे नसून शील बनविण्याकडे असे. महाभारत व रामायण ह्या दोन्ही ग्रंथांत स्त्रिया सर्व विषयांवर बोलतांना आपण पहातों; कांहीं स्त्रिया तत्वज्ञानविशारदही होत्या. उच्च कुलांतील स्त्रिया गीत, वाद्य, नृत्य वगैरे शिकत असत.

१जीवन्त्या हि स्त्रिया भर्तुर्दैवतं प्रभुरेव च। भर्तुः शुश्रूषया नारी लभते स्वर्गमुत्तमम्॥ अपि या निर्नमस्कारा निवृत्ता देवपूजनात्॥अयोध्याकाण्ड२४.२६–२७

२ श्रमः कुतो भर्तृसमीपतो मे यतो हि भर्ता मम सा गतिर्ध्रुवा॥ वनपर्व २९७.२९. न कामये भर्तृविनाकृता सुखं न कामये भर्तृविनाकृता दिवम्। न कामये भर्तृविनाकृता श्रियं न भर्तृहीना व्यवसामि जीवितुम्॥ वन० २९७.५३.

१ अंजनां रोचनां चैव स्नानं माल्यानुलेपनम्। प्रसाधनं च निष्क्रान्ते नाभिनन्दामि भर्तरि॥ अनु० १२३.१७.

बृहन्नडावेशांत अर्जुनानें उत्तरेला गीतादि ललितकला शिकविल्या. [१] दोन्ही ग्रंथांतील प्रमुख स्त्रिया दीनदुबळ्या नसून उत्साही व करारी दिसतात. कुन्ती आपल्या पुत्रांना ह्मणते, दीनवृत्तीनें पोटाची खळगी भरण्यापेक्षां मुळींच आधार न मिळाला तरी पुरवलें व वेळ आली असतां प्राणत्यागही चांगलें. आपला मुलगा शत्रूंबरोबर लढून पराजित होऊन हताश झालेला पाहतांच विदुलेनें त्याचा अत्यंत कठोर शब्दांनीं निषेध केला व त्याला पुनः उद्योग करावयास लाविलें. अशा प्रकारच्या बाणेदार स्त्रिया त्यांना स्वतंत्रता नसती तर उत्पन्न होणार नाहींत. स्वतंत्रतेच्या खुल्या हवेंतच त्या वाढल्या असल्या पाहिजेत. कांहीं लोक असा आक्षेप घेतील कीं उपरिनिर्दिष्ट स्त्रिया ह्या केवळ अपवादादाखल होत, बहुतेक स्त्रिया दास्यांत होत्या. हा आक्षेप सोपपत्तिक नाहीं. दोन हजार वर्षीपूर्वींची स्थिति विद्यमान ग्रंथांवरून व त्यांत आलेल्या विशिष्ट उदाहरणांवरून अनुमानानेंच ठरवावयाची आहे. ग्रंथकारांनीं बाणेदार स्त्रियांचीं उदाहरणें दिलीं आहेत ह्यावरून त्यांना स्त्रियांचीं दीन स्थिति इष्ट वाटत नव्हती. समाजापुढें अनुकरणीय ह्मणून ज्या स्त्रिया ठेवावयाच्या त्या सर्व सुशिक्षित व तेजस्वी अशाच ठेविलेल्या आहेत.

उच्चकुलांतील स्त्रिया पुरुषसमाजांत मोकळेपणानें मिसळत नसत असें दिसतें. परंतु त्या तोंडावर बुरखा वगैरे घेत असत असें वाटत नाहीं. घरांतल्या घरांत त्या अगदीं मोकळेपणानें वागत, परंतु पुरुषसमाजांत त्या फारशा येत नसत. ‘जी सीता पूर्वीं आकाशस्थ प्राण्यांना सुद्धां दृग्गोचर होत नव्हती तिलाच आतां राजमार्गावरील लोक पहात आहेत.’ ‘कुलस्त्रियेला पूर्वींचे लोक सभेंत नेत नसत असें मीं ऐकिलें आहे. परंतु ही सनातन चाल कौरवांनीं आज नष्ट केली’ असें द्रौपदी ह्मणते. [१] धृतराष्ट्रानें बोलावल्याबरोबर गांधारी दुर्योधनाचें मन वळविण्याकरितां राजसभेंत आली मी एकटी असल्यामुळें तुझ्याशीं कसें बोलूं असें द्रौपदी जयद्रथाला ह्मणते व सीता मारुतीचे आंगाला आपण होऊन स्पर्श करण्यास संकोच धरिते. [२] या सर्व उदाहरणांवरून पडद्याची पद्धत कदाचित् राजकुलांत प्रचारांत असलीच तरी विशेष कडक नव्हती असें ह्मणण्यास हरकत नाहीं. संकटकाळीं, युद्धप्रसंगीं, विवाहसमारंभांत, यज्ञांत व स्वयंवरांत स्त्रियांचें पुरुषसमाजांत दर्शन दूषणार्ह नव्हतें. [३] विधवावपनाचा कोठेंही उल्लेख नाहीं. सतीची चाल माहीत होती ह्यांत कांहीं संशय नाहीं. परंतु भारतीय युद्धांत लाखों वीर मारले गेले असूनही सती गेलेल्या स्त्रियांबद्दल फारच थोड्या ठिकाणीं उल्लेख आहे. पाण्डुबरोबर माद्री सती गेली हें एक प्रसिद्ध

१ गीतं नृत्यं विचित्रं च वादित्रं त्रिविधं तथा। शिक्षयिष्याम्यहं राजन् विराटस्य पुरस्त्रियः ॥ विराट० २.२९.

२ वृत्तेः कार्पण्यलब्धाया अप्रतिष्ठैव ज्यायसी। काले हि समनुप्राप्ते त्यक्तव्यमपि जीवितम् ॥ उद्योग० १०.७७.

१ या न शक्या पुरा द्रष्टुं भूतैराकाशगैरपि। तामद्य सीतां पश्यन्ति राजमार्गगता जनाः ॥ अयोध्या० ३३.८.

धर्म्यां स्त्रियं सभां पूर्वे न नयन्तीति नः श्रुतम्। स नष्टः कौरवेयेषु पूर्वो धर्मः सनातनः ॥ सभा ६८.९.

२ एका ह्यहं संप्रति ते न वाचं ददानि वै भद्र निबोध चेदम्। अहं ह्यरण्ये कथमेकमेका त्वामालपेयं निरता स्वधर्मे ॥ वन० २६६.३; भर्तृभक्तिं पुरस्कृत्य रामादन्यस्य वानर। नाहं स्प्रष्टुं स्वतो गात्रमिच्छेयं वानरोत्तम ॥ सुन्दर० ३७. ६२.

३ व्यसनेषु न कृच्छ्रेषु न युद्धेषु स्वयंवरे। न क्रतौ नो विवाहे वा दर्शनं दूष्यते स्त्रियः ॥ युद्धकाण्ड० ११६.२८.

उदाहरण आहे.[१] आदिपर्वांत एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं, स्त्री प्रथम मृत झाल्यास आपल्या पतीची वाट पहात रहाते व पति जर प्रथम मृत झाला तर ती त्याच्यामागून सती जाते.[२] सैरन्ध्रीला कीचकाबरोबर जाळून टाकण्याचा हुकूम होतो ही एक विलक्षण गोष्ट आहे.[३] एखादा मोठा मनुष्य मृत झाला असतां त्याच्याबरोबर त्याचा एखादा गुलाम पुरण्याची किंवा जाळण्याची चाल फार प्राचीनकाळीं होती असें ह्मणतात त्याचाच अवशेष हा असावा. विधवापुनर्विवाहाचा निषेध एक दोन ठिकाणीं केलेला आहे. पति मृत झाल्यावर किंवा जिवंत असतांना स्त्रीनें दुसऱ्या पुरुषाशीं विवाह करूं नये. तसें केल्यास स्त्री निःसंशय पतित होईल. पुरुषानें पुष्कळ स्त्रिया करणें ह्यांत अधर्म नाहीं. परंतु स्त्रीनें प्रथम पतीचें लंघन केल्यास (ह्मणजे दुसऱ्याशीं विवाह केल्यास) फार मोठा अधर्म होईल !![४] विधवांची स्थिति समाधानकारक नव्हती. दुष्ट पुरुषांकडून त्यांस कुमार्गगामी करण्यांत येत असे. जमिनीवर टाकलेल्या आमिषावर ज्याप्रमाणें पक्षी झडप घालतात, त्याप्रमाणें पतिहीन स्त्रीवर सर्वांची नजर असते, असें एके ठिकाणीं ह्मटलें आहे.[१] जरी विधवापुनर्विवाहाचा निषेध केलेला आहे, तरी स्त्रियांचा पुनर्विवाह क्वचित् होत असावा असें कांहीं गोष्टींवरून दिसतें. नळाची पुष्कळ वर्षेंपर्यंत कांहींच बातमी न समजल्यामुळें दमयन्ती द्वितीय स्वयंवराबद्दल बातमी पसरविते व ऋतुपर्णासारखा साधुवृत्त राजा त्या द्वितीय स्वयंवराला हजर राहण्यासाठीं धडपड करितो व त्यांत त्याला कांहीं अधर्माचरण वाटत नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. अनुशासनपर्वांत श्राद्धाला कोणते ब्राह्मण बोलवावे हें सांगतांना पुनर्विवाहित स्त्रीच्या मुलाला बोलावूं नये असें सांगितलें आहे. यावरून स्त्रियांचा पुनर्विवाह ही गोष्ट कांहीं अश्रुतपूर्व नव्हती इतकें तरी अनुमान करण्यास हरकत नाहीं.

कुटुंब.

कुटुंबांत बाप हा प्रमुख होता. त्याच्या हुकुमाप्रमाणें सर्वांना वागावें लागे. अविभक्त कुटुंबाची पद्धति प्रचारांत होती. मुलांवर बापाची सत्ता अमर्याद होती व मुलांचीही आपल्या बापावर भक्ति अनुपम होती, असें दोन्ही ग्रंथांत जागोजाग दाखविलेलें आहे. पित्याच्या हातून वचनभंगाचें पातक न व्हावें ह्मणून राम वनवासाला गेला. पुरूनें आपलें यौवन पित्याला देऊन त्याजपासून जरा घेतली. भीष्म हा पित्याला संतुष्ट करण्याकरितां आजन्म ब्रह्मचारी राहिला. परशुरामानें पित्याची आज्ञा पाळण्याकरितां आईचा शिरश्छेद केला. पित्याची शुश्रूषा व त्याची आज्ञा पाळणें यापेक्षां मोठा धर्म कोणताही नाहीं.[२]

---

१ तत्रैनं चिताग्निस्थं माद्री समन्वारुरोह । आदि ५५-६४ (६५ ग. कु.); राज्ञः शरीरेण सह ममापीदं कलेवरम् । दग्धव्यं सुप्रतिच्छन्नमेतदार्ये प्रियं कुरु॥ आदि १२५.३१ (२९ ग- कु. प्रत)

२ प्रथमं संस्थिता भार्या पतिं प्रेत्य प्रतीक्षते । पूर्वं मृतं च भर्तारं पश्चात्साध्व्यनुगच्छति ॥ आदि ७४. ४५. (४६ ग. कु.)

३ सैरन्ध्र्याः सूतपुत्रेण सह दाहं विशांपतिः । विराटपर्व २३.८.

४ मृते जीवति वा तस्मिन्न परं प्राप्नुयाद् नरम् । अभिगम्य परं नारी पतिष्यति न संशयः ॥ आदि० १०४.३२ (३५-३६ ग. कु. प्रत); न चाप्यधर्मः कल्याण बहुपत्नीकृता नृणाम् । स्त्रीणामधर्मः सुमहान् भर्तुः पूर्वस्य लंघने ॥ आदि १६०.३६

१ उत्सृष्टमामिषं भूमौ प्रार्थयन्ति यथा खगाः । प्रार्थयन्ति जनाः सर्वे पतिहीनां तथा स्त्रियम् ॥ आदि० १६०.१२

२ न ह्यतो धर्मचरणं किंचिदस्ति महत्तरम् । यथा पितरि शुश्रूषा तस्य वा वचनक्रिया ॥ अयोध्या० १९. २२.

सत्यवान् सावित्रीला ह्मणतो, माझ्या आईबापांना विचारून ये, माझ्यावर दोष नको, माता ही पृथ्वीपेक्षां गुरु आहे व पिता आकाशापेक्षां उच्च आहे.[1] अशारीतीनें पुत्र अत्यंत आज्ञाधारक होते असें ज्याप्रमाणें आढळतें त्याप्रमाणें बापही फार पुत्रवत्सल होते असें दाखविलेलें आहे. राम वनवासाला गेल्यावर दशरथ पुत्रशोकानें मरण पावला. विदुरानें व कृष्णानें पुनःपुनः दुष्ट दुर्योधनाचा त्याग करण्यास सांगितलें असूनही धृतराष्ट्रानें पुत्रप्रेमानें जास्तच अंध होऊन त्याला टाकिलें नाहा.

बापाच्या खालोखाल ज्येष्ठ भ्रात्याला फार मान मिळत असे. कौरवांशीं अनेक प्रसंगीं दोन हात करावे असें मनांत येऊनही भीम व अर्जुन केवळ धर्माचे शब्दाला मान देण्याकरितां सर्व राग गिळून बसत. रामाच्या सौख्यासाठीं लक्ष्मणानें स्वतःच्या सुखावर पाणी सोडलें. लक्ष्मण ह्मणतो, जर प्रदीप्त अग्नींत किंवा अरण्यांत राम प्रवेश करूं लागला तर त्याचे पूर्वींच मीं प्रवेश करीन हें पक्कें समज.[2] ज्येष्ठ बन्धु संकटांत असो किंवा समृद्ध असो सर्वांनीं त्याच्या आज्ञेंत असावें हा धर्म आहे असें सुमित्रा ह्मणते.[3] भरत ह्मणतो कीं पिता नसेल तर त्याचे जागीं ज्येष्ठ भ्राता आहे.[4]

१ मम त्वामन्त्रय गुरून्न मां दोषः स्पृशेदयम् । माता गुरुतरा भूमेः खात्पितोच्चतरस्तथा॥ वन० ३१३. ६०.

२ दीप्तमग्निमरण्यं वा यदि रामो प्रवेक्ष्यति । प्रविष्टं तत्र मां देवि त्वं पूर्वमवधारय ॥ अयोध्या० २१.१७.

३ व्यसनी वा समृद्धो वा गतिरेषा तवानघ । एष धर्मः सतां लोके यज्ज्येष्ठवशगो भवेत् ॥ अयोध्या० ४०.६.

४ पिता हि भवति ज्येष्ठो धर्ममार्यस्य जानतः । अयोध्या० ७२.३३

ज्येष्ठ भ्रात्याच्या पत्नीलाही फार मान मिळत असे.[1]

चार आश्रम. मनुष्याच्या आयुष्याचे चार विभाग करून प्रत्येक विभागाला उचित अशीं कर्मे करण्यांत तो काळ घालवावा असें शास्त्रकारांनीं ठरविलें होतें. ह्याच चार विभागांना आश्रम ह्मणतात. ते आश्रम ह्मणजे ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ्य व संन्यास होत. मुलाचें उपनयन झालें ह्मणजे त्याला गुरुगृहीं पाठवीत. हा ब्रह्मचर्याचा प्रारम्भ होय. ब्रह्मचर्याश्रम निदान बारा वर्षें असे व त्या आश्रमांत असतांना ब्रह्मचाऱ्याला वेदाध्ययन व गुरुशुश्रूषा करावी लागे. त्यानें गुरूच्या पाठीमागून शयन केलें पाहिजे व गुरूपूर्वीं उठलें पाहिजे, स्वभावानें मृदु व स्थिर असून इंद्रियांचें दमन केलें पाहिजे व स्वाध्यायाध्ययन लक्षपूर्वक केलें पाहिजे.[2] शांतिपर्वाच्या १९१ व्या अध्यायांत ब्रह्मचाऱ्यांचीं कर्तव्यें विस्तारें करून दिलीं आहेत. गुरूगृहीं अध्ययन केल्यावर गुरूची अनुज्ञा घेऊन ब्रह्मचारी पितृगृहीं परत येत असे व नंतर विवाह करून गृहस्थाश्रमांत प्रवेश करीत असे. ह्या आश्रमांत धर्माचरणानें धन संपादून गृहस्थानें दानें द्यावीं, अतिथींना संतुष्ट करावें, शूद्रान्न वर्ज करावें, अग्निहोत्र करावें, इंद्रियें ताब्यांत ठेवावीं, व गुरुगृहीं ग्रहण केलें असेल[3]

१ अनु० १०५.२०.

२ आहूताध्यायी गुरुकर्मस्वचोद्यः पूर्वोत्थायी चरमं चोपशायी । मृदुर्दान्तो धृतिमानप्रमत्तो स्वाध्यायशीलः सिध्यति ब्रह्मचारी ॥ आदि ९१. २. (ग०कृ. प्रतींत सुद्धां)

३ गुरुणा त्वभ्यनुज्ञातः समावर्तेत वै द्विजः । विन्देतानन्तरं भार्यामनुरूपां यथाविधि ॥ शूद्रान्नवर्जनं धर्मस्तथा सत्पथसेवनम् । आहिताग्निरधीयानो जुह्वानः संयतेन्द्रियः ॥ अनु० १४१.३७-३८; वनपर्व २; अनु० ९७.

त्याची उजळणी करावी. पुत्रपौत्र झाल्यानंतर मनुष्यानें वानप्रस्थाश्रमाचा अंगीकार करावा. ह्या आश्रमांत दिवसांतून तीन वेळ स्नान, देव व पितृ यांची पूजा, नीवारकंदमूलाशन, इंगुदी व एरंड ह्या झाडांचें तेल वापरणें, योगमार्गाचा अभ्यास, तपश्चर्या, पापाचरणापासून पराङ्मुखता, परिमित आहारविहार इत्यादि गोष्टी विहित आहेत.[1] अरण्यकाण्डाच्या ६ व्या अध्यायांत (श्लोक ४) केवळ पानें खाऊन, पाणी पिऊन व वारा भक्षून राहणाऱ्या यतींचा उल्लेख आहे. भिक्षु किंवा संन्यासी यानें माती व सोनें सारखेंच मानलें पाहिजे, शत्रु, मित्र किंवा उदासीन यांवर सारखीच दृष्टि ठेविली पाहिजे. काय, वाणी व मन ह्या तिघांनींही त्यानें कोणाचाही द्रोह करितां कामां नये, एकाच ठिकाणीं घर करून न राहातां नगरांत पांच रात्रींपेक्षां व ग्रामांत एक रात्रींपेक्षां जास्त वेळ कोठेंही वस्ती न करितां प्राणधारणासाठीं शुद्धाचरणाच्या द्विजांचे घरीं जाऊन पात्रांत—न मागतां—पडेल तेवढी भिक्षा घ्यावी. सर्वसंगपरित्याग करून परमात्मचिंतनांत काळ घालवावा.[2] भगवीं वस्त्रें परिधान केलेल्या, शिखा असलेल्या, छत्र व उपानह हीं वापरणाऱ्या आणि डाव्या खांद्यावर दण्ड व कमण्डलु बाळगणाऱ्या परिव्राजकांचें वर्णन अरण्यकाण्डांत आहे.[3]

वरील विवेचनावरून प्राचीन ऋषींनीं मनुष्याच्या आयुष्यांतील कर्तव्यकर्में किती काळजीपूर्वक रेखाटून ठेविलीं होतीं ह्याची कल्पना होईल. प्रत्येक आश्रम पुढील आश्रमाच्या तयारीचा काळ आहे. कांहीं लोकांचा असा आक्षेप आहे कीं प्राचीन ऋषी निवृत्तिपर असल्यामुळें सर्वांना विषयपराङ्मुख यति बनविण्याकडेच त्यांचा भर फार आहे. ह्या आक्षेपांत फारच थोडें सत्य आहे. प्राचीन ऋषींनीं गृहस्थाश्रम अत्यंत श्रेष्ठ आहे अशी त्याची स्तुति केली आहे. ब्रह्मचारी, परिव्राजक व जे कोणी व्रतनियमानुष्ठान करणारे आहेत त्या सर्वांना प्राण रक्षणासाठीं भिक्षा गृहस्थांकडूनच मिळते ह्मणून गृहस्थाश्रम हा सर्व आश्रमांचा आधार आहे.[1] क्षत्रियानें पाहिजे तर जन्मभर गृहस्थाश्रमींच रहावें अशी सवलत त्यांनीं ठेविलेली आहे. परंतु विषयसुख घेत रहाणें ह्यांतच मनुष्याची इतिकर्तव्यता झाली असें ते मानीत नसल्यामुळें व विषयसुखोपभोगानें आपण कोण व कोठून आलों इत्यादि गूढ गोष्टींबद्दल मनाला लागणारी तळमळ शांत होण्याचा संभव नसल्यामुळें त्यांनीं गृहस्थाश्रमाशिवाय आणखी दोन आश्रमांची योजना केली. जन्ममरणांतून मुक्तता हें आमच्या ऋषींचें अंतिम साध्य असल्यामुळें गृहस्थाश्रम वगैरे केवळ साधनें आहेत असें ते मानीत.

धार्मिक संस्कार. सोळा संस्कारांपैकीं पुंसवन, जातकर्म, नामकरण, उपनयन व विवाह इतक्या संस्कारांचा पुष्कळ वेळां उल्लेख आलेला आहे. विवाहासंबन्धानें पूर्वींच विस्तृत विवेचन केलें आहे. आदिपर्वांत (अध्याय ७४) जातकर्माचा उल्लेख आहे. त्यावेळीं 'तूं माझ्या अंगाअंगापासून व हृदयापासून झाला आहेस, पुत्ररूपानें तूं केवळ माझा आत्माच आहेस, तूं शंभर वर्षे जग'

१ आदिपर्व ९१

२ शान्तिपर्व १९१–११; अनु० १४१. ८० इ.

३ श्लक्ष्णकाषायसंवीतः शिखी छत्री उपानही। वामे चांसेऽवसज्याथ शुभे यष्टिकमण्डलू ॥ अरण्य० ४६.३.

१ चतुर्णामाश्रमाणां हि गार्हस्थ्यं श्रेष्ठमुत्तमम्। अयोध्या० १०६–२२; तद्धि सर्वाश्रमाणां मूलमुदाहरन्ति। गुरुकुलनिवासिनः परिव्राजका ये चान्ये संकल्पितव्रतनियमानुष्ठायिनस्तेषामपि अत एव भिक्षा बलिसंविभागाः प्रवर्तन्ते ॥ शान्ति १९१–९

अशा अर्थाचा श्लोक ह्मणत.[1] नामकरण हल्लीं प्रमाणें त्याकाळींही जन्मदिवसापासून बाराव्या दिवशीं होत असे.[2] उपनयनासंबन्धानें अनुशासनपर्वांत ह्मटलेलें आहे कीं, ब्राह्मण ब्रह्मचाऱ्याची मेखला मुञ्ज गवताची, क्षत्रियाची मूर्वा गवताची व वैश्याची लव्हाळ्यांची असावी.[3] माद्री व पाण्डु आणि दशरथ ह्यांच्या और्ध्वदेहिक क्रियांचें वर्णन अनुक्रमें आदिपर्वांत (१२०) व अयोध्याकाण्डांत (सर्ग ७६) दिलेलें आहे. दशरथाचें शरीर पालखींतून नेण्यांत आलें. त्या पालखीचे पुढें सोनें व विविध वस्त्रें फेंकीत कांहीं लोक चालले होते. छत्र चामरें वगैरे राजचिन्हें बरोबर होतीं व चन्दनकाष्ठांनीं प्रेत दहन करण्यांत आलें. श्राद्धासंबंधानें अत्यंत विस्तृत माहिती दिलेली आहे. येथें अगदीं संक्षिप्त असें सार आह्मी देणार आहों. अनुशासनपर्वाच्या २३ व्या अध्यायांत श्राद्ध केव्हां व कसें करावें, श्राद्धाला कोणाला बोलवावें व अन्न कोणतें असावें वगैरे सांगितलें आहे. जेव्हां योग्य ब्राह्मण प्राप्त होईल, दहीं व तूप यांची समृद्धि असेल, अमावास्येला, व जेव्हां आरण्य मांस मिळेल तेव्हां श्राद्ध करावें. श्राद्धाला पूर्वाह्णापेक्षां अपराह्ण बरा.[4] निमन्त्रित ब्राह्मण सत्पात्र असले पाहिजेत. 'पितरांसंबन्धीं सर्व कर्मांत ब्राह्मण सत्पात्र आहे किंवा नाहीं याची चिकित्सा करावी. देवांसाठीं केलेल्या कर्मांत तसें करूं नये.'[1] श्राद्धाला निषिद्ध असणाऱ्या ब्राह्मणांपैकीं कांहीं खालीं दिले आहेत. लुच्चा, भ्रूणहत्या करणारा, क्षयी, पशुपाळ, व्याजबट्टा करणारा, गायक, सर्व वस्तु विकणारा, आगलाव्या, विषप्रयोग करणारा, सोमविक्रय करणारा, सामुद्रिकावर पोट भरणारा, राजभृत्य, बापाशीं भांडणारा, चोर, नट, ज्योतिषावर उपजीविका करणारा हे सर्व अपात्र आहेत. श्राद्धप्रसंगीं वाढण्याचें अन्न नीच जातीच्या मनुष्यांनीं किंवा रजस्वला स्त्रियांनीं पाहिलेलें नसावें; त्यामध्यें केश किंवा किडे असूं नयेत, तें शिळें किंवा दुसऱ्यानें चाखलेलें असतां कामा नये. अनुशासनपर्वाच्या ८७ व ८९ ह्या अध्यायांत अनुक्रमें विशिष्ट तिथीला किंवा विशिष्ट नक्षत्र असतां श्राद्ध केल्यास काय फळ प्राप्त होतें तें सांगितलेलें आहे. अनुशासन पर्वाच्या ८८ व्या अध्यायांत निरनिराळ्या प्रकारचीं मांसें वाढल्यानें पितरांचीं कितीकाळपर्यंत तृप्ति होते याचें वर्णन आहे !!!

३. नैतिक स्थिति.

सत्य. ह्या सदराखालीं सर्वांत प्रमुख गोष्ट ह्मटली ह्मणजे सत्याची स्तुति व सत्याला दिलेलें महत्त्व ही होय. 'सत्य ह्या एका पदांत ब्रह्म सांठविलेलें आहे, सत्यावर धर्माची मदार आहे, सत्य ह्मणजेच अविनाशी वेद, व सत्यानें अत्यंत श्रेष्ठ असेंही

१ आदि ७४–६२. अंगादंगात्संभवासि हृदयादभिजायसे । आत्मा वै पुत्रनामासि स जीव शरदः शतम् ॥

२ अतीतैकादशाहं तु नामकर्म तथाकरोत् । बालकाण्ड १८. २१; परंतु क्षत्रियाचें नामकरण तेराव्या दिवशीं करावें असें स्मृतींत सांगितलें आहे.

३ विप्रस्य रशना मौञ्जी मौर्वी राजन्यगामिनी । बाल्वजी ह्येव वैश्यस्य धर्म एष युधिष्ठिर ॥ अनु० २३–४०

४ श्राद्धस्य ब्राह्मणः कालः प्राप्तं दधि घृतं तथा । सोमक्षयश्च मांसं च यदारण्यं युधिष्ठिर ॥ अनु० २३–२४; तथा श्राद्धस्य पूर्वाण्हादपराण्हो विशिष्यते॥ अनु. ८७–१९

१ ब्राह्मणान्न परीक्षेत क्षत्रियो दानधर्मवित् । दैवे कर्मणि पित्र्ये तु न्याय्यमाहुः परीक्षणम् ॥ अनु० ९०.२

पद प्राप्त होतें.'[१] हजार अश्वमेधांचें पुण्य एका पारड्यांत व सत्य दुसऱ्या पारड्यांत घातल्यास सत्याचें पारडेंच जड होईल. सत्यासारखा धम नाहीं, सत्यापरतें श्रेष्ठ कांहीं नाहीं, व असत्यापेक्षां तीव्र कांहीं नाहीं.[२] दोन्ही ग्रन्थांत सत्यभाषणासच चिकटून राहिल्यामुळें अनेक पुरुषांस हालअपेष्टा भोगावयास लागल्या असें आढळून येईल. युधिष्ठिर, कर्ण, भीष्म, व राम ह्यांच्या पुण्य चरित्रांचें मनन केल्यास दिलेलें वचन पाळण्यासाठीं ह्या सर्वांनीं किती आपत्ती सहन केल्या तें लक्षांत येईल. असत्याला मी जसा भितों तसा मृत्यूला भीत नाहीं असें एका ठिकाणीं ह्मटलेलें आहे. अमुक मी करीन असें वचन देऊन जो तें पाळीत नाहीं तो मिथ्यावचनानें दग्ध होतो व त्याच्या इष्टापूर्ताचा नाश होतो.[३]

दोन्ही ग्रन्थांत-विशेषत: महाभारतांत धार्मिकतेवर फार जोर दिलेला आहे. ज्यानें त्यानें आपआपल्या परिस्थितीला अनुरूप असें धर्माचरण केलें पाहिजे व अधर्माचरणाइतकी दुसरी कोणतीही गोष्ट विपत्तिजनक नाहीं हेंच महाभारताचें सार आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. धर्म हेंच महाभारताचें ध्रुवपद आहे. प्रत्यक्ष दुर्योधन लढाईचे पूर्वीं आशीर्वाद मागावयास आला असतां गान्धारी ह्मणते, 'यतो धर्मस्ततो जयः' (ज्या बाजूला धर्म त्या बाजूला जय). धृतराष्ट्र ह्मणतो कीं मला पुत्राचा त्याग तर करवत नाहीं पण जिकडे धर्म तिकडे जय.[१] धर्म हा ह्या लोकीं अत्यंत श्रेष्ठ आहे व धर्मावर सत्य प्रतिष्ठित आहे.[२] भगवान् व्यासमुनी ह्मणतात 'मी वर हात करून हांका मारितों आहे पण माझें कोणी ऐकत नाहीं. अर्थ व काम यांचा उगम धर्मांतच आहे, तर धर्माचें सेवन कां करीत नाहीं.'[३] आतां धर्माचें लक्षण काय ह्याचा विचार करूं. धर्म शब्दाच्या अनेक व्याख्या महाभारतांत आहेत. त्यांतील एक दोन चांगल्या व कांहीं एकदेशीय आहेत. वेदांत सांगितलेला अत्यंत श्रेष्ठ असा, धर्मशास्त्रांत सांगितलेला व शिष्टाचारानें विहित असा तीन प्रकारचा धर्म आहे.[४] यज्ञयाग, अध्ययन, दान, तपश्चर्या, सत्य, दम, क्षमा, अलोभ असा आठ प्रकारचा धर्माचा मार्ग आहे.[५] अहिंसा हा सर्वांत श्रेष्ठ धर्म आहे. दयाळूपणा हा सर्वांत श्रेष्ठ धर्म आहे.[७]

धार्मिक आर्यांच्या बऱ्याच कृत्यांच्या मुळाशीं ऋणत्रयाची कल्पना होती. फार पुरा-

ऋण. तन काळापासून अशी समजूत होती

१ सत्यमेकपदं ब्रह्म सत्ये धर्मः प्रतिष्ठितः । सत्यमेवाक्षया लोका सत्येनावाप्यते परम् ॥ अयोध्या० १४.७.

२ अश्वमेधसहस्रं च सत्यं च तुलया धृतम् । अश्वमेधसहस्राद्धि सत्यमेव विशिष्यते ॥ आदि ७०–१०२.

नास्ति सत्यात्समो धर्मो न सत्याद्विद्यते परम् । नहि तीव्रतरं किंचिदनृतादिह विद्यते ॥ आदि ७४–१०४.

३ न बिभेमि तथा मृत्योर्यथा बिभ्येऽनृतादहम् । वन० ३०२–६; प्रतिश्रुत्य करिष्येति कर्तव्यं तदकुर्वता । मिथ्यावचनदग्धस्य इष्टापूर्तं प्रणश्यति ॥ उद्योग० १०७–८.

१ न चोत्सहे सुतं त्यक्तुं यतो धर्मस्ततो जयः। उद्योग ३९–९

२ धर्मो हि परमो लोके धर्मे सत्यं प्रतिष्ठितम् । अनु. २१–४१

३ ऊर्ध्वबाहुर्विरौम्येष न च कश्चिच्छृणोति माम् । धर्मादर्थश्च कामश्च स धर्मः किं न सेव्यते ॥

४ वेदोक्तः परमो धर्मो धर्मशास्त्रेषु चापरः । शिष्टाचारश्च शिष्टानां त्रिविधं धर्मलक्षणम् ॥ वन० २०७–८३.

५ इज्याध्ययनदानानि तपः सत्यं दमः क्षमा । अलोभ इति मार्गोयं धर्मस्याष्टविधः स्मृतः ॥

६ अहिंसा परमो धर्मः सर्वप्राणभृतां वर । आदि० ११.१३. (ग.कृ. सुद्धां)

७ आनृशंस्यं परो धर्मः । वन० ३७३. ७६

कीं जन्मास आल्याबरोबर प्रत्येक मनुष्यावर तीन ऋणांचें ओझें असतें. ब्रह्मचर्य पाळल्यानें ऋषींच्या ऋणांतून, यज्ञयाग करून देवांच्या ऋणांतून, प्रजोत्पत्ति करून पितरांच्या ऋणांतून मनुष्य मुक्त होतो[१]. महाभारत व रामायण या दोन्ही ग्रंथांत ह्या तीन ऋणांचा उल्लेख असून शिवाय आणखी एक दोन जास्तच सांगितलेलीं आहेत. 'यज्ञांनीं देवांना संतुष्ट करावें, वेदाध्ययन व तपश्चर्या यांनीं मुनींना, पुत्रांनीं व श्राद्धांनीं पितरांना, व दयाळूपणानें मनुष्यांना संतुष्ट करावें.[२]' देव, अतिथि, भृत्य पितृ, व स्वतः अशा पांचांना जो बलि देत नाहीं तो जिवंत असूनही मेल्यासारखाच आहे.[३] पुत्र हा पित्याला पुंनामक नरकापासून मुक्त करितो. पिण्डदान करण्यासाठीं कोणी नसल्यास दूरचे पूर्वजही त्रास पावतात अशी कल्पना होती.[४] ह्यामुळें पुत्रप्राप्तीसाठीं अनेक विलक्षण वाटणाऱ्या चाली प्रचारांत आल्या. दत्तकपुत्र घेणें व नियोग ह्या त्यांतीलच दोन आहेत. ह्यामुळेंच औरसपुत्र नसल्यास निरनिराळ्या मिषांनीं पुष्कळांना पुत्र मानण्यांत येत असे. अशांतीलच क्षेत्रज, पुत्रिकापुत्र, कानीन, सहोढ, कृतक इत्यादि पुत्र होत. नियोगासंबंधानें पुढें लिहूं. अशा रीतीनें प्रत्येक गृहस्थास पुत्रप्राप्ति होणें हें एक कर्तव्यच होऊन बसलें होतें.

अतिथिसत्कार. अतिथिसत्कार हें प्रत्येक मनुष्याच्या कर्तव्यांपैकीं एक आहे असें मानीत. 'जरी अतिथि यःकश्चित् मनुष्य असला तरी त्याचा सत्कार केला पाहिजे. त्याला आसन देऊन अन्नादिकांनीं संतुष्ट केलें पाहिजे.[१]' कधीं कधीं अतिथीला गायही देत असत. अनुशासनपर्वाच्या दुसऱ्या अध्यायांत अतिथिपूजेची फार महती गाइली आहे. गृहस्थांना अतिथीपेक्षां श्रेष्ठ कोणी नाहीं.[२] अतिथींना यथाशक्ति अन्न देणें यासारखें पुण्यकारक दुसरें कांहीं नाहीं.[३] शीलवान व सत्पात्र अतिथि प्राप्त झाला असतां जर त्याची पूजा केली नाहीं तर तो आपलें पाप देऊन यजमानाचें पुण्य घेऊन जातो.[४] सुदर्शन मृत्यूला ह्मणतो, माझे प्राण, स्त्री व जें कांहीं द्रव्य मजजवळ आहे तें सर्व अतिथींना द्यावयाचें असें माझें व्रत आहे.[५]

दान. दानाची महती फार वर्णन केलेली आहे. जमिनीचें दान सर्व दानांत श्रेष्ठ असें सांगितलेलें आहे.[६] अनु-

---

१. जायमानो ह वै ब्राह्मणस्त्रिभिर्ऋणवाञ्जायते ब्रह्मचर्येण ऋषिभ्यो यज्ञेन देवेभ्यः प्रजया पितृभ्यः।

२. यज्ञैस्तु देवान्प्रीणाति स्वाध्यायतपसा मुनीन्। पुत्रैः श्राद्धैः पितृंश्चापि आनृशंस्येन मानवान्॥ आदि० १२०. १८. (१९. २० ग. कृ.)

३. देवातिथिभृत्यानां पितृणामात्मनश्च यः। न निर्वपति पंचानामुच्छ्वसन्न स जीवति॥ वन. ३१३.५८.

४. पुन्नामनरकाद्यस्मात्पितरं त्रायते सुतः। तस्मात्पुत्र इति प्रोक्तः पितॄन्यः पाति सर्वतः॥ अयोध्या० १०७.१२०.

१ अतिथिः किल पूजार्हः प्राकृतोऽपि विजानता। धर्मं जिज्ञासमानेन किं पुनर्यादृशो भवान्॥ सुन्दर० १.११२.

२ गृहस्थानां च सुश्रोणि नातिथेर्विद्यते परम् अनु० २.४४.

३ न हीदृशं पुण्यफलं विचित्रमिह विद्यते। यथाशक्ति च यो दद्यादन्नं विप्रेषु संस्कृतम्॥ वन० २४०.३६.

४ पात्रं त्वतिथिमासाद्य शीलाढ्यं यो न पूजयेत्। स दत्त्वा दुष्कृतं तस्मै पुण्यमादाय गच्छति॥ अनु०२. ९३.

५ प्राणा हि मम दाराश्च यच्चान्यद्विद्यते वसु। अतिथिभ्यो मया देयमिति मे व्रतमाहितम्॥ वन० ३१३.७१.

६ अति दानानि सर्वाणि पृथिवीदानमुच्यते। अनु० ६२.२.

शासनपर्वाच्या ६३ व्या अध्यायांत अन्नदानाची थोरवी गाइली आहे. त्याच पर्वाच्या ६८ व्या अध्यायांत तीळ व दीप यांच्या दानापासून काय फळ प्राप्त होतें तें सांगितलेलें आहे. अनुशासनपर्वाच्या ६९, १२९, १३० ह्या अध्यायांत धनू, उपानह् (पादत्राण), दीप, अन्न इत्यादिकांचें दान करणाऱ्यांची स्तुति केली आहे. अन्यायानें मिळविलेल्या द्रव्याचें दान केलें असतां दात्याला महाभयांतून तें दान मुक्त करीत नाहीं.[1] ब्राह्मणाला वचन देऊन तें मोडल्यास पापयोनि प्राप्त होते.[2] अनुशासनपर्वाच्या १३७ व्या अध्यायांत ब्राह्मणांना निरनिराळ्या वस्तु दिल्यामुळें स्वर्गास गेलेल्या लोकांची यादी दिलेली आहे. दानशूर पुरुषांत कर्ण हा अग्रगण्य आहे. सूर्यानें सूचना दिली असून ही ब्राह्मणवेष धारण करून आलेल्या इन्द्राला ज्यांवर त्याचें प्रत्यक्ष जीवित अवलंबून होतें अशीं कवचकुंडलें कर्णानें देऊन टाकिलीं.

शरणागताचें रक्षण करणें हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. शरणागताचा अव्हेर करणें हें ब्रह्महत्या किंवा गोवध यांच्याइतकेंच मोठें पातक आहे.[3] 'हात जोडून दीन होऊन जर प्रत्यक्ष शत्रु येईल, तर त्यावर दया करून त्याला मारूं नये.[4]' प्राणदानापेक्षां मोठें दान नाहीं.[1] शरण आलेल्या कपोताचें रक्षण करण्यासाठीं शिबिराजानें एका श्येनाला स्वतःचें मांस दिलें अशी कथा अनुशासनपर्वाच्या ३२ व्या अध्यायांत आहे.

आपल्या यशाला कालिमा लागूं नये ह्याबद्दल महाभारतांत व रामायणांतही प्रमुख पुरुष काळजी घेतांना दिसतात. कीर्तीची महती कर्णानें वनपर्वांत (अध्याय ३००) वर्णिली आहे. लोकापवादाला भिऊन मी जीविताचा किंबहुना जनकात्मजेचाही त्याग करीन असें राम ह्मणतो. कर्णही ह्मणतो कीं जीविताचा व्यय करूनही कीर्तीचें रक्षण केलें पाहिजे.[2]

तीर्थयात्रा करणें व पवित्र नद्यांत स्नान करणें हीं दोन्हीं पापनाशक आहेत अशी समजूत होती. प्रथम पापकर्में करून जे मनुष्य गंगातीरीं राहतात ते सुद्धां उत्तम गतीला पोंचतात.[3] ह्यासंबंधानें वनपर्वांत (अध्याय ८१) व अनुशासनपर्वांत (अध्याय २५–२६) पुष्कळ विस्तार केलेला आहे.

बंधुत्वाचें नातें फार दृढ मानावें असें सांगितलें आहे. जरी भाऊबंदांमध्यें आपसांत कलह असले तरी तिऱ्हाइतांकडून भाऊबंदांचा नाश करवूं नये. हल्लींच्या भाऊबंदकीच्या व आपसांतील दुहीच्या काळांत धर्मानें भीमाला केलेला उपदेश प्रत्येकानें आपल्या हृत्पटलावर खोदून ठेवण्यासारखा आहे. भाऊबंदांत कलह व वैर हीं असावयाचींच, परंतु जेव्हां कोणी तिऱ्हाईत

---

१ अन्यायात्समुपात्तेन दानधर्मो धनेन यः। क्रियते न स कर्तारं त्रायते महतो भयात् ॥ वन० २५१.३३.

२ ब्राह्मणस्य प्रतिश्रुत्य न मया तदुपाहृतम् । तत्कृते पापकीं योनिमापन्नोऽस्मि प्लवंगम ॥ अनु.९.१२.

३ यो हि कश्चिद्द्विजान्हन्याद्गां वा लोकस्य मातरम्। शरणागतं च त्यजते तुल्यं तेषां हि पातकम् ॥ वन० १३१.६.

४ बद्धाञ्जलिपुटं दीनं याचन्तं शरणागतम् । न हन्यादानृशंस्यार्थमपि शत्रुं परन्तप ॥ युद्ध० १८.२७.

१ प्राणदानात्परं दानं न भूतं न भविष्यति । अनु० ११६.२६.

२ अप्यहं जीवितं जह्यां युष्मान्वा भरतर्षभ । अपवादभयाद्भीतः किं पुनर्जनकात्मजाम् ॥ उत्तर० ४५.१४–१५; जीवितेनापि मे रक्ष्या कीर्तिस्तद्विद्धि मे व्रतम् ॥ वन. ३००.३८.

३ पूर्वे वयसि कर्माणि कृत्वा पापानि ये नराः । पश्चाद्गंगां निषेवन्ते तेऽपि यान्त्युत्तमां गतिम् ॥ अनु० २६.३०.

मनुष्य आपल्या भाऊबंदांचे पाठीस लागतो तेव्हां तिऱ्हाइतांकडून आपल्या भाऊबंदांचा अपमान व्हावा हें चांगल्या लोकांना खपत नाहीं.[१]

दैव व पुरुषकार. पुष्कळ ठिकाणीं दैव व पुरुषप्रयत्न ह्यांच्या परस्पर बलाबलाची तुलना केलेली आहे. त्यावरून असें वाटतें कीं व्यास व वाल्मीकि हे केवळ दैववादी किंवा केवळ प्रयत्नवादी नव्हते. दैव व पुरुषप्रयत्न ह्या दोघांचेही विषय मर्यादित आहेत; केवळ प्रयत्नानेंच किंवा केवळ दैवानेंच सर्व साध्य होईल असें नाहीं; दैव व प्रयत्न हीं परस्परसापेक्ष आहेत अशा मताचे दोन्ही ग्रन्थकार असावे असें दिसतें. अयोध्याकाण्डाच्या २२ व्या सर्गांत राम दैववादी होऊन लक्ष्मणास ह्मणतात, दैवाशीं विरोध करण्याचें कोणत्या पुरुषांत सामर्थ्य आहे?[२] लक्ष्मण हा प्रयत्नाला प्राधान्य देऊन ह्मणतो, दीन व दुबळ्या अशा दैवाची काय ह्मणून इतकी मातब्बरी मानतोस.[३] अजगरानें पकडल्यावर भीम ह्मणतो, दैवच श्रेष्ठ आहे व पुरुषप्रयत्न निष्फळ आहे.[४] योग्य क्षेत्र नसेल तर ज्याप्रमाणें पेरलेलें बीं निष्फळ होतें त्याप्रमाणें पुरुषप्रयत्नावांचून दैव हें पंगु आहे.[५]

दिनचर्या. अनुशासनपर्वाच्या १०४ व शान्तिपर्वाच्या १९३ ह्या अध्यायांत उठल्यापासून निजेपर्यंत प्रत्येक मनुष्यानें कसें वागावें यासंबन्धानें अगदीं सूक्ष्म नियम सांगितलेले आहेत. त्यांचें विस्तारानें वर्णन करणें येथें शक्य नाहीं. कांहीं ठळक ठळक गोष्टींचा उल्लेख करितों. प्रत्येकानें सूर्योदयापूर्वीं उठावें. परकी लोकांबरोबर किंवा एकटें दूर जाऊं नये. दुसऱ्याचीं वस्त्रें किंवा पादत्राण वापरूं नये. दक्षिणेकड किंवा पूर्वेकडे पाय करून निद्रा घेऊं नये. नग्न होऊन स्नान करूं नये. दिवानिद्रा घेऊं नये. ललितकलांचा अभ्यास करावा. पुराणांतील कथा वाचाव्या. महात्म्यांचें चरित्र डोळ्यांपुढें सदैव ठेवावें. सत्य बोलावें. फक्त पांच ठिकाणीं असत्य बोललें असतां पातक लागत नाहीं. थट्टेंत, स्त्रियांशीं, विवाहकाळीं, प्राणांवर बेतली असतां, सर्व धनाचा नाश होण्याची वेळ आली असतां, असत्य बोलणें पातक नाहीं.[१]

महापातकें. ब्रह्महत्या, सुरापान, चौर्य, गुरुदारगमन, व हीं चार पातकें करणारांशीं संसर्ग, अशीं पांच महापातकें मानलीं जात असत. परंतु क्षत्रियवृत्तीनें राहणाऱ्या ब्राह्मणाला लढाईत मारणें हें पातक नव्हतें.[२] भारतरामायणकाळीं ब्राह्मण सुरा पीत नव्हते यांत शंका नाहीं. पण शुक्राचार्यांच्या गोष्टीवरून ब्राह्मण एका काळीं मद्य पीत होते अशाबद्दल दंतकथा प्रचलित होती असें दिसतें. मद्यपी ब्राह्मणाबद्दल भयंकर तिटकारा वाटे असें दिसतें. सुरापी ब्राह्मणाला ज्याप्रमाणें रस्त्यांत अनार्य

---

१ भवन्ति भेदा ज्ञातीनां कलहाश्च वृकोदर । प्रसक्तानि च वैराणि कुलधर्मो न नश्यति ॥ यदा तु कश्चिज्ज्ञातीनां बाह्यः प्रार्थयते कुलम् । न मर्षयन्ति तत्सन्तो बाह्येनाभिप्रधर्षणम् ॥ वन० २४३.२–३.

२ कश्च दैवेन सौमित्रे योद्धुमुत्सहते पुमान् । अयोध्या० २२.२१.

३ किं नाम कृपणं दैवमशक्तमभिशंससि । अयोध्या २३.७.

४ दैवमेव परं मन्ये पुरुषार्थो निरर्थकः । वन० १७९.२७.

५ यथा बीजं विना क्षेत्रमुप्तं भवति निष्फलम् । तथा पुरुषकारेण विना दैवं न सिध्यति ॥ अनु० ६.७.

---

१ न नर्मयुक्तं वचनं हिनस्ति न स्त्रीषु राजन्न विवाहकाले । प्राणात्यये सर्वधनापहारे पंचानृतान्याहुरपातकानि ॥ आदि० ८६–१६;

२ उद्यतेषुमथो दृष्ट्वा ब्राह्मणं क्षत्रबन्धुवत् । यो हन्यात्समरे क्रुद्धं युध्यन्तमपलायिनम् । ब्रह्महत्या न तस्य स्यादिति धर्मेषु निश्चयः । उद्योग० १७८.५१.

ह्मणून संबोधितात त्याप्रमाणें पोटच्या गोळ्याला विकणारा जो मी त्या मला लोक अनार्य ह्मणून हांक मारतील असें एका ठिकाणीं ह्मटलेलें आहे.[१] शुक्राचार्य ह्मणतो कीं, जो ब्राह्मण आजपासून सुरा पिईल तो धर्मबाह्य होऊन त्याला ब्रह्महत्येचें पातक लागेल व इहलोकीं आणि परलोकीं तो निंद्य होईल.[२] ब्राह्मणांशिवाय बाकीचे लोक, विशेषतः क्षत्रिय सुरा पीत असत.

स्त्रियांचें चारित्र्य. स्त्रियांच्या चारित्र्याबद्दल फार काळजी घेत असत. बलात्कारापासून स्वस्त्रीप्रमाणेंच परस्त्रियांचें रक्षण केलें पाहिजे[३] परस्त्रीगमनासारखें आयुष्याची हानि करणारें दुसरें कांहीं नाहीं.[४] असें आहे तथापि वेश्यांचा क्वचित् उल्लेख आहे. कृष्ण जेव्हां पाण्डवांकडून शिष्टाई करण्यासाठीं आला तेव्हां त्याला सामोरें जाणाऱ्या लोकांत वेश्या होत्या. लोमपादानें ऋष्यशृंगाच्या आश्रमांत वेश्या पाठविल्या.[५] गान्धारी गरोदर असतां धृतराष्ट्रानें वेश्या ठेविली होती असें एका ठिकाणीं सांगितलेलें आहे.[६]

जरी रामायणमहाभारतकाळीं पातिव्रत्य हेंच स्त्रियांचें परम भूषण आहे असें मानीत असत तरी फार पुरातनकाळीं तशी स्थिति नव्हती असें भासविणारीं बरींच वाक्यें आहेत. फार पुरातनकाळीं स्त्रियांना कसलेंही बन्धन नव्हतें, कोणत्याही प्रकारचा पडदा न ठेवितां त्या मनःपूत आचरण करीत असत, पातिव्रत्याचें उल्लंघन केलें असतांही त्यांना पाप लागत नव्हतें. महर्षींनीं सुद्धां ह्या त्यांच्या वर्तनाला मान डोलविली होती व उत्तरकुरु देशांत अद्यापि अशीच स्थिति आहे असें पाण्डु स्वस्त्रीला सांगतो.[१] उद्दालक ऋषीचा पुत्र श्वेतकेतु ह्यानेंच प्रथम स्त्री व पुरुष ह्या दोघांना मर्यादा घालून दिली. स्त्रीनें पतिव्रताधर्माचें उल्लंघन केल्यास भ्रूणहत्यसारखें असुखदायी घोर पातक तिला लागेल; त्याचप्रमाणें पतिव्रता स्त्री असूनही जो परदारगमन करील त्यालाही तेंच पातक लागेल असें श्वेतकेतूनें सांगितलें आहे.[२] 'माहिष्मती नगरींत हीच स्थिति होती; तेथें स्त्रिया स्वच्छंदानें वागत, स्त्रियांना अप्रतिबन्ध आचरणासंबंधानें अग्नीनें वर दिलेला होता, त्या स्वैरिणी होऊन यथेष्ट आचरण करीत असत.'[३] कुन्तीला सूर्य ह्मणतो, कन्या शब्द 'कम्' धातूपासून निघालेला आहे

१ अनार्य इति मामार्याः पुत्रविक्रायकं ध्रुवम् । विकरिष्यन्ति रथ्यासु सुरापं ब्राह्मणं यथा ॥ अयोध्या० १२. ७८.

२ आदि० ७६. ६५.

३ यथात्मनस्तथान्येषां दारा रक्ष्या विमर्शनात् । अरण्य० ५०. ८.

४ न ही दृशमनायुष्यं लोके किंचन विद्यते । यादृशं पुरुषस्येह परदारोपसेवनम् ॥ अनु० १०४. २१.

५ वनपर्व ११०.

६ गान्धार्यां क्लिश्यमानायामुदरेण विवर्धता । धृतराष्ट्रं महाराजं वेश्या पर्यचरत्किल ॥ आदि० ११५. ३९.

१ अनावृताः किल पुरा स्त्रिय आसन्वरानने । कामचारविहारिण्यः स्वतन्त्राश्चारुहासिनि ॥ तासां व्युच्चरमाणानां कौमारात्सुभगे पतीन् । नाधर्मोऽभूद्वरारोहे स हि धर्मः पुराऽभवत् ॥ प्रमाणदृष्टो धर्मोयं पूज्यते च महर्षिभिः । उत्तरेषु च रम्भोरु कुरुष्वद्यापि दृश्यते ॥ आदि १२२.४ इत्यादि.

२ व्युच्चरन्त्याः पतिं नार्या अद्यप्रभृति पातकम् । भ्रूणहत्यासमं घोरं भविष्यत्यसुखावहम् ॥ भार्यां तथा व्युच्चरतः कौमारब्रह्मचारिणीम् । पतिव्रतामेतदेव भविता पातकं भुवि ॥ आदि १२२.१७-१८. (ग.कृ.सुद्धां)

३ तस्यां पुर्यां तदा चैव माहिष्मत्यां कुरूद्वह ॥ बभूवुरनतिग्राह्या योषितश्छन्दतः किल । एवमग्निर्वरं प्रादात्स्त्रीणामप्रतिवारणे ॥ सभा. ३१.३७-३८. (ग. कृ. प्रतींतही)

व त्या शब्दाचा अर्थ 'सर्वांवर प्रीति करणारी' असा आहे; ह्मणून कन्या स्वतन्त्र आहे; स्त्रिया व पुरुष ह्यांनीं आड पडदा न ठेवतां वागणें हेंच नैसर्गिक आहे;[1] याहून निराळें वागणें ह्मणजे कृत्रिम आहे.

हल्लींच्या काळीं अत्यंत विलक्षण व तिरस्करणीय वाटणारी अशी नियोगाची चाल भारतरामायणकाळीं प्रचलित होती. पूर्वीं आह्मीं सांगितलेंच आहे कीं प्राचीन आर्यांना पुत्रप्राप्तीची अत्यंत हांव होती. वंशवृद्धीसाठीं, दौलतीचा वारस ह्मणून व पितरांना पिण्डदान करण्यासाठीं पुत्राची फार अपेक्षा असे. अशा रीतीनें पुत्राला जें महत्व प्राप्त झालें होतें त्यामुळें नियोगाची चाल प्रचारांत आली असावी. एखादा मनुष्य निपुत्रिक वारला असतां त्याच्या स्त्रीला दिरापासून किंवा एखाद्या विद्वान् ब्राह्मणापासून पुत्रप्राप्ति करून घेण्याची परवानगी असे.[2] विचित्रवीर्याच्या स्त्रियांना द्वैपायन व्यासाकडून धृतराष्ट्र व पाण्डु हे दोन पुत्र झाले. पाण्डूनें कुन्तीलाही अशा रीतीनें पुत्रप्राप्ति करून घेण्यास सांगितलें. ती कबूल होईना तेव्हां त्यानें पूर्वींचे दाखले देऊन तिचें मन वळविलें. परशुरामानें निःक्षत्रिय पृथ्वी केली त्यावेळीं क्षत्रियांगनांना ब्राह्मणांपासून पुत्र झाले. अशा रीतीनें जे पुत्र होत त्यांना क्षेत्रज ह्मणत व ते ज्यांच्या स्त्रियांपासून झालेले असत त्यांचें नांव चालवीत.

प्राचानकाळीं आर्यावर्तांत जीं दुर्व्यसनें होतीं त्यांत द्यूत हें प्रमुख आहे. वैदिक काळीं सुद्धां द्यूतक्रीडा फारच प्रचारांत होती व त्याचे दुष्परिणाम त्या काळीं सुद्धां कळून चुकले होते.[1] द्यूताचे दुष्परिणाम चांगले माहीत असल्यामुळें राजांना द्यूतक्रीडा निषिद्ध होती. द्यूत, मृगया, सुरापान, व स्त्रियांवर आसक्ति यामुळें राजे क्षय पावतात यांत तिळमात्र संशय नाहीं.[2] युधिष्ठिरासारखा धर्मशील व शान्त राजाही द्यूतांत दंग होतो यावरून हें व्यसन फारच पसरलेलें होतें असें दिसतें. सर्पांची जननी कद्रू व गरुडाची माता विनता ह्या पण करितात कीं जी हरेल तिनें दुसरीची दासी व्हावें.[3] द्यूतासाठीं मला कोणी आव्हान केलें असतां मी मागें घेणार नाहीं असें माझें व्रत आहे असें युधिष्ठिर ह्मणतो.[4]

द्यूत.

द्यूतांत जिंकला जाऊन ज्याचें द्रव्य किंवा राज्य हरण झालें असेल तो पुनः खेळण्यास आला असतां त्याच्याशीं खेळलें पाहिजे असा नियम होता.[5]

१ कन्याशब्दाची व्युत्पत्ति वनपर्वांत (३०७. १३) आहे. अनावृताः स्त्रियः सर्वा नराश्च वरवर्णिनि । स्वभाव एष लोकानां विकारोऽन्य इति स्मृतः ॥ वन० ३०७.१५.

२ नारी तु पत्यभावे वै देवरं कुरुते पतिम् । अनु० ८. २२.

३ एवं निःक्षत्रिये लोके कृते तेन महर्षिणा । उत्पादितान्यपत्यानि ब्राह्मणैर्वेदपारगैः ॥ आदि० १०४.५. (ग. कृ. सुद्धां); तस्मात्त्वमपि कल्याणि ब्राह्मणात्तपसाधिकात्। मन्नियोगाद्यत क्षिप्रमपत्योत्पादनं प्रति आदि० १२०. ४०(४१ ग. कृ.)

१ अक्षैर्मा दीव्यः कृषिमित्कृषस्व वित्ते रमस्व बहु मन्यमानः । तत्र गावः कितव तत्र जाया तन्मे विचष्टे सवितायमर्यः ॥ ऋग्वेद १०-३४-१३.

२ अक्षेषु मृगयायां च पाने स्त्रीषु च वीर्यवान् । एतैर्दोषैर्नरा राजन्क्षयं यान्ति न संशयः ॥ अनु० १५७. ३३.

३ एहि सार्धं मया दीव्य दासीभावाय भामिनि । आदि० २०.४. (ग. कृ. सुद्धां.)

४ आहूतोऽहं न निवर्ते कदाचित्तदाहितं शाश्वतं वै व्रतं मे ॥ सभा०५८.१६. (ग. कृ. सुद्धां.)

५ जित्वा परस्वमाहृत्य राज्यं वा यदि वा वसु । प्रतिपाणः प्रदातव्यः परमो धर्म उच्यते ॥ वन०७८.७.

फाशांच्या कांहीं दानांचीं नांवें कलि (एक्का), द्वापर (दुव्वा), त्रेता, कृत अशीं होतीं.[1]

दास्य. जरी गुलामांचा व्यापार इंग्लिश लोकांनीं आपल्या पदराला कोट्यावधि रुपयांचा खार लाऊन आपल्या वसाहतींत बंद केला होता तरी गुलामगिरीची अमानुष चाल पन्नास वर्षांपूर्वीं सुधारलेल्या अमेरिकाखण्डांत चालू होती. गुलामांना पुष्कळ वेळ आंगावर शहारे येतील इतक्या क्रौर्यानें वागवीत. अशा प्रकारची गुलामगिरी आर्यावर्तांत होती असा पुरावा मिळत नाहीं. तथापि मनुष्यांचा क्रयविक्रय होत असे असें दिसतें. एका ठिकाणीं असें ह्मटलेलें आहे कीं पुरुष विकत घेण्याला मजजवळ वित्त नाहीं.[2] कांहीं दास व दासी यांना आपल्या धन्यांना सोडून जातां येत नसे. शर्मिष्ठा देवयानीला ह्मणते, मी आपल्या हजार दासींसहवर्तमान दासी होऊन तुझी सेवा करीन, ज्यांठिकाणीं तुझा पिता तुला देईल तेथें मी तुझ्या मागून येऊन.[3] असें जरी आहे तरी दासदासींना दयाळूपणानें वागविण्यांत येत असे.

आत्महत्या. आत्महत्या करणाराला शुभ लोक प्राप्त होत नाहींत.[4] प्राचीन काळच्या तेजस्वी आर्यांना घरीं खितपत पडून मरण्याचा तिटकारा असे. आयुष्याची इतिकर्तव्यता संपली, व जरेनें, रोगांनीं, बन्धुविरहानें, विपत्तीमुळें किंवा अन्य कारणांनीं जीवित

१ नाक्षान् क्षिपति गाण्डीवं न कृतं द्वापरं न च । विराट० ५०.२४.

२ न च मे विद्यते वित्तं संक्रेतुं पुरुषं क्वचित् ॥ आदि० १६२.१५. (ग. कृ. १६०-१५.)

३ अहं दासीसहस्रेण दासी ते परिचारिका । अनुत्वा तत्र यास्यामि यत्र दास्यति ते पिता ॥ आदि० ८०.२२.(ग. कृ. सुद्धां)

४ आत्महा च पुमांस्तात न लोकाँल्लभते शुभान् । आदि० १८१-२०.(ग. कृ. १७९-२०)

भारभूत व कष्टमय वाटूं लागलें असतां ते महाप्रस्थानाला निघत असत. अन्न वर्ज करून, कड्यावरून पडून, जलसमाधि घेऊन किंवा चितारोहण करून ते देहत्याग करीत. ह्याला धर्मशास्त्राचीही संमति होती. वेदवाक्यांकडे किंवा लोकवचनाकडे लक्ष देऊन प्रयागीं मरण्याचा जो विचार तुझ्या मनांत आला आहे तो सोडून देऊं नको,[1] असें एका ठिकाणीं ह्मटलेलें आहे. हें महाप्रस्थान ऋषींनासुद्धां संमत आहे असें मला वाटतें; सीतेला जर मी शोधून काढली नाहीं तर जलसमाधि घेईन[2] असें मारुति ह्मणतो.

४. खाद्य व पेय.

दोन्ही ग्रंथांतील अनेक परस्परविरोधी वाक्यें वाचून आमचा एकंदरींत असा ग्रह झाला कीं मांस हें ब्राह्मणादि सर्व वर्णांचे लोक खात असत. पांच नखें असलेल्या प्राण्यांपैकीं ब्राह्मण व क्षत्रिय ह्यांना फक्त पांचांचेंच मांस खातां येत असे.[3] शल्यक (गेंडा), श्वाविध (साळी), गोधा (घोरपड), शश (ससा) व कूर्म (कांसव) हे ते पांच प्राणी होत. त्या पुरुषश्रेष्ठांनीं वानेय (वनांत आपोआप उगवणारीं नीवार वगैरे धान्यें)मृग (हरिण) व शुद्ध बाणांनीं मारलेल्या पशूंचें मांस प्रथम ब्राह्मणांना देऊन नंतर स्वतां भक्षण केलें.[4] कांहीं ठिकाणीं मांसाचा निषेध क-

१ न वेदवचनात्तात न लोकवचनादपि । मतिरुत्क्रमणीया ते प्रयागमरणं प्रति ॥ वन० ८५.७३.

२ इदमप्यृषिभिर्दृष्टं निर्याणमिति मे मतिः। सम्यगापः प्रवेक्ष्यामि न चेत्पश्यामि जानकीम्॥ सुन्दरका० १३.४१.

३ पंच पंचनखा भक्ष्या ब्रह्मक्षत्रेण राघव । शल्यकः श्वाविधो गोधा शशः कूर्मश्च पंचमः ॥ किष्किन्धा १७. ३९.

४ वानेयं च मृगाश्चैव शुद्धैर्बाणैर्निपातितम् । ब्राह्मणानां निवेद्याग्रमभुञ्जन् पुरुषर्षभाः ॥ वन० ५०.४.

रून अहिंसेची स्तुति केलेली आहे हें वर आलेंच आहे. 'जे पुरुष मद्य, मांस व परस्त्रिया यांपासून पराङ्मुख असतात ते स्वर्गास जातात. तपस्वी लोक ह्मणून मांस खात नाहींत, मांस भक्षणांत जे दोष आहेत ते मी तुला सांगतों.'[1]

अरण्यकाण्डांत यव (जव), गोधूम (गहूं) व शालि (साळ, तांदूळ) हीं धान्यांचीं नांवें आलेलीं आहेत व उत्तरकाण्डांत तीळ, उडीद, मूग, कुळीथ व चणे ह्यांचा उल्लेख आहे.

ऊनऊन भाताच्या पर्वतासारख्या राशी पडलेल्या होत्या असें वर्णन केलेलें आहे.[2] एकंदर खावयाच्या पदार्थांचे पांच वर्ग केलेले आहेत; भक्ष्य, भोज्य, चोष्य, (चोखून खाण्याचे), लेह्य (चाटून खाण्याचे), व पेय.[3] इतर ग्रंथांत चारच सांगितलेले असतात. सुन्दरकाण्डांत (अध्याय ११) बोकड, रानडुकर, मोर, कोंबडा, हरिण, रेडा, कृकल (एक प्रकारचा पक्षी) व वाघ्रीणस (एक प्रकारचा पक्षी) इतक्यांचें मांस खात असत असें सांगितलेलें आहे. महाभारतामध्यें व्रीहि (तांदूळ), श्यामाक (सांवे), यव, तीळ, कुळीथ, सर्षप (मोहरी), चण (चणे), मूग व अतसी (अळशी) इतक्या धान्यांचीं नांवें आलीं आहेत.

कांहीं भाज्यांचीं नांवें खालीं दिलीं आहेत; कालशाक (चुका), मूलक (मुळा), पलाण्डु (कांदा), लशुण (लसून), सौभांजन (शेवगा, शेगट), कूष्माण्ड (कोहळा), अलाबु (काळा भोंपळा), शृंगाटक (शिंगाडे), शीतपाकी (?), कोविदार (कांचन) इत्यादि.

दूध, दहीं व तूप हीं खाण्याच्या पदार्थांत प्रमुख होतीं. पक्वान्नांपैकीं कांहींचीं नांवें देतों:— अपूप (घारगा), शष्कुलि (जिलबी), पायस (दुधांत शिजविलेले तांदूळ), मोदक, खांडव (द्राक्ष डाळिंब याचा पाक), कृसर (खिचडी) इत्यादि. ऊंस, गूळ, साखर, काकवी (संस्कृत 'फाणित') यांचा पुष्कळ वेळां उल्लेख केलेला आहे. लाह्यांचा उल्लेख पुनःपुनः होतो. मैरेय नांवाचें उत्तम आसव (मद्य), साखरेपासून केलेलें आसव, मोहड्याचीं फुलें व इतर अनेक फुलें व फळें यांच्या आसवांचीं नांवें रामायणांत आलीं आहेत.[1] राजेलोक सुद्धां बोर, हिंगणबेट, शिवण व बिब्बा यांचीं फळें खात असत.[2] अरण्यांत राहाणारे मुनि बोर, आंवळा, हिंगणबेट, पिंपळ, करूषक (?) व धन्वन (?) यांचीं फळें खात असत.[3] अनुशासनपर्वाच्या ९१ व्या अध्यायांत (श्लोक ३८ इत्यादि) श्राद्धदिवशीं कोणते पदार्थ वापरूं नयेत तें सांगितलेलें आहे. त्यांत हिंग, कांदे , लसूण, कोहळा, काळें मीठ, पाळलेल्या डुकराचें मांस, कृष्ण जिरें, जांभळें, शिंगाडे इत्यादि आहेत.

उपवासाला खाण्याचे पदार्थ व बलि ताम्रपात्रांत करावे[4]. हातांत रवी (किंवा कांहींच्या मतानें निखारे काढण्याचा पळा), झारा, व मांस

---

१ निवृत्ता मधुमांसेभ्यः परदारेभ्य एव च । निवृत्ताश्चैव मद्येभ्यस्ते नराः स्वर्गगामिनः ॥ अनु. २३-८९; न भक्ष्यन्त्यतो मांसं तपोयुक्ता मनीषिणः । दोषांस्तु भक्षणे राजन्मांसस्येह निबोध मे ॥ अनु० ११४-१०.

२ उष्णाढ्यस्यौदनस्यात्र राशयः पर्वतोपमाः । बालकांण्ड ५३.३.

३ अयोध्या० ९१.२०.

१ शर्करासवमाध्वीकाः पुष्पासवफलासवाः । सुन्दर० ११.२३.

२ बदरेंगुदकाश्मर्यभल्लातकफलानि च । अनु० ५३. १९.

३ वन० १११.१३.

४ उपवासे बलौ चापि ताम्रपात्रं विशिष्यते॥ अनु० १२६.२२.

काषण्याचे सुरे घेऊन जाणाऱ्या आचाऱ्यांचा उल्लेख एका ठिकाणीं केलेला आहे.[१] मोठमोठ्या घराण्यांत पाकसिद्धि करण्यास आचारी असत व त्याकाळींही हल्लींच्याप्रमाणें बल्लवाचार्य मजबूत असून कुस्त्या वगैरे घेण्यांत त्यांचा पहिला पाय असे. मीठ, शिजलेलें अन्न, दहीं, दूध, मध, तेल, तूप, तीळ, मांस, फळें, मुळें, भाजी, रक्त वस्त्र, सर्व सुवास व गूळ विकूं नयेत असें सांगितलेलें आहे.[२]

५. वस्त्रप्रावरण व भूषणें.

स्त्रिया दोन वस्त्रें परिधान करीत असत. वस्त्रें प्रायः रेशमाचीं किंवा लोंकरीचीं वापरीत. बकरे व मेंढ्या यांच्या लोंकरीचा उल्लेख अनेक स्थळीं केलेला आहे. हरिणाचें व वाघाचें चामडें मुनिजन वापरीत असत. वस्त्रांना रंग देण्याची कला चांगली अवगत होती. पांढऱ्या वस्त्रावर दुसऱ्या रंगाचा डाग पडल्यास तें स्वच्छ करितां येतें, पण पांढऱ्या वस्त्रावरील बिब्याची खूण जात नाहीं असें एका ठिकाणीं ह्मटलेलें आहे.[३] काम्बोजदेशच्या राजानें अति मूल्यवान् असे कम्बल (शाली ?) पाठविले असें वर्णन केलेलें आहे.[४] कापूस हा माहीत होता, परंतु त्याचा फारसा उल्लेख येत नाहीं यावरून कापसाचीं वस्त्रें विशेष प्रचारांत नव्हतीं कीं काय असा संशय येतो. 'तलम असें मेंढीच्या लोंकरीचें व कापसाचें न केलेलें असें वस्त्र व मृदु असें अजिन' असें एका ठिकाणीं ह्मटलेलें आहे.[१] कापसाच्या जीर्ण वस्त्रांनीं राक्षसांनीं मारुतीचे शेपूट आच्छादिलें व त्याला आग लावून दिली. राजे मुकुट घालित; इतरलोक पागोट्यासारखें शिरोवेष्टन घालीत त्याला उष्णीष ह्मणत.

स्त्रियांच्या अलंकारांपैकीं कांहींचीं नावें खालीं देतों.[२] कर्णवेष्ट[३] (कुंडलें), श्वदंष्ट्र (कानांत घालण्याचें एक भूषण), वलय (कंकण), केयूर(बाजूबंद), हार, हेमसूत्ररशना (सोन्याचा कंबरपट्टा), नूपुर (तोरड्या), अंगुलीयक (आंगठी) इत्यादि. आंगठ्यांवर नांवें कोरलेलीं असत. सोनें व रुपें यांखेरीज पोंवळीं, वैदूर्य, स्फटिक इत्यादि मणि ह्यांचा उल्लेख केलेला आहे. त्या काळींसुद्धां हल्लींच्या प्रमाणें सिंहलद्वीपांतून मोत्यें येत असत. शिवाय तेथूनच वैदूर्य व सुंदर कुथा (सतरंजा किंवा हत्तीची झूल) येत असत असें वर्णन केलेलें आहे.[४] स्त्रिया पायांना अळित्याचा रंग लावीत असत.[५]

राज्यव्यवस्था.

मनुस्मृति, महाभारत, चाणक्यनीति, कामन्दकीयनीतिसार वगैरे ग्रन्थांवरून प्राचीनकाळच्या राज्यव्यवस्थेबद्दल संपूर्ण माहिती

१ खजां च दर्वीं च करेण धारयन्नींस च कालांगमशोकमव्रणम् ॥ विराट८०.१.

२ अविक्रेयं लवणं पक्वमन्नं दधि क्षीरं मधु तैलं घृतंच । तिला मांसं फलमूलानि शाकं रक्तं वासः सर्वगन्धा गुडाश्च ॥ उद्योग० ३८.५.

३ अविरक्तं शोध्यते वस्त्रं न तु कृष्णोपसंहितम् । शान्ति० २९२-१०.

४ काम्बोजः प्राहिणोत्तस्मै परार्ध्यानपि कम्बलान् ॥ सभा० ४९.१९(ग. कृ. सुद्धां)

१ श्लक्ष्णं वस्त्रमकार्पासमाविकं मृदु चाजिनम् । सभा० ५१.२७. (ग. कृ.)

२ वेष्टन्ते तस्य लाङ्गूलं जीर्णैः कार्पासिकैः पटैः ॥ सुन्दर०५३.६.

३ सुकृतौ कर्णवेष्टौ च श्वदंष्ट्रौ च सुसंस्थितौ। सुंदर० १५.४२.

४ समुद्रसारं वैदूर्यं मुक्तासंघांस्तथैव च । शतशश्च कुथांस्तत्र सिंहलाः समुपाहरन् ॥ सभा. ५२.३६ (ग.कृ. सुद्धां.)

५ अलक्तरसरक्ताभावलक्तरसवर्जितौ । अयोध्या६०. १८.

मिळेल. प्रस्तुत निबन्धांत आपल्याला महाभारत व रामायण ह्यांवरून काय समजतें तेवढेंच पहावयाचें आहे. र्‍हिस डेव्हिड्स यांनीं आपल्या 'बुद्धकालीन हिंदुस्थान' ह्या ग्रन्थांत गौतमबुद्धाचे काळीं हिंदुस्थानांत प्रजासत्ताक राज्यें होतीं असें सिद्ध केलें आहे. रामायण व महाभारत ह्या दोन्ही ग्रंथांत प्रजासत्ताक राज्यपद्धतीचा उल्लेख आह्मांला आढळला नाहीं. ह्या दोन्ही ग्रन्थांचे मतानें राजसत्तेचें केन्द्र ह्मणजे राजाच होय असें दिसतें. राजाची सत्ता अनियंत्रित होती. ह्याचा असा मात्र अर्थ करावयाचा नाहीं कीं राजानें पाहिजे तो अन्याय केला तरी त्याला कोणी विचारणारा नसे व त्याला तसें करण्याची मुभा होती. राजाची सत्ता अनियंत्रित होती याचा अर्थ असा कीं, राजा व प्रजा ह्यांचे हक्क व कर्तव्यें यांचें नियमन करणारी एखादी सनद प्रजाजनांना मिळालेली नव्हती. राजाचे कृत्यांचें नियमन शास्त्र व लोकमत ह्यांनीं थोडेंबहुत होत असे ह्यांत शंका नाहीं. राजांनाही प्रसंगीं लोकमतापुढें मान वांकवावी लागली अशीं उदाहरणें आह्मीं खालीं देणारच आहों. राजांचे हक्कांपेक्षां राजांचीं कर्तव्यें काय आहेत यावरच शास्त्रकारांनीं व दोन्ही ग्रन्थकारांनीं जोर दिलेला आहे. राजाचें कर्तव्य प्रजेचें पालन करून तिला संतुष्ट राखणें, असें दोन्ही ग्रंथांत पुनःपुनः प्रतिपादिलें आहे. कालिदासादि कवींनींही राजा शब्दाची व्युत्पत्ति प्रजेचें रंजन करणारा अशी दिली आहे. समाजाला कोणी तरी शास्ता असणें अत्यंत जरूर आहे; वर्ण व आश्रम यांचे धर्म निर्विघ्नपणें पार पडण्यास राजाची अत्यंत आवश्यकता आहे; अराजक राष्ट्र विनाश पावतें ह्यामुळें राजपदाला लोक अत्यंत मान देत; व त्याची थोरवी वाढविण्यासाठींच राजा हा विष्णूचा अवतार आहे अशी भावना लोकांत उत्पन्न झाली. हें जरी खरें आहे तरी राजाला प्राप्त झालेली ही स्थिति त्याचे स्वतःचे चैनीसाठीं आहे असें कोठेंही ह्मटलेलें नाहीं. राजानें आपल्या मोठ्या अधिकाराचा उपयोग प्रजाहिताकडेच केला पाहिजे, असें शास्त्रकार सांगतात.

महत्त्वाच्या प्रसंगीं पौरजानपदांची सभा बोलावून त्यांचें मत घेण्याची प्राचीन काळीं चाल होती असें दिसतें. रामाला यौवराज्याचा अभिषेक करावयाचे वेळीं दशरथानें ब्राह्मण, सामन्त व पौरजानपद ह्या सर्वांची सभा भरवून त्यांना ह्मटलें, 'पुत्राला प्रजाहिताचे कार्याला लावून जमलेल्या सर्व मंडळीच्या परवानगीनें स्वतः विश्रांति घेण्याची माझी इच्छा आहे. आपण मी ह्मणतों याला अनुमोदन द्या अथवा मी काय करूं तें सांगा.'[1] हें दशरथाचें बोलणें ऐकल्याबरोबर सभेनें मोठा घोष करून आपली अनुमति दर्शविली[2]. हें वर्णन वाचून आधुनिक काळच्या सभांची आठवण होते.

सगर राजाला असमञ्ज नांवाचा पुत्र होता. रोमच्या नीरो नांवाच्या दुष्ट राजाप्रमाणें, प्रजाजनांचीं मुलें सरयूनदीच्या पाण्यांत फेंकून त्या अर्भकांनीं मारलेल्या दीन आरोळ्या ऐकण्यांत व त्यांचे बुडतांना झालेले हाल पाहाण्यांत त्याला मौज वाटत असे. राजपुत्राच्या करमणुकीखातर प्राणांहून प्रिय अशा बालकांचा बळी देण्यास प्रजाजन तयार नसल्यामुळें त्यांनीं राजाला निक्षून सांगितलें कीं, राजपुत्राला तरी

१. सोहं विश्राममिच्छामि पुत्रं कृत्वा प्रजाहिते ।
संनिकृष्टानिमान्सर्वाननुमान्य द्विजर्षभान् ॥ १० ...
भवन्तो मेऽनुमन्यन्तां कथं वा करवाण्यहम् । १५
अयोध्या ० २

२. जनघोषो महानभूत् । अयोध्या. ३.५.

हद्दपार कर किंवा आह्मांला तरी सोडून दे. राजानें असमंजाला हद्दपार करून प्रजेला संतुष्ट केलें.

आपलें यौवन बापाला देऊन त्याच्या जरेचा स्वीकार पितृभक्तीनें केल्यामुळें ययाति राजाचे मनांत सर्वांत धाकटा असतांही पुरूला राज्य द्यावयाचें होतें. प्रजाजनांनीं त्याला विचारिलें, ज्येष्ठ पुत्र जिवंत असतां कनिष्ठ जो पुरु त्याला राज्य कसें देतां येईल? यावर ययातीनें उत्तर दिलें कीं, मोठ्या मुलांनीं माझें वचन मानिलें नाहीं; पुरूनेंच केवळ पितृभक्ती-मुळें माझें वचन ऐकिलें, ह्मणून त्यालाच राज्य द्यावें असें माझे मनांत आहे. आपणही मेहेर-बानीनें माझे विनंतीला मान देऊन पुरूला अभिषेक करावा.[1]

दशरथ राजा मृत्यु पावला त्यावेळीं राम वनवासाला गेला होता व भरत मातुलगृहीं होता. त्यावेळीं वसिष्ठाचे अध्यक्षतेखालीं सर्व पौरजानपदांची सभा भरली व त्या सभेंत भरताला बोलाविण्यासाठीं दूत पाठविण्याचें ठरलें. त्या सभेंत अराजक स्थितीमुळें काय अ-नर्थ ओढवतात याचा खल झाला व लोक ह्मणाले, नवीन राजा नेमण्यांत मुळींच वेळ मोडतां कामा नये, ह्मणून आजचे आज इक्ष्वाकुवंशां-तलि कोणाला तरी राजा करावा. हे वसिष्ठा, तूंच इक्ष्वाकुकुलांतील कुमाराला किंवा दुसऱ्या कोणाला अभिषेक कर.[2] ह्याठिकाणीं 'इक्ष्वाकु कुलांतील कुमाराला किंवा दुसऱ्या कोणाला' हे शब्द फार महत्वाचे आहेत. त्यांवरून असें दिसतें कीं पुष्कळ काळपर्यंत राज्योपभोग घेत असलेल्या राजवंशाला सोडून नवीन मनुष्याला राजा करणें यांतसुद्धां प्रजेला कांहीं विशेष चमत्कारिक असें वाटत नव्हतें.

प्रतीप नांवाच्या राजाला देवापि,बाल्हीक व शांतनु ह्या नांवाचे तीन पुत्र होते. देवापि हा मोठा धार्मिक असून प्रजेला प्रिय होता; परंतु असाध्य अशा त्वग्रोगानें त्याला ग्रासिलें होतें. प्रतीप जेव्हां वृद्ध झाला तेव्हां देवापीला राज्या-भिषेक करण्याचें त्याचे मनांत आलें व त्याप्र-माणें त्यानें अभिषेकाची मोठ्या जारीनें तयारी केली. तेव्हां ब्राह्मण,वृद्धलोक,पौरजानपद यांनीं जरी देवापि ज्येष्ठ पुत्र होता तरी त्याला अभि-षेक करण्यापासून राजाला परावृत्त केलें. ते ह्मणाले, देवतांना व्यंग राजा आवडत नाहीं.[1] तेव्हां प्रतीपानें प्रजेच्या ह्मणण्याला मान डोल-वून कनिष्ठ पुत्र जो शांतनु त्याला अभिषेक केला. वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं, राजाची निवडणूक करण्याचे कामांत व इतर गोष्टींतही प्रजाजन पुष्कळ वेळां आपल्या मताप्रमाणें सर्व घडवून आणीत.

राजपुत्रांत जो ज्येष्ठ असे त्याला प्रायः गादी मिळे. एका ठिकाणीं असें ह्मटलेलें आहे कीं, राजाचे सर्वच मुलगे गादीवर बसत नाहींत; तसें झाल्यास मोठीच हानि होईल. जरी इतर मुलगे गुणवान् असले तरी राज्याची व्यवस्था ज्येष्ठ पुत्रावर सोंपवितात.[2] असें जरी होतें

१. भवतोऽनुनयाम्येवं पुरू राज्येऽभिषिच्यताम् । आदि० ८५.२९ (ग.कृ.)

२. एते द्विजाः सहामात्यैः पृथग्वाचमुदीरयन् । ४. ......इक्ष्वाकूणामिहाद्यैव कश्चिद्राजा विधीयताम् । ८. कुमारमिक्ष्वाकुसुतं तथान्यं त्वमेव राजानमिहाभिषे-चय ॥ ३८ अयोध्या० ६७

१. तं ब्राह्मणाश्च वृद्धाश्च पौरजानपदैः सह ॥२२. सर्वे निवारयामासुर्देवापेरभिषेचनम्......हीनांगं पृथिवी-पालं नाभिनन्दन्ति देवताः । इति कृत्वा नृपश्रेष्ठं प्रत्य-षेधन् द्विजर्षभाः॥ उद्योग० १४९.२५.

२. सततं राजपुत्रेषु ज्येष्ठो राजाभिषिच्यते । राज्ञा-मेतत्संमतं स्यादिक्ष्वाकूणां विशेषतः ॥ अयोध्या ७३. २२; नहि राज्ञः सुताः सर्वे राज्ये तिष्ठन्ति भामिनि । स्थाप्यमानेषु सर्वेषु सुमहाननयो भवेत् । तस्माज्ज्येष्ठे हि कैकेयि राज्यतन्त्राणि पार्थिवाः । स्थापयन्त्यनवद्यांगि गुणवत्स्वितरेष्वपि ॥ अयोध्या ८.२३-२४.

तरी ह्या नियमाला क्वचित् अपवादही असत. जर ज्येष्ठ पुत्र व्यंग असला किंवा त्याला एखादा असाध्य रोग झाला असला तर त्याला टाकून लहान भावाला गादी मिळे. अशा प्रकारचीं दोन प्रसिद्ध उदाहरणें आहेत, एक देवापीचें व दुसरें धृतराष्ट्राचें. देवापीची कथा वर दिलीच आहे. धृतराष्ट्र हा अन्ध होता ह्मणून त्याला गादी मिळाली नाहीं. धृतराष्ट्र ह्मणतो, मी ज्येष्ठ असूनही हीनांग असल्यामुळें मतिमान् अशा पांडूनें गादी मिळविली.[1] प्रजेच्या अनुमतीनें ज्येष्ठ मुलगा योग्य असतांही राजाला क्वचित् कनिष्ठ मुलाला गादी देतां येत असे हें पुरूचे उदाहरणावरून दिसून येईल. एकदां ज्येष्ठ पुत्राला टाकून कनिष्ठाला राज्य मिळालें ह्मणजे तें त्याच्याच वंशजांकडे चाले; ज्येष्ठाच्या मुलांना तें कधींही मिळत नसे. यदु जरी ययातीचा ज्येष्ठ पुत्र होता तरी राज्य पुरूला मिळालें व त्यानंतर तें त्याच्याच वंशजांकडे चाललें. पुनः यदूच्या वंशजांना मिळालें नाहीं. धृतराष्ट्र ह्मणतो, लहान असूनही पाण्डूला राज्य मिळालें; तें त्याचे मृत्यूनंतर त्याच्या मुलांना मिळणार.[2]

राजधर्म. रामायणांत अयोध्याकाण्डांत (सर्ग १००) व अरण्यकाण्डांत (सर्ग३३) राजधर्माचें विस्तारेंकरून वर्णन केलेलें आहे. महाभारतांत तर बहुतेक प्रत्येक पर्वांत राजधर्माची फोड केलेली आहे; विशेषतः सभापर्व, उद्योगपर्व, शान्तिपर्व ह्या तीन पर्वांत फारच विस्तार आहे. राजाचें सर्वांत श्रेष्ठ कर्तव्य ह्मटलें ह्मणजे प्रजापालन होय. प्रजापालन करतांना राजाला कोणतीही गोष्ट करावी लागली तरी त्यानें ती केली पाहिजे, मग तींत नैष्ठुर्य असो कीं पाप असो.[1] राजानें प्रजेला संतुष्ट राखलें पाहिजे. राजा हा आत्मनिग्रही, सत्यवादी, न्यायी, उद्योगशील व व्यसनरहित असला पाहिजे. राजानें नेहमीं सरळ मार्गानें चालावें, परंतु राजनीतींतील सर्व खोंचा त्याच्या ध्यानांत असल्या पाहिजेत व प्रसंगानुरूप वर्तन त्याचेकडून घडलें पाहिजे. राजानें मृदु बोलावें पण चाकरांशीं अतिपरिचय ठेवूं नये. राजानें फार मऊपणानें किंवा फार कडकपणानेंही वागूं नये. राजनीतीचें अध्ययन करून साम, दान, दण्ड व भेद ह्या चार उपायांचा अवलंब केव्हां व कसा करावा; संधि, विग्रह, यान (चाल करून जाणें), आसन (छावणी देऊन बसणें), आश्रय (किल्ल्याचे आड रहाणें) व द्वैधीभाव (धरसोड) ह्या सहा गुणांचा केव्हां उपयोग करावा; इत्यादि गोष्टी त्याला पूर्णपणें अवगत असाव्या. त्यानें आपल्या किल्ल्यांमध्यें द्रव्य, अन्न, जल, शस्त्रास्त्रें, योद्धे व शिल्पकार यांचा संग्रह करून ठेवावा. सैनिकांना वेतन नियमितपणानें द्यावें व विशेष गुण ज्यांनीं दाखविला असेल त्यांना पारितोषिक द्यावें. राजाच्या सेवेमध्यें जे विपन्न झाले, किंवा राजकार्य करण्यांत जे कामीं आले असतील, त्यांच्या कुटुंबांचा योगक्षेम राजानें चालवावा.[2] जमा व खर्च ह्या दोहोंवर राजाची सक्त नजर पाहिजे. राज्याची समृद्धि कृषिकर्मावर अवलंबून असल्यामुळें राजानें शेतकऱ्यांची विशेष काळजी घेतली पाहिजे. राजानें आपल्याजवळ विद्वान् ब्राह्मण मंत्री ह्मणून

१. तथैवाहं मतिमता परिचिन्त्येह पाण्डुना । ज्येष्ठः प्रभ्रंशितो राज्याद्धीनांग इति भारत ॥ उद्योग १४९.२९.

२. पाण्डुस्तु राज्यं संप्राप्तः कनीयानपि सन्नृपः । विनाशे तस्य पुत्राणामिदं राज्यमरिन्दम । उद्योग १४९-३०.

१. नृशंसमनृशंसं वा प्रजारक्षणकारणात् । पातकं वा सदोषं वा कर्तव्यं रक्षता सदा । बाल० २५.१८

२. कच्चिद्दारान्मनुष्याणां तवार्थे मृत्युमीयुषाम् । व्यसनं चाभ्युपेतानां बिभर्षि भरतर्षभ ॥ सभा० ५-५४. (ग. कृ. सुद्धां)

बाळगावे. राजानें ब्राह्मणांशीं कलह करूं नये, कारण त्यानें तसें केल्यास आपल्या नीतिबलानें ते त्याला राज्यभ्रष्ट करितील.[1] शस्त्रबलापेक्षां नीतिबल श्रेष्ठ आहे. स्वतांच्या राज्यांत व परराज्यांत गुप्त हेर ठेवावे. राजानें प्रजेवर करांचें फार ओझें घालूं नये. ज्याप्रमाणें पुष्पांचें रक्षण करून भ्रमर त्यांतून मध घेतो त्याप्रमाणें लोकांना पीडा न देतां प्रजेपासून द्रव्य घ्यावें.[2] राजाला प्रजापालनाचा मोबदला ह्मणून जमिनीचे उत्पन्नांतून व इतर वस्तूंतूनही षष्ठांश मिळत असे. जो राजा षष्ठांश कर घेऊन प्रजेचें पुत्रवत् रक्षण करणार नाहीं त्याला फार पाप लागेल असें एका ठिकाणीं ह्मटलेलें आहे.[3]

राजानें जे बेत केले असतील त्यांना फल येईपर्यंत ते कोणासही कळतां उपयोगी नाहीं. राजानें शत्रूंच्या हालचालींवर चांगलें लक्ष ठेऊन त्यांच्या राज्यांत फंदफितूर उत्पन्न केला पाहिजे. राजानें दीर्घसूत्री असूं नये; व स्त्रिया, द्यूत, मद्य आणि मृगया यांवर आसक्ति ठेवूं नये. राजानें स्वतां सनातनधर्माप्रमाणें आचरण करून प्रजेकडून धर्माचरण करविलें पाहिजे. राजा हा कालाचें कारण आहे.[4] राजा जर प्रजेचें यथाविधि पालन करणार नाहीं तर त्याच्या दोषामुळें किंवा लोक अयुक्ताचरण करीत असतांही

१. अथवा त्वां महीपाल शमयिष्यन्ति वै द्विजाः। निरासिष्यन्ति ते राष्ट्राद्धतोत्साहा महाबलाः॥ अनु. १५३–२५.

२. यथा मधु समादत्ते रक्षन्पुष्पाणि षट्पदः। तद्वदर्थान्मनुष्येभ्य आदद्यादविहिंसया॥ उद्योग ३४.१७.

३. अधर्मः सुमहान्नाम भवेत्तस्य तु भूपतेः। यो हरेद्बलिषड्भागं न च रक्षति पुत्रवत्॥ अरण्य० ६.११.

४. कालो वा कारणं राज्ञो राजा वा कालकारणम्। इति ते संशयो मा भूद्राजा कालस्य कारणम्॥ उद्योग० १३२.१६.

त्यांस शिक्षा न झाल्यामुळें अकालमृत्यु इत्यादि आपत्ति उत्पन्न होतात असा सार्वत्रिक समज होता.[1] अकालमृत्यु आलेला आपला पुत्र राजद्वारीं ठेवून एका ब्राह्मणानें रामाची फारच निर्भर्त्सना केली. अंध, मूक, पंगु, व्यंग, बांधवरहित, संन्यस्त, अशा लोकांचें व विधवा, अनाथ इत्यादिकांचें पोषण करणें हें राजाचें कर्तव्य आहे असें समजत.[2] प्रजेमध्यें होणाऱ्या कलहांचें राजानें शमन केलें पाहिजे.

राज्याभिषेक. अयोध्याकाण्डाच्या तिसऱ्या व १४ व्या सर्गांत राज्याभिषेकाचें विस्तृत वर्णन आहे. राज्याभिषेकाला अवश्य लागणाऱ्या वस्तूंपैकीं कांहीं खालीं देतों. रथ, शस्त्रें, सैन्य, हत्ती, चवऱ्या, पंखे, पताका, शुभ्र छत्र, हेमकुम्भ, सोन्यानें ज्यांचीं शिंगें मढविलेलीं आहेत असे बैल, व्याघ्रचर्म, गंगादि नद्यांच्या पाण्यानें भरलेले कुम्भ, उदुम्बरवृक्षाचें आसन, अत्तरें, दहीं, घृत, लाह्या, दर्भ, पुष्पें इत्यादि.

अराजक स्थिति. अयोध्याकाण्डाच्या ६७ व्या सर्गांत, अराजकस्थितीमुळें राष्ट्रावर काय काय अनर्थ ओढवतात याचें सविस्तर निरूपण आहे. जेव्हां देशाला कोणी राजा नसतो, तेव्हां तें राष्ट्र मृतवत् होतें.[3] राजावर सत्य, धर्म व कुलस्थिति हीं अवलंबून आहेत. राजा हा प्रजेला पिता, माता

१. राजदोषैर्विपद्यन्ते प्रजा ह्यविधिपालिताः। असद्वृत्ते हि नृपतावकाले म्रियते जनः॥ यद्वा पुरेष्वयुक्तानि जना जनपदेषु च। कुर्वते न च रक्षास्ति तदा कालकृतं भयम्॥ उत्तर० ७३–१७.

२. कच्चिदन्धांश्च मूकांश्च पंगून् व्यंगानबान्धवान्। पितेव पासि धर्मज्ञ तथा प्रव्रजितानपि॥ सभा० ५.१२४. विधवानाथविकलान् कृपणांश्च बभार सः॥ आदि० ४९ ११. (ग. कृ. मुद्रां)

३. मृतं राष्ट्रमराजकम्। वन० ३१३.८४.

व हितकारी मित्र यांप्रमाणें आहे. अराजक राष्ट्रामध्यें नेहमीं अनेक दोष उत्पन्न होतात, कारण अमर्याद जनांना शासन करणारा राजाच आहे.[1] अराजक देशांतील वाणी दूर देशांत जाऊन निरनिराळ्या प्रकारचे पदार्थ विकावयास आणीत नाहींत; ज्याप्रमाणें मोठे मासे लहान माशांना खातात त्याप्रमाणें अराजक देशांत मनुष्य एकमेकांना लुटतात; इत्यादि वर्णन वाचण्यासारखें आहे.

मन्त्री. राजाजवळ अष्टप्रधान असत असें कांहीं ठिकाणीं वर्णन केलेलें आहे. दशरथाचे आठ अमात्य होते. त्यांचीं नांवें धृष्टि, जयन्त, विजय, सुराष्ट्र, राष्ट्वर्धक अकोप, धर्मपाल व सुमन्त्र अशीं होतीं.[2] दुसऱ्या एका ठिकाणीं असें सांगितलेलें आहे कीं, राजाच्या प्रधानमंडळांत विद्वान्, कुलीन व सरळ असे चार ब्राह्मण, बलवान् असे आठ क्षत्रिय, श्रीमान् असे २१ वैश्य, व दरिद्री परंतु सुवृत्त असे तीन शूद्र असावे. ह्या ३६ जणांतून आठ निवडून काढून त्यांच्याकडे अतिशय महत्त्वाचीं अशीं राजकारणाचीं कामें सोंपवीत. मुत्सद्दीपणा हा बाहुबलापेक्षां फार श्रेष्ठ आहे. विजयाचें मूळ मुत्सद्दीपणांत आहे असें दोन्ही ग्रंथांत पुनःपुनः सांगितलें आहे.[3] राजानें व प्रधानमण्डळानें जें राजनीतीचें धोरण ठरविलें असेल तें गुप्त ठेवून अमलांत आणलें असतां राजाचें अल्प सुद्धां कार्य नष्ट होत नाहीं.[1] राजा व प्रधानमण्डल यांचें परस्परांवर प्रेम असलें पाहिजे. मन्त्र्याचे गुणांबद्दल अरण्यकाण्डांत (४० सर्ग) बराच विस्तार केला आहे. मन्त्री हा आत्मनिग्रही, सरळ, विद्वान्, भक्तिमान् असा असला पाहिजे. शत्रूचें व आपलें बलाबल, छिद्रें, व बुद्धिवैभव यांचा पूर्ण विचार करून जो स्वामीला हितकर असें बोलेल तोच खरा मन्त्री.[2] नीचकुलोत्पन्न, अविद्वान्, मद्यपी, अनिश्चयी, व्यवहार न जाणणारा, द्यूतासक्त, नवशिका, ज्या कुळांतील कोणाचें तरी राजानें वाईट केलें आहे अशा कुळांतील मनुष्याला मन्त्रिपद देऊं नये. मन्त्र्याला आपले हेतु साम, दान, दण्ड, भेद ह्या चार उपायांनीं साध्य करितां येत असत.[3] क्वचित्‌स्थलीं कुटिलनीतीचा अवलंब करण्यास सांगितलें आहे. परंतु कुटिलनीतीचा उपदेश दुष्ट मनुष्यांचेच तोंडीं घातलेला आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. अंतिम साध्य उदात्त असलें ह्मणजे साधनें बरीं किंवा वाईट कशींही असोत, त्यांचा उपयोग करण्यास हरकत नाहीं, असें कुटिलनीतीचें तत्त्व आहे. शत्रूला विषानें, कपटानें, लांच देऊन मारावा, त्याची उपेक्षा करूं नये.[4] शत्रूवर प्रहार करीत असतां

१. राजा सत्यं च धर्मश्च राजा कुलवतां कुलम्। राजा माता पिता चैव राजा हितकरो नृणाम्॥ अयोध्या ६७.३४; अराजके जनपदे दोषा जायन्ति वै सदा। उद्वृत्तं सततं लोकं राजा दण्डेन शास्ति वै॥ आदि० ४१-२७. (ग. कृ. सुद्धां)

२. अष्टौ बभूवुर्वीरस्य तस्यामात्या यशस्विनः॥ धृष्टिर्जयन्तो विजयः सुराष्ट्रो राष्ट्रवर्धनः। अकोपो धर्मपालश्च सुमन्त्रश्चाष्टमोऽर्थवित्॥ बालकाण्ड. ७.२-३.

३. मन्त्रो विजयमूलं हि राज्ञो भवति राघव। अयोध्या १००.१६; विजयो मन्त्रमूलो हि राज्ञो भवति सभा० ५.२७. (ग. कृ. सुद्धां)

१. मन्त्रे गुप्ते सम्यगनुष्ठिते च नाल्पोऽप्यस्य च्यवते कश्चिदर्थः॥ उद्योग० ३३.११९.

२. परस्य वीर्यं स्वबलं च बुद्ध्वा स्थानं क्षयं चैव तथैव वृद्धिम्। तथा स्वपक्षेऽप्यनुमृश्य बुध्या वदेत् क्षमं स्वामिहितं स मन्त्री॥ युद्ध० १४. २२.

३. साम्ना दानेन भेदेन दण्डेनोपक्षेणन च। साधनीयानि कर्माणि समासव्यासयोगतः॥ वन १५०.४२

४. शपथेनाप्यरिं हन्यादर्थदानेन वा पुनः। विषेण मायया वापि नोपेक्षेत कथंचन॥ आदि १४२-५१; (ग. कृ. १४०. ५३.) प्रहरिष्यन् प्रियं ब्रूयात...प्रहृत्य च कृपायीत शोचेत च रुदेत च।

गोड बोलावें व प्रहार केल्यावर दया आल्यासारखें करून शोक करावा व रडावें. कणिकानें धृतराष्ट्राला अशा प्रकारचा उपदेश केलेला आहे.[१]

गुप्त हेर. गुप्त हेरांचें जाळें फार पसरलेलें असे. राजाविषयीं लोक काय बोलतात तें समजण्यासाठीं व शत्रूकडील बातमी आणण्यासाठीं गुप्त हेरांची योजना होत असे. सीतेविषयीं लोक काय बोलतात हें रामाला त्याच्या चोरानें सांगितलें. युधिष्ठिर व दुर्योधन ह्यांना एकमेकांच्या छावणींत काय चाललें आहे हें चारांकडून कळे. गुप्त हेर हे राजांचे डोळे आहेत. भीष्म ह्मणतो, जरी द्रुपदराजानें शिखण्डी स्त्री नसून पुरुष आहे अशी सर्वत्र बातमी पसरविली होती तरी शिखण्डी खरोखर कन्या आहे हें मला माझ्या हेरांकडून कळलें होतें. गुप्तहेर हे संन्यासी, गोसावी इत्यादिकांचे वेषानें फिरत असत.[३] राजानें आपल्या चारांना चांगलें वेतन देऊन संतुष्ट ठेविलें पाहिजे.

ग्राम व नगरें. जेव्हां जेव्हां ग्राम व नगरें यांचें वर्णन येतें तेव्हां तेव्हां 'हृष्टपुष्टजनाकीर्णम्' (आनंदित व पुष्ट अशा लोकांनीं भरलेलें) हें विशेषण त्या नगराला किंवा ग्रामाला लाविलेलें असतें. राजवाड्याला आठपर्यंत कक्षा असत.[४] आठव्या कक्षेंत राजा बसत असे. राजधानींत सात आठमजली राजवाडे असत.[५] राजवाड्याच्या सभोंवार उद्यानें असत. राजवाड्यांना चुन्यानें रंगवीत व भिंतींवर निरनिराळ्या प्रकारचीं चित्रें काढीत. राजवाड्यावर नागव्या तरवारींचा पाहारा असे. हातांत वेताच्या काठ्या घेतलेल्या व लाल वस्त्र परिधान केलेल्या वृद्ध अशा कञ्चुकींचा अन्तःपुरावर अधिकार असे.[१] आदिपर्वांत (अध्याय १०९ ग. कु. सुद्धां) समृद्ध देशाचें विस्तृत वर्णन आहे. सार्वजनिक विहिरी व उद्यानें असत.[२] खेडेगांवांतील घरांच्या भिंतीला मातीचा गिलावा करीत. रामाच्या राजवाड्याला मोठे प्रचंड दरवाजे व रत्नखचित कमानी होत्या असें वर्णन केलेलें आहे. घरांना उघड्या किंवा जाळ्या बसविलेल्या खिडक्या असत. अंगणांना फरशी केलेली असे. उत्सवादि महत्त्वाच्या प्रसंगीं रस्त्यांवर पाणी शिंपडीत असत.[३] घोडे, हत्ती, रथ व बैलगाडी हीं नेहमींचीं वाहनें होतीं. एका दिवसांत १४ योजनें (१४० मैल) ह्मणजे फार मोठी मजल असें समजत.[४] नगराच्या सभोंवार भिंत व खंदक असे. रस्त्यावर गर्दी झाल्यास प्रथम वाट कोणाला द्यावी यासंबंधानें कांहीं नियम ठरलेले होते. आंधळा, बहिरा, स्त्री, ओझ्यानें वांकलेला व राजा ह्यांना प्रथम रस्ता द्यावा. ब्राह्मण असल्यास त्याला सर्वांचे आधीं वाट द्यावी.[५] यांत ब्राह्मणासंबंधाचा जो मजकूर

१. आदिपर्व १४२. (ग. कु. १४०)

२. चारैः पश्यन्ति राजानश्चक्षुर्भ्यामितरे जनाः। उद्योग. ३४.३४.

३. ददर्श मध्यमे गुल्मे राक्षसस्य चरान् बहून्। दीक्षिताञ्जटिलान्मुण्डान्गोजिनाम्बरवाससः॥ सुन्दर० ४. १५.

४. अयोध्या० ५७. २४.

५. सप्तभौमाष्टभौमैश्च स ददर्श महापुरीम्॥ सुन्दर० २–५०.

१. अत्र काषायिणो वृद्धान्वेत्रपाणीन्स्वलंकृतान्। ददर्श विष्ठितान् द्वारि स्त्र्यध्यक्षान्सुसमाहितान्॥ अयोध्या १६.३.

२. आदि० १२८ (ग. कु. सुद्धां)

३. सिञ्चन्तु पृथिवीं कृत्स्नां हिमशीतेन वारिणा॥ युद्ध० १२९.७.

४. एकेनापि पतत्यह्ना योजनानि चतुर्दश। यानमश्वतरीयुक्तं दास्ये तस्मै तदप्यहम्॥ उद्योग० ८६–१२

५. अंधस्य पन्था बधिरस्य पन्थाः स्त्रियः पंथा भारवाहस्य पंथाः। राज्ञः पंथा ब्राह्मणेनासमेत्य समेत्य तु ब्राह्मणस्यैव पंथाः॥ वन. १३३.१.

आहे त्याशिवाय बाकीचा सर्वांना पसंत पडेल असाच आहे.

न्यायपद्धति. राजा हा सर्वांत मोठा असा न्यायाधीश होता. त्याच्या हाताशीं दुसरे न्यायाधीश असत. त्याकाळीं हल्लींच्याप्रमाणें वकील नसत. वादी व प्रतिवादी हे दोन्ही आपआपलें ह्मणणें न्यायाधीशाजवळ स्वतां सांगत असत. न्यायाधीश स्मृतिवचनांप्रमाणें व शिष्टाचाराप्रमाणें तंट्याचा निकाल करीत. ग्राह्य व अग्राह्य पुरावा, शिक्षा, न्यायाधीश व साक्षी यांचे गुणावगुण ह्यांविषयीं पुष्कळ माहिती महाभारतांत दिलेलीआहे. सामान्य न्यायाधीशांकडून झालेल्या निकालाविरुद्ध राजाकडे दाद मागतां येत असे. उत्तरकाण्डाच्या ९४ व्या व ९७ व्या अध्यायांत वादी व प्रतिवादी यांच्या विवादाचा योग्यवेळीं निकाल न केल्याबद्दल 'नृग' व 'निमि' ह्या दोन राजांना काय विपत्ति प्राप्त झाली याचें वर्णन आहे. 'वादी व प्रतिवादी ह्यांचे कलह राजाला त्रास देण्याला कारणीभूत होतात.'[1] जिच्या पतीनें दुसरी स्त्री केली आहे त्या स्त्रीप्रमाणें, द्यूतांत पराजित झालेल्या मनुष्याप्रमाणें, व ओझें वाहून ज्याचें शरीर तप्त झालें त्या पुरुषाप्रमाणें, जो न्यायाधीश योग्य न्याय करीत नाहीं त्याला रात्र जाते.[2] साक्षीदारानें खोटी साक्ष देऊं नये असें कंठरवानें सांगितलेलें आहे. जो साक्षीदार खोटें बोलेल त्याला नगरांत जाण्याला अटकाव होऊन तो नगराच्या दरवाजाबाहेर बुभुक्षित होऊन बसेल व शत्रूंच्या तडाक्यांत सांपडेल. जो साक्षीदार विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर माहीत असूनही भलताच जबाब देईल त्याचे सात पूर्वज व सात वंशज पतित होतील. सातप्रकारचे इसम साक्षीदार होण्याला नालायक ह्मणून सांगितलेलेआहेत. सामुद्रिक जाणणारा, पूर्वीं चोर असून मग वाण्याचा धंदा करणारा, फांसे टाकून लोकांना खोटेंच भविष्य सांगणारा, वैद्य, अरि. मित्र, व नट, लोकापवादाला भिणारा, राजा, व्यभिचारिणी, राजसेवक, पुत्र, भाऊ, विधवा, जिचा पुत्र लहान आहे अशी स्त्री, सैनिक, व स्वपदावरून काढून टाकलेला मनुष्य हे पैशाच्या देवघेवीसंबन्धानें वर्ज्य आहेत.[3]

कायदे. मालमत्तेसंबन्धानें पुष्कळ प्रकारचे कायदे सांगितलेले आहेत. अविभक्तकुटुंबपद्धतीची स्तुति करून विभक्त राहणाऱ्यांवर कोरडे ओढले आहेत. पुष्कळ लोकांना मूर्खपणानें विभक्त होण्याची इच्छा उत्पन्न होते व विभक्त होऊन पैशाच्या लोभानें एकमेकांशीं विरोध करितात; परस्परांत फूट पडली असतां लवकरच नाश होतो ह्मणून साधुलोक भावांच्या विभक्तपणाला नांवें ठेवितात.[4] विभाग करणेंच झाला तर सर्व भाऊ मालमत्ता सारखी वांटून घेत (अनु० ४७.१८.). एखाद्या ब्राह्मणाला चारी वर्णाच्या चार स्त्रिया असून प्रत्येकीला

१. कार्यार्थिनां विमर्दो हि राज्ञां दोषाय कल्पते ॥ उत्तर०५३.२४.

२. यां रात्रिमधिविन्ना स्त्री यां चैवाक्षपराजितः। यां च भाराभितप्तांगो दुर्विवक्ता स्म तां वसेत् ॥ उद्योग ३५-३१.

१. नगरे प्रतिरुद्धः सन्बहिर्द्वारि बुभुक्षितः। अमित्रान्भूयसः पश्येद्यः साक्ष्यमनृतं वदेत् ॥ उद्योग० ३२; पृष्टो हि साक्षी यः साक्ष्यं जानानोऽप्यन्यथा वदेत्। स पूर्वानात्मनः सप्त कुले हन्यात्तथापरान् ॥ आदि. ७. ३. (ग. क्र. सुद्धां.)

२. उद्योग० ३५.४४.

३. घृणी राजा पुंश्चली राजभृत्यः पुत्रो भ्राता विधवा बालपुत्रा। सेनाजीवी चोद्धृतभूतिरेव व्यवहारेषु वर्जनीया स्युरेते। उद्योग० ३७.३०.

४. विभागं बहवो मोहात्कर्तुमिच्छन्ति नित्यशः। ततो विभक्तास्त्वन्योन्यं विरुध्यन्तेऽर्थमोहिताः ॥ भिन्नानामतुलो नाशः क्षिप्रमेव प्रवर्तते। तस्माद् विभागं भ्रातॄणां न प्रशंसन्ति साधवः ॥ आदि० २९.३०.

पुत्र असला तर ब्राह्मणस्त्रीचा पुत्र घरांतील सर्व उत्तम वस्तू प्रथम घेई. बाकी जें अवशिष्ट राहील त्याचे दहा भाग करून त्यांतील चार ब्राह्मणीचे पुत्राला, तीन क्षत्रियवर्णाच्या स्त्रीच्या मुलाला, दोन वैश्यस्त्रीच्या मुलाला व एक भाग शूद्रवर्णाचे स्त्रीचे मुलाला मिळत असे. त्यांतही शूद्रवर्णाच्या स्त्रीचे मुलाला जो एक भाग मिळावयाचा तो बापानें मुद्दाम दिला असेल तरच मिळावयाचा.[१] क्षत्रियाला जर क्षत्रिय, वैश्य व शूद्र ह्या तीन वर्णांच्या स्त्रियांपासून पुत्र झाले तर, क्षत्रियस्त्रीपासून झालेल्या मुलाला बापाचें धनुष्य व रथ मिळे. बाकी राहील त्याचे आठ भाग करून चार क्षत्रियस्त्रीच्या पुत्राचे, तीन वैश्यस्त्रीच्या पुत्राचे व एक शूद्र स्त्रीच्या मुलाचा अशी वांटणी होई.

आदिपर्वांत (अध्याय १२०. ३१–३४ ग. कृ. सुद्धां) बारा प्रकारचे पुत्र सांगितलेले आहेत. त्यांतील पहिल्याच्या अभावीं दुसऱ्याला बापाची मालमत्ता मिळावयाची असा नियम होता. पुत्राच्या अभावीं कन्येला पुत्राचे ठिकाणीं समजून तिच्या मुलाला आजाची मालमत्ता मिळे व तो आजाला पिण्ड देई.[२]

एखाद्या मनुष्याच्या स्त्रीनें, पुत्रानें किंवा दासानें कांहीं मिळविलें तर त्यावर त्या मिळविणाराची मालकी नसे, तर त्या मनुष्याची असे.[३] विधवा स्त्रियांना पतीच्या मालमत्तेचा उपभोग घेण्याची परवानगी होती. परंतु मालमत्तेपैकीं थोड्याही भागाचा विक्रय वगैरे त्यांना करितां येत नसे.[१] कोणत्याही स्त्रीला तिच्या बापानें किंवा सासऱ्यानें जें कांहीं दिलेलें असेल, किंवा पतीनें जें तिच्यासाठीं ह्मणून मुद्दाम निराळें काढून ठेविलें असेल, तें त्या स्त्रीच्या मृत्यूनंतर तिच्या मुलीला मिळतें.[२] एखाद्या मनुष्यानें पुत्राच्या अभावीं कन्येला पुत्र मानिलें, व मागाहून पुत्र झाला, तर त्या पुत्राला तीन भाग व कन्येला (पुत्रिकेला) दोन भाग मिळत. पण कन्येला पुत्र मानिल्यानंतर जर दत्तक घेतला तर दत्तकाला दोनच भाग व पुत्रिकेला तीन भाग मिळत.[३]

ह्यासंबन्धानें विशेषसा विस्तार नाहीं.

अपराध व दण्ड. हल्लींच्याप्रमाणें गुन्ह्यांच्या व्याख्या व त्यांच्यामध्यें बारीक बारीक फरक असे काढलेले नव्हते. ड्रॅकोच्या पद्धतीप्रमाणें अपराध्यांना कडक शिक्षा होती. खुनाचा प्रयत्न करणाराला, आगलाव्याला चोराला, व व्यभिचारी मनुष्याला देहान्तप्रायश्चित्त सांगितलेलें आहे, ह्याचें आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. सर[४] रॉबर्ट पील ह्यांनीं सुधारणा करण्यापूर्वीं इंग्लंडांतही अनेक क्षुद्र अपराधांबद्दल फांशीची शिक्षा ठोठावीत असत. ज्यांना अपराधांबद्दल[५] शिक्षा झाली असेल ते त्या

१. तत्तु दत्तं हरेत्पित्रा नादत्तं दत्तुमर्हति ॥ अनु० ४७.१९.

२. आदि० २१७.२५.

३. त्रय एवाधना राजन्भार्या दासस्तथा सुतः । यत्ते समधिगच्छन्ति यस्य ते तस्य तद्धनम् ॥ उद्योग० ३३.६४.

१. स्त्रीणां तु पतिदायाद्यमुपभोगफलं स्मृतम् । नापहारं स्त्रियः कुर्युः पतिवित्तात्कथंचन ॥ अनु. ४७.२४.

२. मातुस्तु यौतकं यत्स्यात्कुमारीभाग एव सः । अनु० ४५.१२. अनु० ४५.१४.

३. अन्यत्र जामया सार्धं प्रजानां पुत्र ईहते । दुहितान्यत्र जातेन पुत्रेणापि विशिष्यते ॥ ह्या श्लोकाचा नीलकण्ठ चतुर्धर यांनीं केलेला अर्थ दिला आहे. श्लोक स्पष्ट नाहीं.

४. आदि० १०७.१२.(ग. कृ. सुद्धां)

५. राजभिर्धृतदण्डाश्च कृत्वा पापानि मानवाः । निर्मलाः सुखमायान्ति सन्तः सुकृतिनो यथा । किष्किंधा १८. २५

अपराधांबद्दलच्या पापांतून मुक्त होतात असा समज असे.[1] शिक्षा फार कडक देऊं नये असें राजांना सांगितलेलें आहे. अपराध्याला कडक शिक्षा राजा करितो, पण त्यामुळें निरपराधी अशी भार्या किंवा माता नाश पावते. अपराधाबद्दल प्रायश्चित्त बेताचेंच असावें; समूळ घात करूं नये.[2] प्रजेच्या मुलांना पाण्यांत फेंकी ह्मणून सगरानें आपला पुत्र जो असमंज त्याला नगरांतून घालवून दिलें.[3] ब्राह्मणाच्या धनाचें हरण केल्यामुळें, किंवा कोणा निर्दोष अशा श्रीमंत अथवा गरीब मनुष्याला मारल्यामुळें, किंवा परस्त्रियांचा अभिलाष केल्यामुळें रामाला वनवासाला पाठविलें आहे कीं काय असें भरतानें विचारिलें.[4] जन्मापासून बारा वर्षांचें वय होईपर्यंत एखादें बालक जें करील त्याबद्दल त्याला शिक्षा होऊं नये असें एका ठिकाणीं सांगितलें आहे. इंडियन पीनल कोडांत बहुतेक अशाच अर्थाचा नियम आहे.[5]

१ राजभिर्धृतदण्डाश्च कृत्वा पापानि मानवाः। निर्मलाः सुखमायान्ति सन्तः सुकृतिनो यथा ॥ किष्किन्धा० १८.३२.

२ दस्यून्निहन्ति वै राजा भूयसो वाप्यनागसः। भार्या माता पिता चैव हन्यन्ते पुरुषेण ते। न मूलघातः कर्तव्यो नैष धर्मः सनातनः। अपि स्वल्पवधेनैव प्रायश्चित्तं विधीयते ॥ शान्ति० २६८.१२.

३ असमंजा पुरादद्य सुतो मे विप्रवास्यताम्। वन० १०७.४३.

४ कच्चिन्न ब्राह्मणधनं हृतं रामेण कस्यचित्। कच्चिन्नाढ्यो दरिद्रो वा तेनापापो विहिंसितः ॥ कच्चिन्न परदारान्वा राजपुत्रोऽभिमन्यते॥ अयोध्या. ७२.४४-४५

५ 'बाले हि द्वादशाद्वर्षाज्जन्मतो यत्करिष्यति। न भविष्यत्यधर्मोऽत्र न प्रज्ञास्यन्ति वै दिशः ॥ आदि० १०८.१४.

नाणें. कवड्यांचा उपयोग वस्तु विकत घेण्याकडे होत असावा असें दिसतें (शान्तिपर्व २९४. १६.). निष्क (विराट० १८. १८.) व सुवर्ण हीं सोन्याचीं नाणीं असावीं किंवा सोन्याचे तुकडे नाण्यांसारखे वापरीत असावे.

७. युद्धकला.

भीष्मपर्वापासून गदापर्वापर्यंतच्या पर्वांत व रामायणाच्या युद्धकाण्डांत ह्या विषयासंबंधानें विस्तृत माहिती सांपडते. रणक्षेत्र कोणतें पसंत करावें, सैन्याची रचना कशी करावी, शस्त्रास्त्रें कोणतीं असावीं इत्यादि विषयांचें सांगोपांग विवरण ह्या दोन ग्रन्थांत आलें आहे. रामायणावरून दिसून येणारी युद्धपद्धति व महाभारतावरून दिसून येणारी युद्धपद्धति ह्या दोहोंत बराच फरक आहे. रामायणांत व्यूहरचनेचा उल्लेख प्रायः कोठेंही नाहीं. गजारूढ सैन्य व घोडेस्वार यांचा फारसा उपयोग रामायणांत आढळत नाहीं. रामायणांतील शस्त्रास्त्रें महाभारतांतील शस्त्रास्त्रांहून ओबडधोबड व अगदीं अडाणी स्थितींतील अशीं दिसतात. झाडांच्या खांद्या व शिळा यांचा उपयोग रामायणांत फार आढळतो. रामायणांत वर्णिलेल्या प्रतिपक्षांची जी संस्कृति झालेली होती त्याहून महाभारतवर्णित संस्कृति ज्यास्त होती यामुळें हा फरक कदाचित् उत्पन्न झाला असेल.

चतुरंग सेना सैन्याचे मुख्य चार प्रकार असत; पायदळ, घोडेस्वार, गजारूढ लोक व रथारूढ लोक. सैन्याचे पत्ति, सेनामुख, गुल्म, गण, वाहिनी, पृतना, चमू, अनीकिनी व अक्षौहिणी असे भाग असत. ह्या प्रत्येक भागाच्या संख्येचें कोष्टक खालीं देतों.

पत्ति ह्मणजे एक रथ, एक गज, तीन घोडे व पांच पायदळ=१०.

३ पत्ति=सेनामुख.
३ सेनामुख=गुल्म.
३ गुल्म=गण.
३ गण=वाहिनी.
३ वाहिनी=पृतना.
३ पृतना=चमू.
३ चमू=अनीकिनी.
१० अनीकिनी=अक्षौहिणी.

वरील कोष्टकावरून दिसून येईल कीं प्रत्येक अक्षौहिणींत २१८७० हत्ती, तितकेच रथ, तिप्पट घोडेस्वार व पांचपट पायदळ असे. ह्मणून एक अक्षौहिणी ह्मणजे २१८७०० इतकें सैन्य होई. पांडवांच्या सात व कौरवांच्या अकरा मिळून १८ अक्षौहिणी सैन्य कुरुक्षेत्रावर लढत होतें. १८ अक्षौहिणी ह्मणजे जवळ जवळ चाळीस लक्ष सैन्य झालें. जरी भरतखण्डांतील सर्व राजे त्या लढाईंत सामील झाले होते तरी इतकें सैन्य जमलें असेल असें वाटत नाहीं. विशेषतः साडेतीन लक्ष हत्ती व दहा लक्षांवर घोडेस्वार कसे जमविले असतील व त्यांची व्यवस्था कशी ठेविली असेल याची कल्पना होत नाहीं. थोडीबहुत तरी अतिशयोक्ति असावी असें वाटतें. इतक्या मोठ्या सैन्याला लागणाऱ्या खाण्यापिण्याची काय व कशी तजवीज केली असेल तें सांगतां येणार नाहीं.

सर्वांत उत्तम घोडे काम्बोज व बाल्हीक ह्या देशांतून येत असत. हत्ती हिमालय व विन्ध्य ह्या पर्वतांवरील अरण्यांत सांपडत. सर्वांत रथी हा श्रेष्ठ होता. केवळ पायदळ सैन्य किंवा केवळ घोडेस्वार ह्यांच्या लढाईचें वर्णन क्वचितच आढळतें. रथी हा अत्यंत महत्त्वाचा भाग असल्यामुळें तत्संबन्धाचेंच वर्णन फार आहे. रथ्याच्या महत्त्वामुळें सारथ्यालाही फार महत्त्व प्राप्त झालें होतें. कधीं कधीं सारथि रथ्याइतकेच किंबहुना रथ्याहून जास्तच शूर असत. उदाहरणार्थ भगवान् कृष्ण अर्जुनाचा व शल्य कर्णाचा सारथि होता. युद्धकाण्डांत (अध्याय १०९) सारथ्याचीं कर्तव्यें सांगितलेलीं आहेत. त्याचें पहिलें कर्तव्य ह्मणजे कसेंही करून रथांत बसलेल्या वीराचें रक्षण करणें हें होय. त्यानें देश, काल व शुभाशुभ शकुन यांचा विचार केला पाहिजे. रथ्याच्या चेहऱ्यावरील विकार जाणले पाहिजेत, व रथी दीन झाला आहे किंवा आनन्दित आहे, किंवा थकला आहे, हें पाहिलें पाहिजे. पृथ्वीचे उंच सखल व अवघड भाग यांच्याकडे लक्ष ठेवून अनुरूप युद्धकाल ठरविणें व शत्रूचें छिद्र जाणणें हेंही त्याचें कर्तव्य आहे.[1]

रथ बांधण्यांत फार कौशल्य खर्च करीत. रथाला दोन किंवा चार घोडे जोडीत. रथावर ध्वज उभा करीत व त्या ध्वजाला लावलेली पताका एकसारखी फडकत असे. रथाला व्याघ्रचर्मीनीं मढवीत असत. रथाच्या बाजूवर व शिखरावर अनेक प्राण्यांच्या आकृति कोरलेल्या असत. अर्जुनाच्या रथावर मारुति बसत असे असें जें कथेंत सांगितलेलें आहे त्याचा कदाचित् कोणी असा अर्थ करितील कीं रथावर मारुति कोरलेला होता.

प्रत्येक अक्षौहिणीचें आधिपत्य एकेका सेनापतीकडे असे. पाण्डवांच्या अक्षौहिणींचा मुख्य सेनापति धृष्टद्युम्न होता. कौरवांच्या सैन्याचे प्रथम भीष्म, मग द्रोण, नंतर कर्ण इत्यादि मुख्य सेनापति होते. प्रत्येक अक्षौहिणीच्या

१ काम्बोज देश हिंदुकुश पर्वताचे जवळ होता व बाल्हीक ह्मणजे हल्लींचें बल्ख व त्याचे आसपासचा मुलूख.

१ देशकालौ च विज्ञेयौ लक्षणानींगितानि च । दैन्यं हर्षश्च खेदश्च रथिनश्च महाबल ॥ स्थलनिम्नानि भूमेश्च समानि-विषमाणि च । युद्धकालश्च विज्ञेयः परस्यान्तरदर्शनम् ॥ युद्ध० १०५. १८-१९.

सेनापतीनें आपआपल्या मतानेंच चालण्यापेक्षां एका शूर व कार्यक्षम सेनानीच्या हुकमतीखालीं सर्वांनीं असण्यांत फायदा आहे असें दिसून आलें होतें. सैन्यांतील शिस्तही बरीच कडक असावी असें दिसतें. सुग्रीवानें नेमून दिलेलें काम नेमलेल्या वेळांत न करतां परत गेल्यास सुग्रीव फार कडक शासन करील ह्या भीतीनें अन्न वर्ज करून जीव देण्याचा वानर बेत करितात!

मुलुखगिरीला सुरवात कार्तिक महिन्यांत करीत. 'वर्षाऋतूंतील पहिला महिना जो श्रावण तो हल्लीं चालू आहे. ह्या महिन्यांत जिकडे तिकडे पाणीच पाणी होतें. हा लढाईला योग्य समय नव्हे. ह्मणून कार्तिक महिना प्राप्त झाला ह्मणजे रावणवधाची तयारी करूं.[1]'

लढाइला प्रत्यक्ष सुरवात होण्यापूर्वी शक्य तर तडजोड करण्यासाठीं दूत पाठवीत असत. दूताचा कधींही वध करूं नये असा नियम होता. दूतानें कांहीं अपराधच केल्यास त्याचें नाक किंवा असाच एखादा दुसरा अवयव कापावा, किंवा त्याला चाबकाखालीं बडवावा, किंवा त्याचें मुण्डन करावें, किंवा डाग द्यावा; पण दूताला मारूं नये.[2] दूतानें त्याला सांगितलेलें असेल त्याहून ज्यास्त बोलूं नये; तो जर बोलूं लागला तर वधार्ह होईल.[3] दूत हा उद्धट, मळमळीत, दीर्घसूत्री, कोंवळ्या मनाचा, मृदु असा नसावा; दुसऱ्यांच्या भुलथापांना त्यानें बळी पडतां कामा नये; तो रोगी नसावा व उत्तम वक्ता असावा; हे दूताचे आठ गुण आहेत.[1] उद्योगपर्वाच्या १५०व्या अध्यायांत भगवान् कृष्ण ह्मणतात, प्रथम सामाचा (मन वळविणें) उपयोग करून पाहिला, मग दुर्योधनाच्या दुष्टपणाचें वर्णन करून त्याच्या कांहीं मित्रांना फोडण्याचा प्रयत्न केला (भेद), नंतर केवळ पांच गांव दिल्यास पाण्डव संतुष्ट होतील व बाकी सर्व राज्य तूं घे अशा रीतीनें दुर्योधनाशीं संधि करण्याची खटपट केली; पण दुर्योधन तेंही कबूल करीत, नाहीं तेव्हां शेवटचा उपाय ह्मणजे दण्ड त्याचा उपयोग करून पाहूं या.

उद्योगपर्वाच्या १५१ व १५२ ह्या अध्यायांत लढाईची तयारी कशी करावी याचें वर्णन आहे. रामायण व भारत ह्यांमध्यें बंदुका किंवा तोफा यांचे उपयोगासंबन्धानें माहिती आहे किंवा नाहीं या प्रश्नाचा समाधानकारक निकाल लावितां येत नाहीं. 'त्या मुसळाच्या टोंकाला अशोकपुष्पांच्या मालेप्रमाणें दिसणारा अग्नि उत्पन्न झाला' असें एका ठिकाणीं ह्मटलेलें आहे[2]. ह्यावरून तें मुसल नांवाचें शस्त्र बंदुकीच्या आकारासारखें होतें असें ह्मणतां येईल. सुन्दरकाण्डांत (सर्ग ४.१८) मुसल शब्द शतघ्नी शब्दाबरोबर योजिलेला आहे. हा शतघ्नी शब्द दोन्ही ग्रन्थांत अनेकवेळां आलेला आहे. राक्षससैन्यानें द्वारांजवळ घांसून चकचकीत केलेल्या, भयंकर दिसणाऱ्या, लोखंडासारख्या ('कालायसमयाः' असाही पाठ

१ पूर्वो यं वार्षिको मासः श्रावणः सलिलागमः। १४... नायमुद्योगसमयः प्रविश त्वं पुरीं शुभाम्॥ १५... कार्तिके समनुप्राप्ते त्वं रावणवधे यत॥ किष्किन्धा० २६. १७.

२ न दूतवध्यां प्रवदन्ति सन्तो दूतस्य दृष्टा बहवो हि दण्डाः॥ वैरूप्यमंगेषु कशाभिघातो मौण्ड्यं तथा लक्षणसंनिपातः। एतानि दूते प्रवदन्ति राजन्वधस्तु दूतस्य न नः श्रुतोस्ति॥ सुन्दर० ५२.१४-१५.

३ यथोक्तं दूत आचष्टे वध्यः स्यादन्यथा ब्रुवन्। उद्योग० ७२.७.

१ अस्तब्धमक्लीबमदीर्घसूत्रं सानुक्रोशं श्लक्ष्णमहार्यमन्यैः। अरोगजातीयमुदारवाक्यं दूतं वदन्त्यष्टगुणोपपन्नम्॥ उद्योग० ३७.२७.

२ तस्याग्रे मुसलस्याग्निरशोकापीडसंनिभः। उत्तरकाण्ड० ३२.४४.

आहे. त्याचा अर्थ लोखंडाच्या केलेल्या) व तीक्ष्ण (किंवा बारीक) अशा शेंकडो शतघ्नी (शंभरांना ह्मणजे अनेकांना मारणाऱ्या) रचून ठेविलेल्या होत्या.[१] हें वर्णन लहान तोफांना लागण्यासारखें आहे; व शतघ्नी हें नांव तोफेसारख्या शस्त्रालाच योग्य आहे. ह्या ठिकाणीं टीकाकारानें असें ह्मटलें आहे कीं, शतघ्नी ह्मणजे चार हात लांबीचा लोहकंटकांनीं युक्त असा मुद्गर होय व आधारासाठीं वैजयन्तींतून एक उतारा घेतला आहे 'शतघ्नी च चतुर्हस्ता लोहकंटकिनी गदा.' कांहींचें असें मत आहे कीं शतघ्नी ह्मणजे एक प्रकारची गदाच होय. 'शतघ्नी व शूल हे जिचे केंस (किंवा केसांचा झुबका) आहेत व माड्या हे जिचे अवतंस (कर्णभूषण) आहेत अशी लंका' असें एका ठिकाणीं ह्मटलेलें आहे. यावरून शतघ्नी हें शस्त्र शूलाप्रमाणें लांब असून केसांप्रमाणें काळें ह्मणजे लोखंडाचें असावें. 'शतघ्नी, भुशुंडी (?) व चकचकीत व उत्तम रीतीनें सजवलेल्या खड्गांनीं' असें एका ठिकाणीं ह्मटलेलें आहे.[३] 'मेण व मुद्गर यांसह व शतघ्नींनीं युक्त' असें एका ठिकाणीं ह्मटलेलें आहे. "चक्रयुक्त, वाटोळ्या शिलांनीं युक्त (किंवा गूळ व शिळा यांनीं युक्त असाही अर्थ होईल), मोठा शब्द करणाऱ्या, अशा शतघ्नी घेऊन लंकेंत बाहुवेगानें त्यांनीं फेंकल्यां." ह्या वर्णनांत लक्षांत ठेवण्यासारख्या कांहीं गोष्टी आहेत. शतघ्नी चाकावर ठेवीत व त्यानें धोंडे व आगीनें पातळ होणारें मेण फेंकीत. परंतु बाहूच्या वेगानें फेंकीत असें वर्णन आहे यामुळें शतघ्नी ह्मणजे तोफ नव्हे असें वाटूं लागतें. तोफ कोणी हातांनीं फेंकून देत नाहीं. यावरून शतघ्नी ह्मणजे हल्लीं दिवाळींत दारूकाम करितात त्यावेळीं हातांनीं आकाशांत स्फोट होणारे बाण (Rockets) फेंकतात त्यासारखें कांहीं शस्त्र असावें असें वाटतें. शिवाय हेंही कबूल केलें पाहिजे कीं, बंदुकीची दारू या अर्थाचा शब्द दोन्ही ग्रंथांत आह्मांला आढळला नाहीं. कोणा शोधकाला सांपडल्यास त्यानें दाखवावा. कांहीं यन्त्रांचा उल्लेख वारंवार येतो. तीं यन्त्रें कशीं असत हें कांहीं सांगतां येत नाहीं. कुम्भकर्ण यन्त्रासारखा दिसला असें एका ठिकाणीं ह्मटलेलें आहे यावरून यन्त्रें फार मोठीं असत असें दर्शविण्याचा ग्रन्थकाराचा आशय दिसतो. 'यन्त्रांनीं फेंकलेल्या पाषाणांप्रमाणें' असें एका ठिकाणीं ह्मटलेलें आहे.[१] 'पर्वतांना उपटून यन्त्रांवर घालून नेतात' असें दुसऱ्या एका ठिकाणीं ह्मटलेलें आहे.[२] ह्या उताऱ्यांवरून असें दिसतें कीं, दगड फेंकण्याकरितां किंवा मोठे मोठे धोंडे उचलून नेण्याकरितां कांहा तरी यन्त्रें वापरीत असत. धनुष्यबाण हे सर्वांत प्रमुख शस्त्र होतें. बाणांच्या कांहीं प्रकारांचीं नांवें खालीं देतों. नालीक, नाराच (लोहमय बाण), विकर्ण,

१ द्वारेषु संस्कृता भीमाः कालायससमाः शिताः । शतशो रचिता वीरैः शतघ्न्यो रक्षसां गणैः ॥ युद्ध० ३. १३.

१ शतघ्नीशूलकेशान्तामट्टालकावतंसकाम्। सुन्दर० २. ५१.

३ शतघ्नीभिर्भुशुण्डीभिः खड्गैश्चित्रैः स्वलंकृतैः ॥ वन० १६९. १६.

४ अन्विताश्च शतघ्नीभिः समधूच्छिष्टमुद्गराः ॥ परिगृह्य शतघ्नीश्च सचक्राः सगुडोपलाः ॥ चिक्षिपुर्भुजवेगेन लंकामध्ये महास्वनाः ॥ वन २८४. ३१.

१ यन्त्रोत्क्षिप्ता इवोपलाः । सुन्दर० ६४. २४.

२ पर्वतांश्च समुत्पाट्य यन्त्रैः परिवहन्ति च । युद्ध. २२. ५६.

३ बिंदवो जातरूपस्य शतं यस्मिन्निपातिताः ।
१... वारणा यत्र सौवर्णाः पृष्ठे भासन्ति दंशिताः ।
२... तपनीयस्य शुद्धस्य पृष्ठे यस्येन्द्रगोपकाः। विराट० ४२. ३.

क्षुरप्र (घोड्याच्या नालासारखें ज्याचें टोंक आहे असा बाण), अर्धचन्द्र इत्यादि. टोंकाला विष लावलेले बाणही वापरीत असत. धनुष्यावर सोन्याचे ठिपके असत व हत्ती इत्यादिकांचीं चित्रें त्यांचेवर काढीत. अर्जुनाच्या धनुष्याचें वर्णन खालीं देतों. 'ज्याच्यावर सोन्याचे शंभर ठिपके दिलेले आहेत, ज्यावर सोन्याच्या पऱ्यानें हत्ती काढलेले आहेत, व ज्याच्या पाठीवर शुद्ध-सोन्यानें इन्द्रगोप नांवाचे किडे काढलेले आहेत.' गदेचा उल्लेख पुष्कळ वेळां येतो. 'अष्ट-कोनी, लोखंडाची केलेली व सोन्यानें मढविलेली भयंकर गदा' असें एका ठिकाणीं म्हटलेलें आहे.[१] असि किंवा खड्ग, परशु किंवा परश्वध (कुऱ्हाड), परिघ (लोखंडाचा हातभर लांबीचा सोंटा), तोमर (ताक करण्याच्या माथ्यासारखें लोखंडी शस्त्र), प्रास (भाला), पट्टिश (पट्टा), चक्र, त्रिशूल, मुद्गर (मुद्गल), पाश, भिन्दिपाल (गोफण), अशनि किंवा वज्र इत्यादि आयुधांचीं नांवें आहेत.

शरीराचें रक्षण लोहमय कवचानें करीत असत. कधीं कधीं चिलखतावर रत्नें वगैरे बसवीत असत.[२] धनुष्याच्या दोरीच्या आघातापासून बाहूचें रक्षण करण्यासाठीं चामड्याचा पट्टा वापरीत त्याला गोधा म्हणत; व बोटांचें रक्षण करण्यासाठींही चामडें वापरीत. 'बद्ध-गोधांगुलित्राण' हे शब्द अनक ठिकाणीं येतात.[३]

जृंभकास्त्र, पाशुपतास्त्र, आग्नेयास्त्र, वायव्यास्त्र इत्यादि जीं अस्त्रांचीं नांवें आलीं आहेत त्यांवरून तीं आयुधें कशीं असत वगैरे कांहीं बोध होत नाहीं.

गाडे, बाजार, वेश्याजन, वाहनें, रगड पैसा, यन्त्रें, आयुधें, वैद्य वगैरे सामग्री सैन्याबरोबर न्यावी लागे.[१] धनुष्याच्या दोऱ्या, धनुष्यें, चिलखतें, शस्त्रें, मध, तूप, राळेची पूड यांच्या पर्वतासारख्या राशी पाण्डव व कौरव सैन्याबरोबर होत्या असें वर्णन केलेलें आहे.[२] तेल, काकवी, मेण, व वाळू हीं तापवून शत्रूवर फेंकण्यासाठीं सैन्याला बरोबर बाळगावीं लागत.[३] वाळू फेंकण्याच्या कामीं सुपाचा उपयोग करीत. हत्तींवर लोखंडी चिलखत घालून त्याला कांटे (लोखंडाचे) काढलेले असत.[४]

सैन्याची छावणी. जेथें वैरण व सर्पण विपुल मिळेल अशा सपाट भूमीवर सैन्यानें तळ द्यावा. श्मशानें, देवळें, आश्रम इत्यादि पवित्र स्थळें वर्ज करावीं व क्षारयुक्त जमिनीवर तळ देऊं नये.[५] प्रथम जागा मोजून व तिची पाहाणी करून नंतर तळ देत. त्या तळाच्या सभोंवार खंदक खणून त्यांत कोठल्या तरी नदीचें पाणी सोडीत, व खंदकाचे रक्षणासाठीं सैन्य ठेवीत.[६] छावणींत कुशल व भरपूर वेतन मिळणारे शिल्पज्ञ, व सर्वोपकरणांनीं युक्त असे वैद्य असत.

१ अष्टास्रिमायसीं घोरां गदां कांचनभूषणाम् ॥ उद्योग ५१. ८.

२ आदि. ३०.४६. (ग. कृ. सुद्धां)

३ बालकाण्ड. २२. ९

१ शकटापणवेशाश्च यानयुग्यं च सर्वशः । कोशं यन्त्रायुधं चैव ये च वैद्याश्चिकित्सकाः॥उद्योग० १५१.५८

२ ज्याधनुर्वर्मशस्त्राणां तथैव मधुसर्पिषोः। ससर्जरसपांसूनां राशयः पर्वतोपमाः ॥ उद्योग १५२. १३.

३ उद्योग० १५५. ५.

४ गजाः कंटकसंनाहा लोहवर्मोत्तरच्छदाः । उद्योग० १५२. १६.

५ उद्योग० १५२. १–२.

६ आसाद्य सरितं पुण्यां कुरुक्षेत्रे हिरण्वतीम्। खानयामास परिखां केशवस्तत्र भारत । गुप्त्यर्थमपि चादिश्य बलं तत्र न्यवेशयत् ॥ उद्योग० १५२. ८.

किल्ले.

वनपर्वाच्या १९ व्या अध्यायांत व युद्धकाण्डाच्या तीसऱ्या सर्गांत किल्ल्यासंबन्धानें माहिती दिलेली आहे. किल्ल्यामध्यें द्रव्य, अन्न, पाणी, शस्त्रें, यन्त्रें, तिरंदाज व शिल्पी लोक यांची विपुलता असे. तटाच्या भिंतीच्या आंत घरें व युद्धकलेचा अभ्यास करण्यासाठीं मोकळें मैदान असे. भिंतीच्या सभोंवार खंदक खणीत व त्यांत विपुल पाणी व सुसर वगैरे प्राणी सोडीत. किल्ल्याचा दरवाजा भक्कम असे. किल्ल्याला वेढा पडला ह्मणजे मद्यपान कोणीही करावयाचें नाहीं असा निर्बन्ध होत असे; नट, नर्तक व गायक ह्यांना हांकून लावीत; खंदकावरील पूल मोडून टाकीत; खंदकांतील पाण्यांत होड्या चालवूं देत नसत; व पाण्यांत जिकडे तिकडे लोखंडाचे तीक्ष्ण दांडे बसवून ठेवीत; कोणालाही परवानगीशिवाय बाहेर जाऊं देत नसत किंवा आंत येऊं देत नसत.[1]

क्रौंचव्यूह, गारुडव्यूह, अर्धचंद्रव्यूह, मकरव्यूह इत्यादि सैन्याच्या रचनेचे प्रकार होते. युद्धाला प्रारंभ प्रातःकाळीं होत असे; व रात्र झाली ह्मणजे लढाई बंद होत असे. रात्रीं हल्ला करणारांचा निषेध केलेला आहे. प्रत्येकानें आपल्या बरोबरीचा जो असेल त्याच्याशीं लढावें असा नियम होता. उदाहरणार्थ अश्वारूढ मनुष्यांनीं पायदळाशीं लढूं नये असा नियम होता. एकट्या मनुष्याशीं अनेकांनीं एकाच वेळीं लढूं नये असा नियम होता. गदायुद्धामध्यें कंबरेच्या खालीं प्रहार करूं नये असा नियम होता; व त्याचें उल्लंघन केल्याबद्दल भीमावर कोरडे ओढलेले आहेत. अस्त्रांचा प्रयोग केवळ आणीबाणीच्या प्रसंगीं करावा; व तोही साधारण वीरावर करीत नसत. जो थकलेला आहे, भ्यालेला आहे, ज्याचें शस्त्र हातांतून पडलें आहे, जो रडत आहे, जो युद्धपराङ्मुख झाला आहे, ज्याच्याजवळ सारथि इत्यादि परिवार नाहीं, जो लढण्यासाठीं हात उचलीत नाहीं, रोगी, शरणागत, बाल, वृद्ध, पळणारा, मत्त इतक्या मनुष्यांशीं लढूं नये.[1]

८. पाठशाळा व त्यांत शिकविले जाणारे विषय.

आह्मीं पूर्वीं सांगितलेंच आहे कीं ब्रह्मचर्य हा आश्रम विद्यार्जनासाठीं होता. विद्यार्थ्याला पिता गुरूच्या स्वाधीन करी व तो विद्यार्थी गुरूच्या हुकमतीखालीं असे. विद्यार्थी हा आपल्या आईबापांपासून दूर, केवळ आपल्या गुरूजवळ असे. ह्याच पद्धतीचें थोडेंबहुत अनुकरण हल्लीं शाळांना व कॉलेजांना जोडून असलेल्या वसतिगृहांत केलेलें आहे. प्राचीनकाळीं कांहीं गुरूजवळ दहा हजार विद्यार्थी असत. त्यांना कुलपति ह्मणत. गुरूला नियमितपणें 'फी' देत नसत; परंतु अध्ययनकाळ संपल्यानंतर दक्षिणा मागण्याबद्दल गुरूला विनंती करून तो मागेल ती दक्षिणा त्याला देत असत. गुरुगृह मोठमोठ्या नगरांपासून दूर असे; व ह्यामुळें आधुनिक विद्यार्थ्यांना जे कांहीं मोह पडण्याचा संभव असतो तसल्या मोहांपासून प्राचीन विद्यार्थी अलिप्त असत. राजांनीं व श्रीमंतांनीं दिलेल्या अग्रहारांवर गुरु उपजीविका करीत. गुरु प्रायः दरिद्री असून त्यांची रहाणी

१ आनर्ताश्च तथा सर्वे नटा नर्तकगायनाः । बहिर्निर्वासिताः क्षिप्रं रक्षद्भिर्वित्तसंचयम् ॥ संक्रमा भेदिताः सर्वे नावश्च प्रतिषेधिताः । परिखाश्चापि कौरव्य कीलैः सुनिचिताः कृताः । न चामुद्रोऽभिनिर्याति न चामुद्रः प्रवेश्यते । वन० १५. १४. इत्यादि.

१ श्रान्तं भीतं भ्रष्टशस्त्रं रुदन्तं पराङ्मुखं पारिबर्हैश्च हीनम् । अनुद्यन्तं रोगिणं याचमानं न वै हिंस्याद् बालवृद्धौ च राजन् ॥ शान्ति २९८. ४; अयुध्यमानं प्रच्छन्नं प्राञ्जलिं शरणागतम् । पलायमानं मत्तं वा न हन्तुं त्वमिहार्हसि ॥ युद्ध० ८०. ३९.

साधी असे; परंतु त्यांना जेव्हां जरूर पडे तेव्हां राज लोक उदार आश्रय देत. गुरु व त्याच्या कुटुंबांतील मनुष्यें जें जें सांगतील तें तें विद्यार्थ्यानें केलें पाहिजे असा नियम होता. शिष्यानें गुरूवर निःसीम निष्ठा ठेविली पाहिजे असें प्रतिपादन करण्याचा दोन्ही ग्रंथांचा रोंख आहे. उदाहरणार्थ, उद्दालक, आरुणि व उपमन्यु यांची गोष्ट पहा. तथापि, प्रत्यक्ष गुरूसुद्धां जर गर्वानें तट्ट फुगेल, काय करावें व काय करूं नये यासंबन्धानें त्याला विचार राहणार नाहीं, आणि जर तो कुमार्गाचें अवलंम्बन करील, तर शिष्यानें त्याचा त्याग करावा.[1] जो शिष्यत्व धरून येणार नाहीं, जो व्रतस्थ नाहीं, जो विशुद्ध अंतःकरणाचा नाहीं, व ज्याच्या शीलाची परीक्षा केलेली नाहीं, त्याला विद्या देऊं नये असें सांगितलें आहे.[2] दुर्लक्ष, त्वरा, व आत्मश्लाघा हे तीन विद्यार्जनांत मोठे अडथळे आहेत.[3] आळस, मदमोह, चञ्चलता, वाद-विवाद (किंवा गप्पा), उद्धटपणा, अभिमान, व लुब्धता हे विद्यार्थ्यांमध्यें सात दोष मानिलेले आहेत.[4] ज्याला चैनीची हौस आहे त्याला विद्या कोठून मिळणार? विद्यार्थ्याला चैन कोठून करावयाला मिळणार? चैनीची इच्छा करणाऱ्यानें विद्या सोडावी व विद्या मिळविण्याची इच्छा करणाऱ्यानें चैन सोडावी.[1] वेद किंवा शास्त्रें नुसतीं पोपटासारखीं पाठ करून ज्याला त्या ग्रंथांचा अर्थ कळणार नाहीं त्याची पोपटपंची सर्व व्यर्थ आहे असें स्पष्ट सांगितलेलें आहे. (यो हि वेदे च शास्त्रे च ग्रन्थधारणतत्परः। न च ग्रन्थार्थतत्त्वज्ञस्तस्य तद्धारणं वृथा ॥ शान्ति० ३०६. १३). गुरूच्या मुखानें विद्या ग्रहण करणें हें गुरुसाहाय्यावांचून विद्या शिकण्यापेक्षां ज्यास्त उपयोगी व महत्त्वाचें आहे असें समजत. ह्याच कारणामुळें यवक्रीतापेक्षां रैभ्य श्रेष्ठ झाला असें सांगितलेलें आहे.

अध्ययन संपल्यानंतर गुरूला दक्षिणा देत हें वर सांगितलेंच आहे. कधीं गुरूंनीं मागितलेली दक्षिणा विलक्षण असे. आपण माझे गुरु आहां असें जेव्हां एकलव्य द्रोणाला ह्मणाला, तेव्हां द्रोणानें त्याच्या उजव्या हाताचा आंगठा ही दक्षिणा मागितली. द्रुपदाला बंदिवान् करून आणा अशी पाण्डवांजवळ द्रोणानें दक्षिणा मागितली.[2]

प्रत्येक महिन्यांत कांहीं सुट्या असत. सर्वांत महत्त्वाचा अनध्याय प्रत्येक पक्षाच्या प्रतिपदेला असे. अनध्याय दिवशीं अध्ययन केल्यास विद्या नाहींशी होते अशी समजूत होती. 'ती स्वभावतःच कृश असून त्याच्या (रामाच्या) वियोगामुळें अधिकच कृश होऊन प्रतिपदेला पाठ घेणाऱ्या शिष्याच्या विद्येप्रमाणें अगदीं बारीक दिसत होती.'[3]

---

१ गुरोरप्यवलिप्तस्य कार्याकार्यमजानतः। उत्पथप्रतिपन्नस्य परित्यागो विधीयते ॥ उद्योग० १७८.४८.

२ नाशिष्ये संप्रदातव्यो नाव्रते नाकृतात्मनि।... नापरीक्षितचारित्रे विद्या देया कथंचन।

३ अशुश्रूषा त्वरा श्लाघा विद्यायाः शत्रवस्त्रयः। उद्योग० ४०.४.

४ आलस्यं मदमोहौ च चापलं गोष्ठिरेव च। स्तब्धता चाभिमानित्वं तथात्यागित्वमेव च ॥ एते वै सप्त दोषाः स्युर्विद्यार्थिनां सदा मताः। उद्योग० ४०. ५–६.

---

१ सुखार्थिनः कुतो विद्या विद्यार्थिनः कुतः सुखम्। सुखार्थी वा त्यजेद्विद्यां विद्यार्थी वा सुखं त्यजेत् ॥ उद्योग० ४०. ६.–७.

२ पाञ्चालराजं द्रुपदं गृहीत्वा रणमूर्धनि। पर्यानयत भद्रं वः सा स्यात्परमदक्षिणा ॥ आदि. १४०. ३. (ग. कृ. मुद्रां)

३ सा प्रकृत्यैव तन्वङ्गी तद्वियोगाच्च कर्शिता। प्रतिपत्पाठशीलस्य विद्येव तनुतां गता ॥ सुन्दर० ५९. ३२.

वेदाचा विक्रय करणारे, वेदाला दूषणें लावणारे व वेद लिहिणारे नरकाला जातात असें एका ठिकाणीं सांगितलेलें आहे.[१] मोठ मोठे यज्ञ जेव्हां होत तेव्हां ब्राह्मणांमध्यें वादविवाद होत असत. ह्या वादांमध्यें पण लावीत असत. जनकाच्या सभेंत बंदि नांवाच्या ब्राह्मणानें आपल्या पुष्कळ प्रतिपक्ष्यांचा पाडाव करून त्यांस जलसमाधि दिली.[२] महाभारतांत अनेक ठिकाणीं पुष्कळ गूढ प्रश्न घातलेले आहेत. उदाहरणार्थ अष्टावक्र व बंदि यांचा संवाद पहा.

विद्या व ग्रन्थ. ब्राह्मण वगैरे सुशिक्षित लोक संस्कृत भाषा बोलत. परंतु प्राकृत भाषाही प्रचारांत होत्या. त्याचप्रमाणें म्लेच्छ भाषांचीही माहिती होती. मारुति ह्मणतो, जर एखाद्या द्विजाप्रमाणें मी संस्कृत भाषा बोलूं लागलों तर मला रावण समजून सीता भीति पावेल.[३]

शिक्षणाचे विषयांत चार वेद हे प्रधान होते. ऋग्वेदाच्या २१०००, यजुर्वेदाच्या १०१, सामवेदाच्या १०००, व अथर्ववेदाच्या पांच शाखांचा उल्लेख केला आहे.[४] वेदांशिवाय शतरुद्रिय (अनु० १६२. २३.), शतपथ ब्राह्मण (शान्ति० ३१९.१६.), आरण्यक, उपनिषद् (बालकाण्ड ९ ९-१६) इत्यादिकांचा उल्लेख केलेला आहे. बृहदारण्यकोपनिषदाचें शान्तिपर्वांत (३१९.३४.) नांव आलें आहे, व कठोपनिषदांतील दोन श्लोक शान्तिपर्वांत (२४७. ३–४) घेतलेले आहेत. ऋग्वेदाचा पदपाठ व क्रमपाठ यांचा उल्लेख अनेक वेळां केलेला आहे (अनु० ८९.९०). क्रमपाठ प्रथम बाभ्रव्य गोत्रांतील पांचालानें रचिला (शान्ति० ३४३. १०२).

शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंदःशास्त्र व ज्योतिःशास्त्र हीं वेदाचीं सहा अंगें आहेत. वेदांगांचा व त्यांच्या संख्येचा उल्लेख अनेक ठिकाणीं आलेला आहे.[१] पाणिनीचें व्याकरण, त्यावरील कात्यायनाचीं वार्तिकें, व्याडीचा 'संग्रह' नांवाचा ग्रंथ, व पतंजलीचें महाभाष्य ह्या सर्वांचा उल्लेख उत्तरकाण्डांत केलेला दिसतो.[२] निरुक्ताचें नांव अनुशासनपर्वांत (८९.९१) आलें आहे.

चार वेदांचे जे चार उपवेद–आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद व स्थापत्य (Engineering or Mechanics) यांचा वारंवार उल्लेख येतो. पहिल्या दोहोंचा उल्लेख अनुक्रमें बालकाण्ड ४९. ३१ व ९९–१६ येथें केलेला आहे. आयुर्वेदाचीं आठ अंगें होतीं[३]. हस्तिसूत्र, अश्वसूत्र, रथसूत्र, धनुर्वेदसूत्र, यन्त्रसूत्र इत्यादि सूत्रग्रंथांचा उल्लेख एका ठिकाणीं केलेला आहे.[४]

षड्दर्शनांचें विवेचन आह्मी पूर्वीं केलेंच आहे. रामायणाचें नांव वनपर्वांत आलें आहे.[५] पुराणाचा उल्लेख बहुधा एकवचनीं येतो.[६]

---

१ वेदविक्रयिणश्चैव वेदानां चैव: दूषका: । वेदानां लेखकाश्चैव ते वै निरयगामिन: ॥ अनु० २३. ७२-

२ अनेनैव ब्राह्मणा: शुश्रुवांसो वादे जित्वा सलिले मज्जिता: प्राक् । वन० १३४. २३.

३ यदि वाचं प्रदास्यामि द्विजातिरिव संस्कृताम् । रावणं मन्यमाना मां सीता भीता भविष्यति ॥ सुन्दर. ३०. १८; नार्यो म्लेच्छन्ति भाषाभिः । सभा० ६७.

४ शान्ति० ३४३. ९७ व ९९.

१ बालकाण्ड ५. २३; शान्ति० २०१. ८.

२ ससूत्रवृत्त्यर्थपदं महार्थं ससंग्रहं सिध्यति वै कपीन्द्र: । न ह्यस्य कश्चित्सदृशोऽस्ति शास्त्रे वैशारदे छन्दगतौ तथैव ॥ उत्तर० ३६. ४५.

३ आयुर्वेदस्तथाष्टांगो । सभा० ११.२४.

४ सभा० ५.१२०–१२१. (ग. कृ. सुद्धां)

५ भ्राता मम गुणश्लाघ्यो बुद्धिसत्त्वबलान्वित: ॥ रामायणेऽतिविख्यात: श्रीमान्वानरपुंगव: ॥ वनपर्व० १४७.११.

६ अनु० २२.१२; शान्ति ३१९.२१.

वायुपुराणाचा उल्लेख एका ठिकाणीं आलेला आहे.[1] नाटकें, कथा, आख्यायिका, कारिका, भाष्यें यांचा उल्लेख सभापर्वांत (११३. ९–३६ ग. कृ. सुद्धां) आलेला आहे.

पंचतंत्रांतील कथांनीं सर्व जगभर प्रवास केल्यामुळें भरतखण्डाचें नांव जिकडे तिकडे झालेलें आहे. अशा प्रकारच्या कथा महाभारतांतही आहेत. व्याघ्र, मूषक, लांडगा, मुंगुस व कोल्हा यांच्या मैत्रीच्या गोष्टीचा आदिपर्वांत (१४२. २६ ग. कृ. १४०) उल्लेख केलला आहे. एकीनें वागल्यामुळें जाळ्यांत सांपडलेले पक्षी जाळ्यासह कसे उडून गेले व वाटेंत भांडल्यामुळें कसे पतन पावले ही गोष्ट विदुरानें सांगितलेली आहे.[2] उद्योगपर्वाच्या १६० व्या अध्यायांत एका भोंदू मांजराची हकीकत दिलेली आहे.

चौसष्ट कलांवरतीं गर्गानें कांहींतरी ग्रन्थ लिहिला असावा असें दिसतें.[3] आपस्तम्ब, शंख, लिखित इत्यादि धर्मशास्त्रकारांचीं नावें अनुशासनपर्वांत (अध्याय ६६) दिलेलीं आहेत. काव्य अत्यंत उच्च दशेला पोंचलें होतें. रामायण व महाभारत हे दोन्ही ग्रन्थ उत्कृष्ट काव्याचे मासले आहेत. रामायणांत रात्रीचें वर्णन (बालकाण्ड ३४), अरण्यांतील संकटांचें वर्णन (अयोध्या २८), वर्षा व शरद् या ऋतूंचें वर्णन (किष्किन्धा. २८, ३०) हीं सर्व वाचनीय आहेत. महाभारतांत समुद्राचें जें वर्णन केलें आहे तसें रामायणांत आहे.[4]

१ वायुप्रोक्तमनुस्मृत्य पुराणमृषिसंस्तुतम् । वन० १९१.१६.

२ उद्योग० ६४.

३ चतुःषष्ट्यंगमददात्कलाज्ञानं ममाद्भुतम् । अनु० १८.३८.

४ नृत्यन्तमिव चोर्मीभिर्वल्गन्तमिव वायुना ॥ हसन्तमिव फेनौघैः स्खलन्तं कन्दरेषु च । वनपर्व० १०४. २२–२३; हसन्तमिव फेनोघैर्नृत्यन्तमिव चोर्मिभिः । युद्ध० ४.११०.

दोन्ही ग्रन्थांत उपमा व रूपक यांची रेलचेल आहे. परंतु उपमा साध्या आहेत. रामायणांत खस्थचमत्कारविषयक उपमा पुष्कळ आहेत. भारतीय युद्धावर यज्ञाचें रूपक केलेलें आहे तें वाचनीय आहे.[1]

दोन्ही ग्रंथांत आलेल्या वृत्तांचें योग्य विवेचन करावयाचें ह्मटलें तर एक ग्रन्थच होईल; सबब त्यांसंबंधानें येथें कांहींच लिहीत नाहीं.

वैद्यक

कृष्णात्रेयानें प्रथम वैद्यकशास्त्र पृथ्वीवर आणिलें.[2] आत्रेयानेंच चरक, भेड, हारीत इत्यादि सहा शिष्यांना आयुर्वेद प्रथम शिकविला असें चरकादि ग्रन्थांत सांगितलेलें आहे. वात, पित्त, कफ ह्या तिहींचा उल्लेख अनेक वेळां केलेला आहे.[3] एका विषानें दुसऱ्या विषाचा प्रतीकार होतो अशी कल्पना होती. अंगांत भिनलेलें कालकूट विष सर्पाचे दंशानें नाहींसें झालें. मनाचा शरीरावर केवढा परिणाम होतो याची चांगली कल्पना होती. 'मानसिक दुःखानें शरीरालाही ताप होतो; व त्या मानसिक दुःखाचें शमन झालें कीं शारीरिक ताप नाहींसा होतो.' 'रोग हे मनुष्याच्या पूर्वजन्मांतील कर्मांचीं फळें होत.' 'यकृत्, प्लीहा, आमा-

१ उद्योग. १४१. २८ पासून पुढें.

२ कृष्णात्रेयश्चिकित्सितम् । शान्ति० २०१. २१

३ शान्ति० २१४. १६; शान्ति० ३४३. ८६.

४ ततोऽस्य दश्यमानस्य तद्विषं कालकूटकम् । हतं सर्पविषेणैव स्थावरं जंगमेन तु ॥ आदि० १२८. ५७. (ग. कृ.)

५ मानसेन हि दुःखेन शरीरमुपतप्यते । मानसं शमयेत्तस्माज्ज्ञानेनाग्निमिवाम्बुना । प्रशान्ते मानसे ह्यस्य शारीरमुपशाम्यति । वन० २. २६.

६ कर्मजा हि मनुष्याणां रोगा नास्त्यत्र संशयः । वन० २०९. १४.

शय, पक्वाशय इत्यादि पोटांतील भागांचीं नांवें आलीं आहेत.[1] शिरोरोग, अक्षिरोग, दंतशूल, जलोदर, ज्वर, विषूचिका, कुष्ट, अपस्मार, शिवें इत्यादि रोगांचीं नांवें दिलेलीं आहेतें. झाडांना जीव आहे अशी कल्पना होती; कारण त्यांना सुख दुःख होतें व तोडल्यास तीं वाढतातें.[3] मांस हें अत्यंत शक्तिवर्धक मानीत. जखमी झालेले, क्षीण, उन्हानें तापलेले, स्त्रीलंपट व मार्ग चालून थकलेले ह्यांना मांसासारखें दुसरें कांहीं नाहीं असें सांगितलेलें आहे.[4] रेशमाची राख तेलांत किंवा जुन्या तुपांत मिसळून जखमा बऱ्या करण्याकरितां मलम करीत.

महाभारत व रामायण ह्या दोन्ही ग्रन्थांत जी ज्योतिःशास्त्रविषयक

ज्योतिःशास्त्र.

माहिती आहे तिचें संपूर्ण रीतीनें व समाधानपूर्वक विवेचन करणें झाल्यास एक मोठा ग्रन्थच लिहावा लागेल. रामायणांत बहुतेक नक्षत्रांचीं नांवें आहेत; कृत्तिकेंत सहा तारा आहेत असें एका ठिकाणीं सांगितलेलें आहे. अनुशासन पर्वांत ६४ व ८९ ह्या अध्यायांत सर्व नक्षत्रांचीं व त्यांच्या अधिष्ठात्री देवतांचीं नांवें आहेत. परंतु अश्विनीपासून सुरवात न करतां कृत्तिकेपासून केलेली आहे. राहु व केतु ह्यांचाही उल्लेख अनेक ठिकाणीं केलेला आहे. सप्तर्षि व सर्प ह्या दोन तारकापुञ्जांचा उल्लेख केलेला आहे. चांद्रवर्ष प्रचारांत होतें. सूर्यावरील डागांचाही उल्लेख केलेला आहे.[1]

९. शेतकी.

खाद्य व पेय या सदराखालीं कोणतीं धान्यें वगैरे होत असत तें आह्मीं सांगितलेंच आहे. शेतकीचें महत्त्व चांगलें कळून चुकलें होतें. शेतकीचा अवलंब केल्यास लोक सुखी व समृद्ध होतात असें सभापर्वांत ह्मटलें आहे.[2] राजा जनक स्वतां जमीन नांगरीत होता असें वर्णन केलेलें आहे.[3] नांगराला दोन किंवा अधिक बैल लावीत. एक बलवान् बैल नांगराचें जूं वहात होता व दुसरा अल्पबल, कृश व सर्व शिरा बाहेर पडलेल्या असा असून मोठ्या कष्टानें जोखडाचा भार वहात होता.[4] शेतकीच्या कांहीं आउतांचीं नांवें कांहीं ठिकाणीं आलेलीं आहेत; फल (फाळ), कुद्दाल (कुदळ), लांगल (नांगर) इत्यादि.[5]

गाई, ह्मशी वगैरे जनावरांचें फार महत्त्व होतें. राजे गाईंचे कळप पहाण्यास स्वतः जात असत व कोणी चोरी केली असतां समजावें ह्मणून वासरांवर खुणा करून त्यांची खानेसुमारी करीत. हें सर्व दुर्योधन करीत असे असें वर्णन केलेलें [6]आहे. हल्लींच्या प्रमाणेंच गाईंना पवित्र मानण्यांत

१ वन० २१३. १५.

२ शान्ति० ३०४. ६.

३ सुखदुःखयोश्च ग्रहाच्छिन्नस्य च विरोहणात् । जीवं पश्यामि वृक्षाणामचैतन्यं न विद्यते ॥ शान्ति० १८४. १७.

४ क्षतक्षीणाभितप्तांनाम् ग्राम्यधर्मरतात्मनाम् । अध्वना कर्शितानां च न मांसाद्विद्यते परम् ॥ अनु० ११६. ८,

५ उद्योग० १५५.९.

१ आदित्ये विमले नीलं लक्ष्म लक्ष्मण दृश्यते युद्ध० २३. ९

२ वार्तायां संश्रितस्तात लोकोऽयं सुखमेधते । सभा० ५.७९. ग. कृ. सुद्धां.

३ तस्य लांगलहस्तस्य कृषतः क्षेत्रमण्डलम् । अयोध्या ११८.२८.

४ एकस्तत्र बलोपेतो धुरमुद्वहतेऽधिकाम् । अपरोऽप्यबलप्राणः कृशो धमनिसंततः ॥ कृच्छ्रादुद्वहते भारम् वन. ९. ११–१२.

५ वन० १०७. २३.

६ स्मारणे समयः प्राप्तो वत्सानामपि चांकनम् । वन० २३९. ४; ददर्श स तदा गावो शतशोऽथ सहस्रशः । अंकैर्लक्षैश्च ताः सर्वा लक्षयामास पार्थिवः ॥ वन० २४०–४.

येत असे. गाईसारखें दुसरें धन नाहीं; गाईचें दर्शन, दान, श्रवण व कीर्तन हीं प्रशस्त असून सर्व पापांचा नाश करणारीं आहेत; गाईचें मूत्र-पुरीष यांचा कंटाळा करूं नये; स्थावर जंगम जगत् जिनें व्यापिलेलें आहे व जी भूत व भविष्य (किंवा कल्याण) यांची माता आहे तिला शिरसा नमस्कार करितों.[1] गोमांस अत्यंत निषिद्ध होतें. 'जो मांसाचा विक्रय करण्यासाठीं गाईला मारील, किंवा निर्मर्याद होऊन भक्षण करील, किंवा गाईचा घात करणाऱ्या पुरुषाला अनुमोदन देईल,—ते सर्व गाईच्या अंगावर जितके केस आहेत तितकीं वर्षें नरकांत जातील.[2]' टोळधाड येऊन पिकांचें नुकसान होत असे.

१०. व्यापार व धंदे.

व्यापार, शेतकी, व कारखान ह्यांच्या अभिवृद्धीचें काम वैश्यांकडे होतें. व्यापारीलोक जमावानें प्रवास करीत. खोटीं मापें वापरणाऱ्यांचा उल्लेख आलेला आहे.[4] केश, विषें, व दूध यांचा विक्रय करणारे नरकांत जातात अशी कल्पना होती[5]. जबर व्याज घेणारे नरकांत जातात व त्यांना किड्याचा जन्म प्राप्त होतो असें सांगितलेलें आहे.[6]

लेखनकला बरीच ऊर्जित दशेला आली होती. वेद लिहिणारांबद्दल किती कटाक्ष होता हें वर सांगितलेंच आहे. महाभारत हा ग्रन्थ प्रत्यक्ष श्रीगजाननानें लिहिला असें आदिपर्वांत सांगितलेलें आहे. मी लिहित असतां जर मजकुरासाठीं मला एक क्षणभरही लेखणी थांबवावी लागली नाहीं तर मी लेखक होईन असें श्रीगजानन ह्मणतात.[1]

विणण्याचे कलेचा उल्लेख आदिपर्वांत केलेला आहे.[2] शंभर शंभर नावाडी ज्यांवर आहेत अशा पांचशें नावा गुहाजवळ होत्या, असें अयोध्याकाण्डांत (सर्ग ८४. ८.) सांगितलेलें आहे. त्याच काण्डांत (सर्ग ९९. १९.) जांभळीच्या खांद्या व वेत ह्यांनीं केलेल्या तराफ्याचें वर्णन आहे. श्रीराम गुहाला ह्मणतात, वल्हीं, सुकाण्या यांनीं युक्त, शुभ, सहज तरणारी, दृढ, अशी नाव घांटाजवळ लवकर आण.[3] अयोध्याकाण्डाच्या ८९ व्या अध्यायांत निरनिराळ्या प्रकारच्या नावांचें वर्णन आहे. कांहीं होड्यांत बसावयाला उत्तम जागा केलेली असे व होड्यांवर पताका लाविलेल्या असत. तांबें, लोखंड, जस्त, शिसें, कांसें, पारा वगैरे धातूंचा उल्लेख आलेला आहे.[4] दारूविक्ये, सोनार, परीट, शिंपी, नट, कोळी, कुंभार इत्यादि धंदेवाल्या लोकांचा उल्लेख अनेक ठिकाणीं केलेला आहे. कोळ्याच्या गळाचा उल्लेख वनपर्वांत (१९७.४९.) आहे. निरनिराळ्या सुवासिक पदार्थांचा उल्लेख अनुशा-

---

१ गोभिस्तुल्यं न पश्यामि धनं किंचिदिहाच्युत ॥ अनु. ५१.२६. कीर्तनं श्रवणं दानं दर्शनं चापि पार्थिव। गवां प्रशस्यते वीर सर्वपापहरं शिवम् ॥ गवां मूत्रपुरीषस्य नोद्विजेत कथंचन ॥ अनु. ७८.१७. यया सर्वमिदं व्याप्तं जगत्स्थावरजंगमम् । तां धेनुं शिरसा वन्दे भूतभव्यस्य मातरम् ॥ अनु० ८०. १५.

२ विक्रयार्थं हि यो हिंस्याद् भक्षयेद्वा निरंकुशः । घातयानं हि पुरुषं येऽनुमन्येयुरर्थिनः ॥......यावन्ति तस्या रोमाणि तावद्वर्षाणि मज्जति ॥ अनु. ७४.३–४.

३ शलभा इव संछाद्य मेदिनीं संप्रतस्थिरे । किष्किन्धा० ४५. ३.

४ न कूटमानैर्वणिजा पण्यं विक्रीणते तदा । आदि० ६४. २२.

५ केशविक्रयिका राजन्विषविक्रयिकाश्च ये । क्षीरविक्रयिकाश्चैव ते वै निरयगामिनः ॥ अनु० २३. ७४.

६ अनु० ११७. २०.

१ श्रुत्वैतत्प्राह विघ्नेशो यदि मे लेखनी क्षणम् । लिखतो नावतिष्ठेत तदा स्यां लेखको ह्यहम् ॥ आदि० १–७८ (ग. कृ. मुद्रां)

२ आदि० ३. १४४. (ग. कृ. मुद्रां)

३ अस्य वाहनसंयुक्तां कर्णग्राहवतीं शुभाम् । सुप्रतारां दृढां तीर्थे शीघ्रं नावमुपाहर ॥ अयो० ५२. ६.

४ अरण्यकाण्डांत (१६. २५.) पाऱ्याचा उल्लेख केलेला आहे.

सनपर्वांत (९८.४२) केलेला आहे. त्यांत धूप, गुग्गुलु, राळ, सल्लकी इत्यादि आहेत. बालकाण्डाच्या १३ व्या अध्यायांत बऱ्याच धंद्यांचीं नांवें आलीं आहेत; मोजणी करणारे, सुतार, खणणारे, जंगल तोडून साफ करणारे, घरांना चुना लावणारे, लांकूड करवतणारे, इत्यादि. चित्रकलेचा उल्लेखही बरेच वेळां आलेला आहे. 'वस्त्रावर ज्याप्रमाणें चित्र काढावें' असें एका ठिकाणीं ह्मटलेलें आहे.[1]

११. फिरकोळ.

युगपद्धति. कृत, त्रेता, द्वापर व कलि अशीं चार युगें असून तीं धर्माचरणांत एकापेक्षां एक कमी प्रतीचीं आहेत असा समज होता. आधुनिक तत्त्ववेत्त्यांच्या मताप्रमाणें जगाचें 'सुवर्णयुग' (Golden Age) फार दूरच्या भविष्यकाळीं येणार आहे. प्राचीन आर्यांच्या समजुतीप्रमाणें 'सुवर्ण युगें' भूतकाळीं अनेक होऊन गेलीं, व भविष्यकाळींही होतील, परंतु आह्मी मात्र हल्लीं 'अयोयुगांत' (Iron Age) आहों. भारतीय युद्ध द्वापर व कलि यांचे संधींत झालें.[2] वनपर्वाच्या १४९-व्या अध्यायांत चारी युगांचें सविस्तर निरूपण आहे. त्याच पर्वाच्या १८८ व १९९ ह्या अध्यायांत कलियुगांत पुढें काय होईल तें सांगितलें आहे. प्रत्येक युगांत विष्णूचा वर्ण बदलतो; कृतयुगांत श्वेत, त्रेतायुगांत पीत, द्वापरांत रक्त व कलियुगांत कृष्ण.[3] कृतयुगांत तपश्चर्या, त्रेतायुगांत ज्ञान, द्वापरयुगांत दान श्रेष्ठ असें एका ठिकाणीं सांगितलेलें आहे.[4] शान्तिपर्वाच्या २३२ व्या अध्यायांत युगांची वर्षसंख्या दिलेली आहे. चार हजार वर्षें ह्मणजे कृतयुग व त्याची संध्या व संध्यंश प्रत्येक चारशें वर्षें; त्रेतायुग ३००० वर्षें व संध्या, संध्यंश प्रत्येकीं ३०० वर्षें; द्वापरयुग २००० वर्षें व संध्या आणि संध्यंश प्रत्येकीं २०० वर्षें; कलियुग १००० वर्षें व संध्या आणि संध्यंश प्रत्येकीं १०० वर्षें. हीं वर्षें देवांचीं समजावीं असें प्राचीन ग्रंथकारांचें व टीकाकारांचें मत आहे (मनुष्यांचें वर्ष ह्मणजे देवांचा दिवस.).

यम. पाप्यांना शिक्षा देण्याचें काम यमाकडे सोंपविलेलें आहे; तो त्यांना अनेक प्रकारचे हाल व अपेष्ठा नरकांत भोगावयास लावितो अशी कल्पना होती. उत्तरकाण्डाच्या २१ व्या सर्गांत नरकांतील पीडांचें वर्णन केलेलें आहे. त्यांत वैतरणी नदी व तापलेल्या वाळूचे तोबरे यांचा प्राधान्येंकरून उल्लेख केलेला आहे. सावित्री यमाला ह्मणते, यमराज! आपले दूत मनुष्यांना नेण्यासाठीं येतात असें मी ऐकलें आहे, तर आपण स्वतः कशासाठीं आलां? त्यावर यमानें उत्तर केलें, हा सत्यवान् धर्मशील, रूपवान् व गुणयुक्त आहे; ह्याला माझ्या चाकरांनीं नेणें योग्य नाहीं ह्मणून मी स्वतः आलों.[2]

शकुन. शुभ व अशुभ शकुनांच्या याद्या जागोजाग दिलेल्या आहेत. नारदानें शकुनांचे तीन वर्ग केलेले आहेत,

---

१ पटे चित्रमिवार्पितम्। अनु० १६७.४.

२ अन्तरे चैव संप्राप्ते कलिद्वापरयोरभूत्। समन्तपंचके युद्धं कुरुपाण्डवसेनयोः॥ आदि० २.१३. (ग. कृ. सुद्धां)

३ श्वेतः कृतयुगे वर्णः पीतस्त्रेतायुगे मतः। रक्तो द्वापरमासाद्य कृष्णः कलियुगे तथा॥ वन० १८९.३२.

४ तपः परं कृतयुगे त्रेतायां ज्ञानमुच्यते। द्वापरे यज्ञमेवाहुर्दानमेकं कलौ युगे॥ शांति० २३२.३८.

---

१ चत्वार्याहुः सहस्राणि वर्षाणां तत्कृतं युगम्। तस्य तावच्छती संध्या संध्यंशश्च तथाविधः॥ इतरेषु ससंध्येषु संध्यंशेषु ततस्त्रिषु। एकपादेन हीयन्ते सहस्राणि शतानि च॥ शान्ति० २३२.२०-२१.

२ श्रूयते भगवन्दूतास्तवागच्छन्ति मानवान्। नेतुं किल भवान्कस्मादागतोऽसि स्वयं प्रभो॥ अयं च धर्मसंयुक्तो रूपवान्गुणसंयुतः। नार्हो मत्पुरुषैर्नेतुमतोऽस्मि स्वयमागतः वन० २९७.१६.

दैव, अन्तरिक्ष व पार्थिव.[1] जलपूर्ण कुम्भ, ब्राह्मण व गाई यांचें दर्शन हे शुभ शकुन सांगितलेले आहेत.[2] अरण्यकाण्डाच्या २३ व्या अध्यायांत खालील अशुभ शकुन दिलेले आहेतः—रक्तवर्ण जल, सूर्याचें खळें, ध्वजावर गिधाड बसणें, लांडग्यांचें ओरडणें, सूर्य किंवा चन्द्र यांना अकालीं ग्रहण (?), उल्कापात, भूकम्प, आवाज बसणें, बाहुस्फुरण इत्यादि. वनपर्व १७९, विराटपर्व ३९ व ४६, उद्योगपर्व ८४ ह्या ठिकाणीं शकुनांच्या लांबच लांब याद्या आहेत.

फलज्योतिष. दोन्ही ग्रन्थांत विशेषतः महाभारतांत फलज्योतिषविषयक वाक्यें अनेक आहेत. कोणत्याही महत्त्वाच्या कामाला ग्रहस्थिति अनुकूल असल्याशिवाय सुरवात करीत नसत. पुनर्वसु नक्षत्रीं, पांच ग्रह उच्च असतां, कर्कलग्नीं चंद्रगुरुयोग झाला असतां राम जन्मास आले असें सांगितलेलें आहे.[3] सूर्य, मंगळ व राहु या पाप ग्रहांनीं माझें (जन्म) नक्षत्र आक्रमिलें आहे असें एका ठिकाणीं ह्मटलें आहे.[4] चंद्रपुष्ययोग फार शुभ मानला जात असे. ग्रहांची स्थिति राशींवर न सांगतां नक्षत्रांवर सांगण्याचा परिपाठ फार होता. भीष्मपर्वाच्या तिसऱ्या अध्यायांत अशा रीतीनें ग्रहस्थितीचें बरेंच वर्णन आहे.

स्वप्नें. स्वप्नें हीं भविष्यसूचक आहेत असें मानीत. सुन्दरकाण्डाच्या २७ व्या अध्यायांत हजामत केलेला व तेलानें माखलेला असा रावण स्वप्नांत दिसला, असें वर्णन आहे. 'शास्त्रांत ज्याचें दर्शन निषिद्ध केलें आहे असा वानर आज मी स्वप्नांत पाहिला; रामाचें कल्याण असो' असें एका ठिकाणीं ह्मटलेलें आहे.[1]

सामुद्रिक. शरीराच्या निरनिराळ्या अवयवांवर असणाऱ्या रेषांवरून मनुष्यांचें शुभाशुभ भविष्य वर्तवीत असत. स्त्रियांसंबन्धानें अशा प्रकारच्या खुणांचें वर्णन युद्धकाण्डाच्या ४८ व्या अध्यायांत केलेलें आहे.

१२. उपसंहार.

येणेंप्रमाणें प्राचीन आर्यांच्या समाजस्थितीचें चित्र रेखाटण्याचा आह्मी प्रयत्न केला आहे. हें चित्र जर पुसटपुसट उठलें असेल व जर त्यांतील रंग खुलून दिसत नसतील तर तो चित्रकाराचा दोष आहे, मूळ वस्तूचा नव्हे. कांहीं निवडक विषय घेऊन आह्मी त्रोटक विवेचन केलें आहे. संपूर्ण विषयांवर विस्तृत विवेचन केल्यास हजारों पानांचा ग्रन्थ होईल. महाभारत हा ग्रंथ सर्वज्ञानसंग्राहक आहे. 'जें येथें आहे तेंच दुसरीकडे सांपडेल, जें ह्या ग्रन्थांत नाहीं तें कोठेंही सांपडणार नाहीं.' असें जें महाभारतांत ह्मटलेलें आहे[1] ती कांहीं निवळ दर्पोक्ति नव्हे. अशा ह्या अमूल्य ग्रंथांत व रामायणांत जें कांहीं आमच्या अल्पबुद्धीला महत्त्वाचें वाटलें तें सर्व प्राचीन ग्रंथांच्या अभिमान्यांना सप्रेम अर्पण केलें आहे.

---

१ उत्पातांस्त्रिविधान्प्राह नारदो भगवानृषिः॥ दिव्यांश्चैवान्तरीक्षांश्च पार्थिवांश्च पितामह। सभा ४६. ७-८ (ग. कृ. मुद्रां)

२ युध्यतः सह देवैस्ते शुभं भवतु मंगलम्। पूर्णकुम्भो द्विजो गावो यच्चान्यत्किंचिदुत्तमम्॥ आदि. २१.३३

३ नक्षत्रेऽदितिदैवत्ये स्वोच्चसंस्थेषु पंचसु। ग्रहेषु कर्कटे लग्ने वाक्पताविन्दुना सह॥ बाल० १८.९.

४ अवष्टब्धं च मे राम नक्षत्रं दारुणैर्ग्रहैः। आवेदयन्ति दैवज्ञाः सूर्यांगारकराहुभिः॥ अयोध्या० ४. १८

१ स्वप्नो मयायं विकृतोऽद्य दृष्टः शाखामृगः शास्त्रगणैर्निषिद्धः। स्वस्त्यस्तु रामाय॥ सुन्दर. ३२.९४.

१ यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत्क्वचित्।